घोडा-गाडी.

[illegible]

घोडा-गाडी

हें पुस्तक

तयार करणार

कृष्णराव महादेव जोगळेकर एम्. ए.

" अग्रे यान्ति रथस्य रेणुवदमी चूर्णीभवन्तो घना
श्चक्रभ्रान्तिररान्तरेषु जनयत्यन्यामिवारावलिम्।
चित्रन्यस्तमिवाचलं हयशिरस्यायामवच्चामरं
यष्ट्यग्रे च समं स्थितो ध्वजपटः प्रान्ते च वेगानिलात्॥"

कालिदासः

प्रकाशक

खळे आणि कंपनी.

बडोदें.

१८९७.

लक्ष्मीविलास छापखान्यांत छापलें.

बडोदें.

अर्पणपत्रिका.

श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड
सेनाखासखेल समशेर बहादूर
जी. सी. एस्. आय्.
यांचे
हुजूर

घोडा-गाडी हें पुस्तक अर्पण करण्याची त्यांचेकडून मला परवानगी मिळाली हें मला महद्भूषण मिळालें असें मीं समजतों.

श्रीमंत सयाजीराव महाराजांसारखी सारथ्यकलेची हातोटी अन्यत्र क्वचित्च दृष्टीस पडते तेव्हां माझ्या पुस्तकांतील विषयाला अनुरूप परंतु त्याला अति श्रेष्ठ अर्पणस्थान मिळाल्यामुळें मी केलेल्या श्रमांचें सार्थक झालें असें समजून हें पुस्तक साल्हादमनानें व स्वामीभक्तीपुरःसर हुजूर अर्पण केलें आहे. मु० बडोदें. मित्ती माघ वद्य १० शके १८१९.

PREFATORY NOTE.

In no country in tho world probably is the horse held in greater regard and treated with more kindness than in India. But considering the great use that the horse is in India, probably there is no land where his treatment, as regards feeding, doctoring, grooming, harnessing, and working, is so little managed on skilled and rational lines as it is in this country. Any one who feels an interest in horses can bear me out from his own observation, that out of a hundred horses one sees whether in the stable or at work, there are not ten, perhaps not five, that are turned out as they should be. I do not include mere hack-horses in the commoner sorts of conveyances, but I refer especially to the turn-outs of well-to-do native gentlemen, and even Rajas, who would gladly have their horses and carriages turned out in good style, and do not spare expense to attain this end, but who do not themselves know any thing about the matter and leave it to their coachmen, as being their and not the master's business. Unfortunately, the *syce* is as a rule only a little less ignorant than his employer. He has picked up a few traditional notions, and has good–will enough, but has no conception of all those *minutiæ* of stable-management that go to make the result that I may call " GOOD STYLE ". The English are a HORSY nation and at the present day there is a general willingness to imitate their ideas and methods as regards horses and carriages. There is no reason why

this should not be successfully done. Where there's a will there's a way, and that there is a will, this little book is itself a proof, for it is due to the suggestion of an Indian Prince who, as is to be expected from one of the finest horsemen and best "whips" in India, has himself in his own vast stables felt the great need there was of some systematic guide that might serve for the proper instruction of those responsible for so many beautiful horses and carriages. To this true Sportsman—His Highness the Gaikwar of Baroda—then is due this first attempt to provide for the natives of this side of India some sound teaching on the subject of horses and carriages. But it is not for coachmen only that this book is designed. Their masters are even more in want of some practical guidance. If they do not themselves know how these things should be done they can not expect their servants to take the trouble to carry out these teachings. For, TROUBLE must be taken. Without it no stylish result can be expected. It is this very neglect of finish in minute details that makes a "native turn-out" such a laughable—or at least smile-provoking—object as it too frequently is. Trouble must be taken. The master's eye fattens the horse, but the master's eye must clean the carriage and harness, must have the buckles and straps in order, must have the driver or groom cleanly dressed (not necessarily like a cross between a clown and a dustman), must keep the leather-work pliable and the metal-work bright, must give the horse his share of work and not strain him by over-loading or over-driving, must see that all the appliances are in keeping, that the whip is not shabby, that the repairs are not bits of string;—these and many things more the master's eye must

do, or else they will not be done at all, or at least, not as they should be.

His Highness the Gaikwar having suggested this book and having directed me to see the idea carried out by entrusting it to some thoroughly practical sportsman, I have been fortunate in having at my hand my friend Mr. Krishnarao Mahadev Joglekar M. A. whom I have known for long as taking an intelligent interest in all that concerns the horse. But the proof of the pudding is in the eating, and the proof of the merits of the book will I hope be found in the growth of a better style in all that concerns the horses and carriages of native gentlemen in the Marathi speaking districts of this great country. The author desires me to add that the right of translation is reserved and that gentlemen desirous of imparting the teachings of the work in their own vernaculars should address him on the subject.

The College
BARODA. — H. LITTLEDALE.

ग्रंथकर्त्याची प्रस्तावना.

अलीकडे ह्या देशांत साधारणतः लोकांच्या दररोजच्या दळणवळणांत आणि हालचालींत घोडागाडीची जरूर पडते, म्हणून ज्यांस ऐपत असेल ते स्वतःचीच घोडागाडी ठेवतात; पण असावीं तशीं गाडी किंवा घोडा विरळा दृष्टीस पडतात. तसेंच पद्धतशीर गाडी हांकण्याची माहिती फार थोड्यांसच असते; म्हणून घोड्याची शुश्रूषा कशी ठेवावी, गाडीची व्यवस्था कशी ठेवावी आणि गाडी कशी हांकावी इत्यादि विषयांवर सरळ व सोप्या भाषेंत मराठींत एक पुस्तक असावें अशी कल्पना श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांजकडून निघाली. त्या कल्पनेला विवक्षित स्वरूप देण्याचें काम अक्टिंग विद्याधिकारी, मेहेरबान मिस्टर लिटल्डेल एम. ए., यांनीं मला सोपलें; तें माझ्या हातून कितपत सिद्धीस गेलें आहे हें पुस्तकाचा उपयोग करणारेच ठरवूं शकतील.

माझे माननीय मित्र रावबहादूर नारायणराव वासुदेव खारकर यांनीं प्रथमतः घोडागाडीसंबंधीं मला अभिरुचि उत्पन्न केली;

पुढें ती बडोद्यासारख्या राजवैभवाच्या ठिकाणीं नोकरीसंबंधानें माझें वास्तव्य झाल्यानें जागृत राहून घोडागाडीविषयीं माहिती मिळ-विण्याचा माझा नाद कायम राहिला; यास्तव जर ह्या पुस्तकांत कांहीं उपयुक्त विवेचन असेल तर त्याचें श्रेय ज्या गृहस्थानें मला अभिरुचि लाविली आणि विशेषतः ज्या राजपुरुषाच्या आश्रयानें ती वृद्धिंगत झाली त्यांच्याकडे आहे हें उघड आहे.

ह्या पुस्तकांत कांहीं न्यूनता किंवा चुका असल्यास त्यांचा बोजा माझ्या शिवाय अन्य कोणावर नाहीं. या तऱ्हेचें हें पुस्तक प-हिलेंच असल्यामुळें त्यांत व्यंगें असणारच; तरी वाचकवृंदांनीं कृपा करून त्या न्यूनता किंवा चुका मला सुचविल्यास मी त्यांचा फार आभारी होईन, व ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघण्याचा प्रसंग आल्यास त्या सूचनांचा मी आनंदानें विचार करीन.

हें पुस्तक तयार करण्यांत मला पुष्कळ ग्रंथांची मदत झाली, त्यांत विशेषतः स्टोनहेन्ज, फिट्झ-विग्रम, मोर्ले नाइट्, डयूक ऑफ बोफर्ट, नेव्हाइल, मेयू, यूवट्, कॅपटन हेज् इत्यादि ग्रंथकारांच्या पुस्तकांतून पुष्कळ उपयुक्त माहिती मिळाली, तसेंच कित्येक उर्दू व संस्कृत ग्रन्थांचा आणि गुप्ते यांच्या मराठी अश्व-परीक्षा नामक पुस्तकाचा बराच उपयोग झाला. वर निर्दिष्ट केलेलीं

पुस्तकें नसतीं तर सांप्रतचें माझें पुस्तक ह्या स्वरूपानें प्रसिद्ध होतें कीं नाहीं याची मला शंकाच आहे; तरी वरील ग्रंथकारांचे जितके आभार मानावे तितके थोडे.

माझे स्नेही कप्तान माधवराव बाजी यानीं पुस्तकाची हस्त-लिखित प्रत अवलोकनांत घेऊन कांहीं महत्वाच्या सूचना केल्या. पुस्तकाच्या छपाई संबंधानें दोन शब्द लिहीणें जरूर आहे. बडोदे शहरांत किंबहुना अन्य पुष्कळ शहरांतून छापखाने आहेत पण बेताबाताच्या साधनानीं माझ्या पुस्तकाचें सुबक काम होण्याला मुख्य कारण " लक्ष्मीविलास " छापखान्याचे मालकांची काळजी आणि उत्तम प्रकारें छापण्याचा उत्साह हींच होत.

कृष्णराव महादेव जोगळेकर.

अनुक्रमणिका.

उपोद्घात.

हिंदुस्थानांत फार पुरातन काळीं घोड्यांच्या रथांचा प्रघात असावा असें मानण्यास आधार आहे परंतु ते रथ कसे होते, रथाला घोडे जुंपण्याचें सामान कसें होतें इत्यादि विषयांचें या ठिकाणीं विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं. हल्लीं या देशांत ज्या घोड्यांच्या गाड्या चोंहींकडे नजरेस पडतात त्या सुमारें पन्नास वर्षांच्या आंतच प्रचारांत आल्या आहेत. त्या इंग्रजी अमला नंतरच्या असल्यामुळें सर्व इंग्रजी पद्धतीच्या आहेत. या देशांत इंग्रजी अम्मल सुरु होण्यापूर्वी मोठाल्या शहरांतून बडे बडे सरदार जहागिरदार म्याने तावदानांतून फिरत आणि इतर लोक बैलांच्या गाड्यांतून किंवा घोड्यांवरून फिरत. त्यावेळीं सदासर्वकाळ लढाई, हाणामार, धामधूम असा प्रकार असल्यानें बहुतेक सर्वत्रांस

इंग्रजी अमलापूर्वीचीं वाहनें.

घोड्यावर बसण्याची माहिती असून घरांत एखादा तरी लहान मोठा घोडा बाळगून त्याची चांगली शुश्रुषा करणें ह्यांत लोक भूषण मानीत. कालगतीनें जेव्हां चोंहींकडे शांतता झाली आणि लोकांच्या दिनक्रमाला निराळ्याच प्रकारचा ओघ लागला तेव्हां या देशांतील लोकांतून घोड्यावर बसण्याची कला आणि घोड्यासंबंधी माहिती याचा बहुतेक लोप झाला; इतकेंच नव्हे पण या देशांतून घोड्याच्या उत्पत्तीचाही ऱ्हास झाला असेंच ह्मणावें लागतें.

इंग्रज लोकांची घोड्यासंबंधीं आवड.

इंग्रज लोकांत गृहस्थपणाला ज्या कांहीं बाबती अवश्य मानलेल्या आहेत त्यांत अश्वारोहणाची गणना होते; तसेंच इंग्रजी राज्यांत कितीएक सरकारी नोकऱ्या मिळण्याला घोड्यावर बसतां येण्याची अवश्यकता आहे. बहुतेक युरोपीयन स्त्रीपुरुषांला गाडीघोड्यासंबंधानें थोडीना थोडी तरी माहिती असते; ज्यांला ती लहानपणीं मिळवितां आली नसेल ते ती पुढें हरप्रकारें मिळविण्याचा यत्न करतात. एतद्देशीय लोकांत मात्र या संबंधानें सर्व प्रकार उलट नजरेस येतो. अशी स्थिति प्राप्त होण्याला अनेक सामाजिक व राजकीय कारणें आहेत. सांप्रत

घोडागाडीबद्दल एतद्देशीयांची उदासीनता.

एत्तद्देशीय लोकांत अनेक राजकार्यधुरंधर, समाजस्थिति-सुधारक, न्यायशास्त्रचतुर, वैद्यशास्त्रविशारद आणि श्रीमान् गृहस्थ आपआपल्या सोईसाठीं किंवा चैनीसाठीं गाड्याघोडे बाळगतात; पण गाडीसाठीं घोडे असावे कसे, त्यांचें संगोपन करावें कसें, गाडी ठेवावी कशी, तिला घोडे जुंपून हांकावे कसे, ते हांकण्यांत वारंवार अडचणी कोणत्या येतात, आणि त्या दूर कराव्या कशा याबद्दल ज्यांस नुसती जरूरी पुरती माहिती आहे असे शेंकडा पांच गृहस्थ मिळणें कठीण. बहुतेक घोडागाडी बाळगणारांला ह्या बाबतींत सर्वस्वी मोतद्दारावर अवलंबून रहावें लागतें. जें जनावर आपल्याला म्हटल्यावेळीं कामीं पडतें, यत्किंचित् दाखविलेलें प्रेम ज्याला कळतें, जें मालकासाठीं स्वतःच्या जिवाची काळजी न बाळगतां आनंदानें उपयोगीं पडण्यास सदा सर्वकाळ तत्पर असतें, अशा इमानी प्राण्याच्या संगोपनासाठीं यःकश्चित् मोतद्दारावर अवलंबून रहाणें अगदीं अयोग्य असें कोणीही कबूल करील. पुष्कळ ठिकाणीं असें नजरेस येतें कीं यजमान गाडींतून परत आल्यावर मोतद्दार ती जोडलेली गाडी गाडीखान्यांत नेऊन घोडा सोडतो आणि त्याच्या

मोतद्दारावर हवाला.

मर्जीस आल्यास घोड्याची मालिष करतो, गाडी धुऊन पुसून व्यवस्थेशीर ठेवतो; नाहींतर त्या मुक्या जनावराला ठाणावर धापा टाकीत बांधून ठेऊन आपण आपल्या सोबत्यांबरोबर चिलीम फुंकीत गप्पा मारीत बसतो. ह्यापासून यजमानावर निष्ठुरतेचा व निःकाळजीपणाचा दोष येऊन मोतद्दाराच्या आळशीपणानें घोडागाडी खराब होतात, आणि अर्थात् मालकाचें पैशाकडून नुकसान होतें. तरी घोडे किंवा गाडी बाळगणारानीं त्यांची चांगली जतन रहाण्यासाठीं तत्संबंधी माहिती स्वतः मिळविली पाहिजे.

घोडागाडीच्या पुस्तकाची अवश्यकता.

अश्वशास्त्राचे या देशांत पुष्कळ संस्कृत, फारशी वगैरे ग्रंथ आहेत. शिवाय अश्वपरीक्षा ह्मणून मराठींत एक चांगला उपयोगी ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे; पण सारथ्यकर्माविषयीं किंवा अश्वारोहणकलेविषयीं सांप्रत देशी भाषातून हिंदुस्थानांत कोठें पुस्तक झालेलें ऐकिवांत नाहीं. पाश्चिमात्य भाषांतून ह्या दोन्ही विषयांवर पुष्कळ पुस्तकें अढळतात. त्यांतून जीं व्यवहारांत उपयोगी अशीं वाटलीं त्यांच्या आधारानें व स्नेह्यांच्या आणि स्वतःच्या अनुभवानें घोडागाडीची योग्य तरतूद रहाण्या-

साठीं व गाडी हांकण्यांसाठीं जितकी अवश्य माहिती पाहिजे तितकीच ह्या पुस्तकांत दिली आहे. अश्वारोहणकलेसंबंधानेंही एतद्देशीय भाषेंत कोणी तदभिज्ञ गृहस्थानें ग्रंथ लिहिल्यास एक मोठी उणीव भरून निघणार आहे.

विषयानुक्रम.

कोणा गृहस्थाचा घोडागाडी ठेवण्याचा विचार झाला असतां त्यानें घोडा कसा निवडून काढावा, त्याची जतन कशी ठेवावी, त्याला गाडींत चालू करण्यासाठीं कोणत्या उपायांची योजना करावी, गाडी कशी खरेदी करावी, घोड्याचा साज कसा घ्यावा वगैरे माहिती या पुस्तकांत क्रमवार देऊन शेवटीं चौकडी हांकणें, टान्डेम हांकणें याविषयींही माहिती दिली आहे.

प्रकरण १.

घोड्याच्या जाती.

मूळ वसती स्थानाप्रमाणें घोड्याच्या गुणांत भिन्नता.

घोडा हें जनावर पृथ्वीवर आइसलण्डसारख्या अति सीत प्रदेशापासून साहारासारख्या अति उष्ण प्रदेशापर्यंत चोंहींकडे सांपडतें. त्यामुळें त्याच्या देशस्थित्यनुसार भिन्न भिन्न जाती आहेत तत्रापि निरनिराळ्या जातींची भिन्नता पुष्कळ अंशीं त्यांतील जनावरांची जन्मापासून जशी जतन होत असेल त्यावर अवलंबून असते. डोंगराळ प्रदेशांतील घोडे ठेंगणें पण चपळ आणि रांकट असतात, सपाट प्रदेशांतील घोडे उंच असून बहुशः तेजस्वी असतात; असा जरी साधारण नियम आहे तरी चांगला वळू घोडा देऊन घेतलेली अवलाद चार पांच पिढ्यापर्यंत संभाळली तर ती फार सुधरते असें अनुभवास आलें आहे.

जोगवणुकीचा परिणाम.

सर्व सुधारलेल्या देशांत घोड्याच्या जोगवणूकीकडे फार चांगलें लक्ष देण्यांत येतें म्हणून त्या

देशांत घोड्यांची सुधारणा अत्युत्तम होऊन तेथील घोडे पुऱ्या वाढीचे, मजबूत, देखणे व चपळ होतात. सुमारें दोन तीनशें वर्षांपूर्वी हिंदुस्थानच्या कांहीं प्रांतांतील घोडे पाणीदार व सदृढ असावे असें मानण्यास बरेच आधार सांपडतात. मध्यंतरी जो काळ गेला त्यांत इतर पुष्कळ उपयुक्त बाबतींकडे लोकांचें दुर्लक्ष झालें त्याचप्रमाणें घोड्याच्या अवलादींकडेही झालें; तेणेंकरून पुरातनकाळीं या देशांत घोड्याच्या ज्या कितीएक उत्तम जाती होत्या त्यांचा कालमानानुसार ऱ्हास होऊन परदेशी घोडे वापरण्यांत येऊं लागले आहेत. प्रायशः अरबी, इराणी व आस्ट्रेलियन घोडे सांप्रत येथें पुष्कळ नजरेस येतात. कांहीं श्रीमंतांचे तबे-ल्यांतून इंग्लिश घोडेही अढळतात.

सांप्रत अरबी घोड्यासारखा हरकामी आणि स-हनशील घोडा दुसऱ्या कोणत्याही जातींत अढळत नाहीं. गाडीच्या कामींही अरबी घोड्याइतका दुसऱ्या कोणत्याही जातीचा घोडा उपयोगीं येत नाहीं म्हणून त्याच घोड्यासंबंधी प्रथमतः थोडीशी माहिती देण्यांत येत आहे.

८

अरबी घोडा.

पंधराशें वर्षांपूर्वी अरबस्थानांतील घोडे सांप्रत-च्या घोड्यांसारखे नसावे असें मानण्यास पुष्कळ ऐतिहासिक पुरावे आहेत. अरब लोक स्वतः कबूल करतात कीं त्यांच्या घोड्यांची जी सुधारणा आज दृष्टोत्पत्तीस येते ती अलीकडलीच होय. अरबी घोडा.

त्या लोकांत अशी एक दंतकथा आहे कीं महंमद पैगंबर याणें एकदां आपल्या फौजेंतील घोडीं दोन दिवस पाण्याशिवाय बांधून ठेऊन तिसऱ्या दिवशीं मोकळीं सोडलीं, तेव्हां तीं पाण्यासाठीं चोंहींकडे उधळूं लागलीं, इतक्यांत महंमदानें लढाईचें शिंग फुंकवितांच सगळ्या घोड्यांतून फक्त पांच माद्या रणशिंगाचा आवाज ऐकल्याबरोबर धांवत परत आल्या. त्या अस्सल, इमानी आणि धारिलेलें काम देणाऱ्या असें लक्षांत घेऊन महंमद पैगंबरानें स्वतःसाठीं निराळ्या ठेविल्या. अरब लोक म्हणतात कीं त्या माद्यांची जी अवलाद ती सर्वांत श्रेष्ठ. अरब लोकांतील दंतकथा.

कुछलानी व नझ्दी जाती.

अली बे नावाच्या गृहस्थानें पुष्कळ शोध करून आणि निरनिराळ्या प्रांतांतून माहिती मिळवून लिहिलें आहे कीं अरबी घोड्यांत सहा जाती आहेत; त्यांत कुछलानी व नझ्दी ह्या दोन सर्वोत्कृष्ट. कुछलानी जातीचे घोडे बहुतकरून बेद्वीन अरबांजवळ असतात. पैसा खर्च केल्यानें त्यांच्या जवळून वळू घोडा मिळणें शक्य आहे पण मादी मिळणें मात्र दुरापास्त होय. नझ्दी जातीचे घोडे बसऱ्याच्या आसमंतांत मिळतात. ते सुस्वरूप असून बरेच दुर्मीळ आहेत.

अरबस्थानांतील एकंदर घोडे फार चांगले अशा बद्दल सांप्रतकाळीं मुळींच मतभेद नाहीं. ह्या घोड्यांत जे कितीएक अनुपमेय गुण आहेत ते येण्यास अनेक कारणें आहेत.

अरबी घोड्याची वंशावळ.

अरबलोक आपल्या घोड्यांचा वंशावळी फार काळजीनें ठेवितात आणि मादीला जातवंत घोडा दाखविण्याची फार खबरदारी ठेवितात. अरबस्थानांत अशी चाल आहे कीं शिंगरू जन्मल्यापासून सात दिवसांत मालकानें त्याच्या जन्माचा वगैरे दाखला स्थानिक अम्म-

ल्दाराजवळून घेतला पाहिजे. त्या दाखल्यांत शिंगराच्या आईबापाचें नांव वगैरे सर्व माहिती असते.

अरबी घोड्याचा पाय.

अरबस्थान देश डोंगराळ आणि सपाटीच्या भागांत रेताळ व तेथील हवा रुक्ष असल्यामुळें त्या देशांतील घोड्याला जें गवत मिळतें तें लुसलुशीत नसून कणखर असतें ह्मणून त्याच्या पायाच्या नळ्या बांगडीसारख्या पातळ आणि साफ असतात अशी पुष्कळांची समजूत आहे.

त्याचा शरीराचा बांधा.

जातवंत अरबी घोडे फार उंच नसतात; पण त्यांचें कपाळ विशाळ, तोंड निमुळतें, जबडा मोठा, गालफडाचीं हाडें रुंद, आणि नाकपुड्या मोठ्या असून त्यांची कातडी पातळ असते. डोळे मोठे, पाणिदार व पुढें आलेले असतात. कान ल्हान, व मान कमानदार असून जबड्याजवळ पातळ असते. पायांच्या नळ्यांवर मांस नसून कातडींतून शिरा व हाडें स्पष्ट दिसतात. खांद्याचीं हाडें तिरकस असून मांसानें चांगलीं आच्छादिलेलीं असतात. तसें मद्दू उंच, तंगाचा घेर बेताचा पण कोठा मोठा, पुठ्ठा उंच आणि मांड्या पुष्कळ मांसल असून

एकमेकांला चिकटलेल्या असतात. तसेंच अरबी घोड्याची चालतानां शेपटी चौरीप्रमाणें उचलून ठेवण्याची शैली दुसऱ्या कोणत्याही जातीच्या घोड्यांत दिसत नाहीं.

अरबी घोड्याचा स्वभाव व बुद्धी.

ह्या घोड्याचें डोकें इतर जातीच्या घोड्यांच्या डोक्यापेक्षां मोठें असतें त्या मानानें त्याच्या डोक्यांत मेंदू जास्ती असतो; ह्मणूनच अरबी घोडा इतरापेक्षां शहाणा धीट आणि आठवणीचा धड असतो. सदोदित त्याला त्याच्या देशांत मालकाच्या बायकामुलांबरोबर रहाण्याची जन्मापासून संवय असल्यामुळें तो फारच माणसाळलेला असून ममताळू असतो. अरबी घोड्यांत दुर्गुणी द्वाड असा घोडा विरळा दृष्टीस पडतो, पण एकदां कांहीं कारणानें तो बिघडला तर मात्र सुधरणें फार कठीण.

अरबी घोड्यांत साधारण रंग ह्मटले ह्मणजे तेलीया कुमाईत, बोर, करडा व कधीं काळा असे अढळतात.

अस्सल अरबी घोड्याची किंमत मुंबईच्या बाजारांत बहुश: १९०० पासून ४००० रुपये पर्यंत पडते.

इराणी घोडा.

हा घोडा सौंदर्यांत आणि अवयवांच्या निटसपणांत इराणी घोडा. अरबी घोड्याच्या खालोखाल असतो. जरी तो एकंदरीनें अरबी घोड्यापेक्षां उंच आणि हातापायांनीं त्याच्यापेक्षां भक्कम असतो तरी चपळाईंत किंवा सहनशीलपणांत त्याची बरोबरी करूं शकत नाहीं. इराणी घोड्याचें त्याचा बांधा. डोकें अरबी घोड्याच्या डोक्यापेक्षां लहान व लांबट, आणि त्याची छाती अरुंद व पाय जाड असतात. हे घोडे विशेष तापट आणि चिडखोर असतात. ह्या जातीच्या घोड्याची उत्पत्ती अरबी आणि खुरासानी घोड्यापासून असावी.

हल्लीं या देशांत इराणी घोडे फार येतात आणि ते ओळखून काढण्याला फार अनुभव आणि माहिती पाहीजे. नाहीं तर सौदागरलोक तेच घोडे अस्सल अरबी ह्मणून सांगतात. ह्या देशांतील इंग्रजी व निरनि- त्याचा उपयोग. राळ्या संस्थानिकांच्या रिसाल्यांतून प्रायशः इराणी घोड्यांचीच भरती होते. असल्या घोड्याची किंमत सरासरी ३०० पासून ६०० रुपये पर्यंत पडते.

अरबी घोड्यापेक्षां हा घोडा गाडीच्या कामीं कितीएक बाबतीं जास्त सोईचा खरा पण कधीं कधीं त्याला शिकविण्यास बराच त्रास पडतो.

आस्ट्रेलीयन घोडा.

आस्ट्रेलीयन घोडा.

परदेशी घोड्यांपैकीं गाडीच्या कामीं विशेष उपयोगांत येणाऱ्या जातींत अलीकडे दहा पंधरा वर्षांत आस्ट्रेलीयन घोड्यांची गणना होऊं लागली आहे. हे घोडे मुंबईपेक्षां कलकत्ता आणि मद्रास येथील बाजारांत विशेष येतात; ह्याचें कारण बहूत अंशीं आस्ट्रेलीयापासून मुंबई जास्त लांब असल्यामुळें तेथून घोडे आणण्याला खर्च जास्त पडतो या शिवाय आणखी कोणतेंही असावें असें वाटत नाहीं.

त्याची मुळची स्थिती.

आस्ट्रेलीयन घोडे सांप्रत जितक्या चांगल्या दशेस पोंचलेले अढळतात तसे पन्नास पाउणशें वर्षांपूर्वी नव्हते. इ० स० १८२४ मध्यें एका प्रवाशानें त्यांच्या विषयीं ह्मटलें आहे कीं, “ या देशांतील घोडे खुरटलेले, दिसण्यांत बेढब, अरुंद छातीचे, निमुळत्या पुठ्ठ्याचे असे आहेत ” पण आस्ट्रेलीयन लोकांला असल्या

घोड्यांची लाज वाटली म्हणा किंवा वाणिज्यवृत्तीनें म्हणा पण वरील लेखाला दहा वर्षें झालीं नाहीं तोंच त्यांच्या देशांतील घोड्यांत फरक दिसूं लागला. त्यानीं हिंदुस्थानांतून एक चांगला अरबी वळू घोडा नेला; सिडनी येथें एक मंडळी स्थापन करण्यांत आली. पुढें बे क्यामेरान नांवाचा एक वळू घोडा इंग्लंडांतून नेला. आणि या सर्व खटपटीचा परिणाम आज मित्तीस जो आस्ट्रेलीयन घोडा आपल्या नजरेस पडतो आणि जो श्रीमान् लोक हजारों रुपये देऊन आपल्या गाड्यांसाठीं घेतात तो होय. त्याची सुधारणा.

ज्याप्रमाणें आस्ट्रेलियाची हवा पाणी घोड्याला अनुकूल आहे त्याचप्रमाणें ह्या देशांतील बहुतेक भागाचीही आहे. सांप्रत बहुतांशीं नष्ट झालेली या देशांतील घोड्याची अवलाद सुधारणें अगदीं शक्य असून त्यापासून पुष्कळ फायदा आहे; कोणी मनावर मात्र घेतलें पाहिजे. कांहीं संस्थानांतून या संबंधी थोडीशी तजवीज आहे पण असावी तशी पद्धतशीर नाहीं; आणि जेथें सुलभ रीतीनें तजवीज होऊन उपयोगही होण्याचा बराच संभव आहे तेथें मुळींच नाहीं अशी माहिती मिळते!! हिंदुस्थानांतील घोड्याची अवलाद सुधारणें.

आस्ट्रेलियन घोडा अरबी घोड्यासारखा देखणा नाहीं; तो उंच, लांब आणि शरीरानें भक्कम असून फार चपळ नाहीं यामुळें गाडीच्या कामीं हा फार वापरण्यांत येतो.

वेलर. **आस्ट्रेलीयामधील व्हिक्टोरीया व न्यू साऊथवेल्स** प्रांतात रहाणारांला घोडे राखून त्यांचा व्यापार करण्याची फार हौस असल्यामुळें तेथील घोडे परदेशीं फार जातात, त्यांस वेलर या नावानें ओळखतात. **आस्ट्रेलीयामधून** हिंदुस्थानांत दरवर्षी सरासरी चार पांच हजार घोडे येतात, पैकीं फक्त व्हिक्टोरिया येथून निम्मेवर घोडे रवाना होतात. न्यू साउथवेल्समधल्या सौदागरांची दृष्टी दोन तऱ्हेचे घोडे, एक शर्यतीसाठीं किंवा अशा चपलतेच्या कामासाठीं आणि दुसरे गाडी ओढण्यासाठीं तयार करण्याकडे विशेष आहे.

"बक जाम्पिग." आस्ट्रेलीयामधून जे घोडे इकडे येतात ते बहुतकरून अगदीं रानटी असतात. अशा घोड्यांची उडी मारण्याची आणि स्वाराला पाडून मोकळें होण्याची विलक्षण तऱ्हा आहे. तो चारही पायांवर हरणासारखी उडी मारून आंग चोरतो तेणेंकरून स्वाराला अवसान

संभाळणें कठीण पडतें. ह्या उडीला " बक जम्पिंग " ह्मणतात; पण एकदां हा घोडा माणसाळून काम देऊं लागला ह्मणजे फार सहनशील होतो.

सिंधी घोडा.

सिंधी घोड्याच्या शरीराचा बांधा.

ह्या जातीच्या घोड्याच्या कपाळाची रचना कांहींशी चमत्कारिक आहे. ह्याचें कपाळ चिंचोळें असून लांबट असतें. तसेंच तोंड रुंदट असून मेंढ्यासारखें असतें. ह्याचा पुट्ठा भरलेला नसतो, पाठीमागून पाहिलें तर अगदीं उतरता दिसतो. ह्या जातीच्या घोड्याला रेवाल चाली शिवाय दुसरी चाल माहीत नसते आणि कदाचित् शिकविली तरी ती त्यास चांगली येत नाहीं. गुजराथप्रांतांत ह्या घोड्यांचा गाडीच्या कामीं अलीकडे बराच उपयोग होतो. हे घोडे गाडीला नीट चालूं लागले तर ठीकच पण जर एकदां अडूं लागले किंवा लाथा मारूं लागले तर मग पुढें सुधरत नाहींत. जात्या हे घोडे चिडखोर असतात.

त्याचा उपयोग.

काठेवाडी घोडा.

हा देखणा, पाणीदार आणि कडक असतो. हा गाडीच्या अगदीं उपयोगीं नाहीं. काठेवाडांतील निरनिराळ्या भागांत ह्याच्या निरनिराळ्या जाती ह्मणून लोक सांगतात आणि प्रत्येक जातीचे विलक्षण गुणानुवाद

काठेवाडी घोड्याची सांप्रत स्थिति.

गातात. काठेवाडांत इंग्रजांचा अम्मल सुरू झाल्यापासून त्यांणीं जागो जाग अरबी वगैरे जातीचे वळू घोडे ठेविले तेणेंकरून अस्सल काठेवाडी घोडा अलीकडे फारच विरळा दृष्टीस पडतो.

काबुली घोडा.

काबुली घोडा कांहींसा इंग्लंडांतील सफोक पंच जातीच्या घोड्यासारखा असतो. हा घोडा उंच असत नाहीं. हातांपायांनीं भक्कम, मानेचा गडदा मोठा, आयाळ फार लांब आणि दाट, व स्वभावानें फार सहनशील हींच काबुली घोड्याचीं मुख्य लक्षणें होत. ह्यापैकीं "चार गोष" जातीचा घोडा गाडीला फार चांगला.

"चार गोष."

पेगू घोडा.

ह्याला घोडा ह्मणण्यापेक्षां तट्टू हीं संज्ञा देणें वाजवी. जे पेगू या देशांत येतात ते उंचीला तेरा तीन* किंवा क्वचित् चौदा* पेक्षां जास्त उंचीचे नसतात. हे ब्रह्मदेशांतून इकडे येतात. हे लहान असून फार चपळ आणि देखणे असतात. हौशी श्रीमान् लोक लहान गाडीला ह्यांची जोडी जोडतात ती फार चांगली दिसते.

पेगूचा उपयोग.

---

* पहा प्रकरण ४.

प्रकरण २.

घोड्याचा रंग.

घोडा विकत घेण्यांत त्याच्या रंगाविषयींही बराच विचार करावा लागतो; तशांत विकत घेणाराला रंगासंबंधानें स्वतःची हौस पुरी करण्याची मनीषा असली किंवा एक रंगाची जोडी अथवा चौकडी मिळविणें असली म्हणजे तर अवश्य लक्ष द्यावें लागतें.

घोड्याच्या रंगासंबधीं विचार.

असुकच रंगाचा घोडा घ्यावयाचा आणि तो इतर सर्व गुणांनीं संपूर्ण असला पाहिजे असा संकल्प असला ह्मणजे निदान पैशाकडून तरी चांगली सूट पाहिजे; कारण विविक्षित रंगाचा, सर्व प्रकारें चांगला आणि किमतीनें बेताचा असा घोडा सहज मिळणें शक्य नाहीं.

मुख्य रंग.

घोड्याचे रंग अनेक असून अश्वशास्त्रकर्त्यांनीं तत्संबंधानें फारच बारकाईनें विवेचन केलें आहे; पण

सांप्रत चोंहींकडे जे रंग दृष्टीस पडतात तितक्यांचेंच वर्णन करण्याचा आमचा विचार आहे.

घोडयाचे मुख्य रंग, तांबडा, पिंवळा, काळा आणि पांढरा असे चार; त्यांचें एकमेकांशीं कमजास्त प्रमाणानें मिश्रण झाल्यानें निरनिराळे रंग होऊन त्यांस व्यवहारांत निरनिराळीं नांवें दिलीं आहेत.

तांबडा रंग आणि त्याचे प्रकार.

१ **सुरंग**—हा रंग निखालस रक्ताप्रमाणें असतो. उन्हांत हा फार चमकतो.

२ **बोर**––ह्यांत लाल रंग फिक्का असून पांढरे केंसांचें बरेंच मिश्रण असतें.

३ **कुमाइत**—यांत लाल रंगाच्या केंसांत काळ्या रंगाचे केंस मिश्रित असतात आणि बहुशः या रंगाच्या घोडयाचे चारही पाय ढोंपरापर्यंत काळे आणि अयाळ व शेंपूट काळी असते.

४ **तेलिया कुमाइत**—यांत काळ्या रंगाच्या केंसांचें वरच्यापेक्षां मिश्रण जास्त असतें. अरबी घोड्यांत हा रंग फार दृष्टीस पडतो.

पिंवळा रंग.

ह्या रंगाचे घोडे फार नसतात. थोडेबहुत देशी घोड्यांत नजरेस येतात; याचे मुख्य दोन प्रकार—एक जर्दा आणि दुसरा बदामी.

काळा रंग.

ह्या रंगाला फारशींत "मुष्की" ह्मणतात. ह्याचे वर्णनाची जरूर नाहीं, सहज लक्षांत येण्यासारखा आहे.

पांढरा रंग.

ह्या रंगांत बरेच पोटभेद आहेतः—

१ **सब्झा**—दोन तऱ्हेचा—काळा सब्झा आणि लाल सब्झा; ज्याप्रमाणें पांढऱ्या केंसांत काळ्या किंवा लाल केंसांचें मिश्रण असेल त्याप्रमाणें ओळखावा.

२ **गुलदार सब्झा**—हाही दोन प्रकारचा, लाल किंवा काळा; ह्या रंगांत वर प्रमाणेंच पांढऱ्या व काळ्या केंसांचें मिश्रण असून ठिकठिकाणीं शेंवतीच्या फुलाप्रमाणें ठिपके असतात. पुष्कळांस हा रंग आवडतो.

३ **चिनी**—अगदीं पांढरा शुभ्र, चिनई मातीच्या भांड्याच्या रंगाप्रमाणें असल्यास त्यास ह्मणतात.

४ **नुखरा**—खूर पांढरे, डोळे सफेत, आंगावरचे केंस पांढरेच पण शिवाय शेंपूट व अयाळ पांढरी आणि अंगाची कातडी गुलाबी.

५ **गोमाशा**—पांढऱ्या रंगांत गोमाशीप्रमाणें सर्व अंगभर तांबूस लहान ठिपके असतात.

सर्व रंगांत साधारण असूं शकणारे प्रकारः—

अब्लख—हा प्रकार ह्मणजे एक मुख्य रंग (तो बहुतकरून पांढरा) असून सर्व आंगावर मोठाले चट्टे ज्या रंगाचे असतील त्याप्रमाणें अब्लख ह्मणतात. जसें काळा अब्लख, लाल अब्लख, यांत मुख्य रंग पांढरा असून आंगावर मोठाले काळे किंवा लाल चट्टे असतात.

पंच कल्याण—ह्मणजे शरीराचा लाल काळा पिंवळा किंवा त्याच्या पोटभेदांपैकीं कोणताही रंग असून ढोंपरापर्यंत चारही पाय पांढरे आणि तोंडावर मोठा पांढरा पट्टा असल्यास आंगाचा जो प्रधान रंग असेल त्या जातीचा पंचकल्याण ह्मणतात जसें सुरंग पंचकल्याण, कुमाइत पंचकल्याण इत्यादि.

सैली समंद—कोणत्याही रंगाच्या घोड्याच्या शेंपटीपासून शेंडीच्या टोंकापर्यंत काळी रेघ असल्यास त्यास ह्मणतात. ही तऱ्हा काळ्या रंगाशिवाय अन्य रंगांतच असणार हें उघड आहे.

ग्रंथकारांनीं आणखी पुष्कळ प्रकारच्या रंगांचें वर्णन केलें आहे पण वरील प्रकारांत बहुतेक प्रचारांतील रंगांचा समावेश होतो.

प्रकरण ३.

घोड्याचें वय.

घोड्याची किंमत पुष्कळ अंशीं त्याच्या वयावर अवलंबून असते ह्मणून त्याचें वय जितक्या बारकाईनें निश्चित करवेल तितक्या बारकाईनें ठरविलें पाहिजे. शिवाय जो

गाडीला जोडण्याच्या घोड्याचें वय. घोडा गाडीला जोडावयाचा तो जर कोंवळा असला तर गाडीच्या ओढीमुळें त्याला थोडक्याच दिवसांनीं अनेक प्रकारचे रोग होऊं लागतात. घोडा पांच वर्षांचा झाला ह्मणजे तो गाडीला जोडण्यालायक होतो. कोठें कोठें चार वर्षांचा घोडाही गाडीला वापरतात, पण त्यापेक्षां कमी वयाचा घोडा गाडीला जोडणें त्याला अपायकारक आणि परिणामीं मालकाला हानिकारक ह्मणून घोड्याचें वय ठरविण्याचा मार्ग स्थूल मानानें खालीं दर्शविण्याचा यत्न केला आहे.

“शाई.” घोड्याचें वय त्याच्या दांतांच्या रचनेवरून आणि त्यांच्यावर असलेल्या काळ्या रंगाच्या ठिपक्यां-

वरून मुकर होतें. ह्या काळ्या रंगाला अश्वशास्त्रपरिभाषेंत " शाई " असें ह्मणतात.


शिंग्रूं जन्मल्यापासून सात आठ दिवसांत त्याला पुढले दोन दांत येतात. दोन दाढा तर त्याला जन्मापासूनच असतात. आठ दिवस.

एक महिन्याचेआंत आणखी एक एक दाढ येते.

चार महिन्यांच्या उमरीला पुढले आणखी दोन दांत येतात. चार महीने.

सहा महीन्यांच्या सुमारास एक एक दाढ येऊन एकंदर दोन्ही जबड्यांमिळून सोळा दांत होतात. सहा महीने.

शिंग्रूं एक वर्षाचें झालें ह्मणजे त्याला खालचे सहा एक वर्ष.




आकृति १.

आणि वरचे सहा मिळून बारा तोडदांत (हे दांत कुरणांतील गवत तोडून घेण्याच्या उपयोगीं पडतात ह्मणून त्यांस तोडदांत हें नांव योजिलें आहे. ह्या दांतांला चावण्याचे दांत असें गुप्ते यांणीं आपल्या पुस्तकांत नांव दिलें आहे.) आणि शिवाय आठ दाढा असतात.

शिंग्रूं एक वर्षाचें होईपर्यंत तोडदांत किती आले आहेत हें पाहूनच वय समजतें. पण यापुढें वयाचा अजमास करावयाचा तो दांतांवरच्या शाईची स्थिति लक्षांत घेऊन करावा लागतो.

दुसरें वर्ष. दुसऱ्या वर्षीं मधल्या तोडदांतांवरची शाई बहुतेक सगळी नाहींशी होते; बाजूच्या दोहोंवरची बरीच कमी होते आणि अगदीं शेवटल्या दांतावरची मात्र जशाच्यातशीच कायम असते. (पहा आकृति २)



आकृति २.

तिसऱ्या वर्षांत दुधाचे दांत पडून कायमचे दांत येऊं लागतात. प्रथम ज्या क्रमानें दुधाचे दांत आले त्याच क्रमानें हे दांतही येतात. ह्मणजे वरच्या व खालच्या तोडदांतांपैकीं मधले तोडदांत पडून त्यांच्या ऐवजीं कायमचे दांत येतात. साडे तीन वर्षांचे सुमारास दुसरे दोन शेजारचे दुधाचे दांत पडतात; आणि फक्त शेवटले दुधाचे तोडदांतांवरची शाई मात्र नाहींशी होते. तिसरें वर्ष.

दुधाचे दांत पांढरे, गोल व आंखूड असतात; हे दांत पडून जे दुसरे कायम दांत निघतात ते मोठे असतात व त्यांचा पांढरेपणा कमी असतो; तसेंच त्यांची हिरड्यांमधली ठेवण दुधाच्या दांतांसारखी वर्तुलाकार नसते हें आकृति ३ व २ यांची तूलना केल्यानें दिसून येईल. दुधाच्या व कायमच्या दांतांची तूलना.



आकृति ३.

मागील वर्षीं आलेल्या कायमच्या चार तोडदांतांपैकीं मधल्या दोन्ही तोडदांतांच्या धारा झिजून चौथें वर्ष.

गुळगुळीत होतात आणि त्यांच्यावरची शाई थोडी थोडी कमी होऊं लागते. जवळच्या दोन्हीं दांतांच्या धारा अजून तीक्ष्ण असतात. त्यांची शाई स्पष्ट जशी-च्या तशीच असते; आणि शेवटचे दुधाचे तोडदांत कायम असतात. (पहा आकृति ४)




आकृति ४.

सौदागर लोकांची लबाडी. घोडा कच्चा असून भरज्वानींत आला असें दिसून चांगली किंमत यावी म्हणून सौदागर लोक राहिलेले दुधाचे तोडदांत मुद्दाम पाडतात.

पांचवें वर्ष. पांचव्या वर्षांत वरचे खालचे सगळे कायमचे दांत येतात. आतां खालच्या तोडदांतांपैकीं मधल्यांच्या कडा झिजून गेलेल्या असतात; आणि त्यांच्या गुळगुळीत झालेल्या पृष्ठभागावरची बहुतेक शाई जाऊन मध्यें

बारीक लकीर किंवा ठिपका रहातो. शेजारच्या दांतांवर सुमारें अर्ध्या पै एवढी शाई असून शेवटचे दांत बहुतेक जशाचे तसेच शाईसुद्धां कायम असतात. सुळे चांगले वर येतात आणि बाहेरच्या बाजूनें वाटोळे व आंतून खोलावलेले असतात. (पहा आकृति ९)




आकृति ५.

घोडा पांच वर्षांचा झाला ह्मणजे त्याच्या तोंडांत एकंदर चाळीस दांत असतात ते असे—खालच्या जबड्यांत सहा तोडदांत, दोन सुळे, आणि बारा दाढा मिळून वीस आणि वरच्या जबड्यांतही तितकेच मिळून एकंदर चाळीस. सुळे दांत साडेचार किंवा पांच वर्षांत पडून नवे येतात.


ह्या वर्षीं मधल्या दोन्ही दांतांची शाई अगदीं नाहींशी होते.

सहावें वर्ष. सहा वर्षांपुढें दांतावर पिंवळेपणा येतो. ह्या उमरीच्या सुमारास घोड्याच्या जबड्याची स्थिति आकृति ६ मध्यें दाखविल्याप्रमाणें अर्ध गोलाकार असते,



आकृति ६.

आणि दांत समोर हिरड्यांत खोल गढलेले असतात. (पहा आकृति ७)




आकृति ७.

सातव्या वर्षीं मधल्याच्या शेजारच्या दुसऱ्या दोन दांतांची शाई नाहींशी होते. आणि दांताची रचना आकृति ८ मधें दाखविल्याप्रमाणें असते. सातवें वर्ष.



आकृति ८.

आठवें वर्ष. आठव्या वर्षीं दुसऱ्या राहिलेल्या दोन शेवटल्या दांतांची शाई नाहींशी होऊन सगळ्या दांतांचा पृष्ठभाग बहुतेक सारखा दिसूं लागतो. (पहा आकृति ९).



आकृति ९.

उमर पाहण्याकरितां जी दांतांची शाई पाहण्याची ती खालच्याच दांतांची पाहिली पाहिजे. कित्येक घोड्यांचें तोंड पोपटाच्या तोंडासारखें असतें. अशा घोड्यांचें वय पाहतेवेळीं त्यांच्या दांतांच्या शाईवर आधार ठेवूं नये कारण त्यांचा वरचा जबडा लांब व खालचा आंखूड असल्यानें खालच्या दांतावरची शाई झिजत नाहीं; अशा घोड्याचें वय पाहणें झालें तर त्याच्या सुळ्यांवर जास्त लक्ष द्यावें. जवान घोड्याचे सुळे अणीदार, व त्यांचा बांक दांतांकडे असतो.

नऊ वर्षांनंतर. नऊ वर्षांनंतर सर्व सहाही दांतांची शाई नाहींशी होऊन पुढें घोड्यांचें वय ठरविण्यास चांगलेंसें साधन रहात नाहीं.

निरनिराळ्या वयाच्या घोड्याचीं नांवें.

ह्या देशांत शालिहोत्री चाबूकस्वार वगैरे लोकांत घोड्याच्या निरनिराळ्या वयाला निरनिराळीं नावें आहेत. एक वर्षापुढें व दुसरें वर्ष पुरें होईपर्यंत घोड्याला "नाकन," दोन वर्षाच्याला "दूवक," आणि चार वर्षाच्या उमरीच्या घोड्याला "चौसन" ह्मणतात. घोड्याला पांचवें वर्ष लागलें ह्मणजे तो "शुरू पंज" असें ह्मणण्याचा संप्रदाय आहे.

वयासंबंधानें ह्या देशांतील लोकांत पांच वर्षांपुढील वयाच्या घोड्याचीं वरच्यासारखीं विविक्षित नांवें सुद्धां नाहींत; कारण घोडा पांच वर्षांचा झाला ह्मणजे भर ज्वानींत आला अशी समजूत आहे.

घोड्याची पूर्ण वाढ.

शारीरशास्त्राप्रमाणें घोडयाच्या निरनिराळ्या अवयवांची वाढ आठ वर्षांच्या सुमारास पूर्ण होते. तेव्हां खरोखर पाहिलें तर ह्या वर्षापासून घोडा मजबूत होतो आणि तेव्हांपासून त्याला गाडींत वापरला पाहिजे. पण अशा तऱ्हेनें घोडयाचे सर्व अवयव चांगले परिपूर्ण होण्यासाठीं शिंग्राला लहानपणीं स्वच्छंदपणें मोकळ्या हवेवर कुरणांत ठेविलें पाहिजे. ती व्यवस्था ह्या देशांत होत नाहीं. शिवाय जनावराकडून काम लौकर घेण्याची

कोंवळ्या घोड्याकडून मेहेनत करविण्याचा परिणाम.


लोकांची अति आतुरता असल्यामुळें दोन वर्षांचे कोंवळें शिंग्रूं सुद्धां गाडीला जोडून चार पांच माणसें तींत बसून फिरतात. ह्याचा परिणाम काय होतो हें सांगणें नकोच. घोड्याचे अवयव परिपक्क होण्यापूर्वी शक्तिबाहेर त्याच्याकडून काम घेतल्यानें तो बिचारा पिचून जातो आणि आठ वर्षांच्या सुमारास त्याच्यावर ह्मातारपणाची कळा दिसूं लागते. ज्या जनावराचें बाल्यावस्थेंत चांगलें पोषण करून त्याचे अवयव सदृढ होण्याची तजवीज ठेविल्यानें वीस पंचवीस वर्षें काम देऊं शकणार अशा जनावराकडून उतावळीनें कोंवळ्या वयांत वाजवीपेक्षां जास्त मेहेनत करविल्यानें तें गरीब बिचारें लौकर खंगून जातें ह्यांत दोष कोणाचा आणि अखेर नुकसान कोणाचें? पण लोकांच्या उतावळीमुळें पडलेल्या परिपाठांत एकदम फेरफार होणें शक्य नाहीं ह्मणूनच पांच वर्षांपेक्षां तरी कमी वयाचा घोडा कधींही गाडींत घालूं नये असें माझें मत आहे.

कांहीं ग्रंथकारानीं फार सूक्ष्म कोटी लढवून आठ नऊ वर्षांपुढें घोड्याच्या दांतांच्या एकंदर रचनेंत व त्यांच्या पृष्ठभागावर कसकसे फेरफार होत जातात हें

निश्चित ठरविण्याचा यत्न केला आहे, पण त्यापासून खरोखर वयाची कितपत मुक्ररता करतां येईल याचा संशयच आहे.

नऊ वर्षांनंतर घोड्याचें वय ठरविणें.

नऊ वर्षां पुढें घोडा जसजसा म्हातारा होतो तसतसे त्याचे दांत पुढें येऊं लागतात, आणि ज्वानींत जी जबड्याची ठेवण आकृति ९ मध्यें दाखविल्याप्रमाणें अर्धगोलाकार असते ती पुढें प्रतिवर्षीं बदलत जाऊन अगदीं म्हातारपणीं आकृति १० मध्यें दाखविल्याप्रमाणें पुढच्या बाजूनें पसरट (लंब गोलाकार) होऊं लागते. जसजसें घोड्याचें वय जास्त होत जातें तसतसे त्याचे पुढले दांत हिरड्यांतून सुटून लांब व अरुंद दिसूं लागतात, आणि



आकृति १०.

त्यांच्यावरची शाई नाहींशी होत जाऊन त्यांच्यावर मळकट पिंवळा रंग चढतो. तसेंच डोळ्यांवरचे खळगे


जास्त खोल जाऊन त्यांत पांढरे केंस येऊं लागतात. पांढऱ्या रंगाशिवाय इतर रंगाच्या घोड्यांच्या पापण्यांवर हे केंस स्पष्ट दिसतात हें उघड आहे.

घोडा पांच वर्षांपेक्षां जास्त उमरीचा असून तो भर ज्वानींत आहे असें दाखविण्यांत फायदा असल्यामुळें लबाड व्यापारी त्याच्या दांतांची रचना बदलण्याचा अनेक प्रकारें यत्न करितात.


कमी वय दाखविण्याचे उपाय.

ह्मातार्‍या घोड्याचे दांत करवतीनें कापून त्यांच्या पृष्ठभागावर कोरणीनें खळगाकरून तो लोखंडाच्या तापविलेल्या सळईनें जाळून ती जागा काळी करितात आणि ज्वान घोड्याच्या दांतावरच्या शाईचा देखावा आणितात.

कोरणीनें केलेला कृत्रिम खळगा खोल, अगदीं भरलेला आकृती ११ मध्यें दाखविल्याप्रमाणें असतो; पण स्वाभाविक खळगा लांबट वांकडा तिकडा आकृति १२ मध्यें दाखविल्याप्रमाणें असतो. बारकाईनें पाहिल्यानें ही लबाडी सहज लक्षांत येते, जर कृत्रिम खळगा कुशल-



आकृति ११



आकृति १२.

तेनें बनविलेला असला तर चांगल्या अनुभविक परीक्षकाशिवाय दुसऱ्याला ओळखतां येणें कठीण.

डोळ्यांवरचे खळगे वाऱ्यानें भरून ठेवण्याच्या युक्तीचा सुद्धां केव्हां केव्हां कुशल व धूर्त सौदागर लोक उपयोग करतात; ह्मणून घोड्याचें वय मुक्रर करतेवेळीं फार दक्षता ठेवावी लागते.

घोडीचें वय पहाणें.

घोडीचें वय दांतांवरून समजत नाहीं. तिला सुळे दांत नसतात. वयाच्या मानानें तिच्या डोळ्यांजवळ केंस जास्त होत जातात, शेंडीजवळचें हाड पुढें निघूं लागतें अशा स्थूल खुणांवरून घोडीचें वय मुक्रर करतात.


ह्या देशांत घोडयाच्या जन्मासंबंधीं खात्रीपूर्वक दाखला वगैरे ठेवण्याची चाल नाहीं त्यामुळें वय खात्रीनें समजण्याची पंचाईत पडते; आणि ह्मणून तें ठरविण्यासाठीं पुष्कळ अनुभव पाहिजे. इंग्लंड वगैरे देशांतून घोडयाच्या वयाचा, अवलादीचा वगैरे चांगला दाखला ठेवण्याचा प्रघात असल्यामुळें अशा बाबतींची अडचण पडत नाहीं.

प्रकरण ४.

शरीराचा बांधा.

घोड्याचा आकार, शक्ति, निरोगीपणा आणि सौंदर्य ह्या बाबतींचाही फार बारकाईनें विचार करावा. तो चांगला लक्षांत येण्यासाठीं घोडयाच्या निरनिराळ्या अवयवांचीं नांवें माहीत असणें अवश्य आहे. तीं आकृति १३ आणि सोबतची यादी यांवरून सहज लक्षांत येतील.

घोडयाच्या अवयवांचीं नांवें.



आकृति १३

१ तोंड, मुसकट थूथन–Muzzle.
२ नाकपुडी–Nostril.
३ कपाळ–Forehead.
४ जवडा–Jaw.
५ मस्तक–Poll.
६ आयाळ–Mane.
७ घसा–Windpipe.
८ ककूद, वसवंड, मद्दू–Withers.
९–१० खांदा–Shoulderblade.
११–११ बाहू–True arm.
१२ खांद्याचें टोंक-Shoulderpoint.
१३ छाती, सीना–Chest.
१४ दंड–Fore-arm.
१५ पुढली नळी–Cannon-bone.
१६ नळीची नस–Back sinew of fore-arm.
१७ गुडघा–Knee.
२० गामची–Pastern.
१८, १९ मुद्रा–Fetlock.
२३ बगल, काख–Armpit.
२१ जिव्हाळी–Cornet.
२५ बरगड्या–Ribs.
२४–२४ तंगघेर–Girth.
२७ कंबर–Loins.
२६ पाठ–Back.
२९ शेंपटीची दांडी–Dock.
२८ पुट्ठा–Croup.
३० ढुंगण, कुल्ला–Whirl-bone, Round.
३१ खवाटा–Hip.
३२ कूस–Flank.
३३ कंबरसांध्याचें हाड–Stifle-joint.
३४–३८ मांडी–Thigh.
३५ मांडीचा मागला भाग–Quarters.
३६ कोष–Sheath.
३७ गुडघ्याचें समोरचें हाडें–Spavin-place.
३९ गुडघा–Hock.
४० गुडघ्याच्या जोडा खालचा भाग–Curb-place.
४१ गुडघ्याचें टोंक–Point of hock.
४२ मागली नळी–Cannon-bone.
४५ मागल्या नळीची नस–Back-sinew of hind leg.
४३, ४७ खूर–Hoof.
४४ मुद्रा–Fetlock.
४६ गामची, पायबंद- Pastern.

घोड्याच्या आकाराविषयीं विचार करण्यांत प्रथम त्याच्या उंचीचा निर्णय करावा. घोड्याची उंची पायाचा खूर सोडून तेथपासून मद्दू (ज्या ठिकाणीं आयाळाचे केंस संपतात तें पाठीवरचें हाड) पर्यंत घेतात. उंची मोजण्याची एक काठी मिळते तिनें माप घेतल्यास उत्तम; नाहींतर घोडा सपाट जाग्यावर सारखा उभा करून आपण त्याच्या पुढच्या पायांजवळ उभें रहावें आणि त्याचा मद्दू आपल्या शरीराच्या कोणत्या भागासमोर येतो हें पाहून तेथपर्यंतची आपल्या शरीरावर उंची मोजावी. दुसरा प्रकार असा कीं सरळ दांडीचा चाबूक घेऊन घोड्याच्या तोंडाकडे पाठ करून उभें रहावें आणि चाबकाची दांडी घोडयाच्या मद्दूला स्पर्श करते न करते अशा बेतानें आडवी धरून चाबकाच्या दोरीचें टोंक जमिनीला लागेपर्यंत दोरी खालीं सोडावी; नंतर त्या दोरीची लांबी मोजावी ह्मणजे घोड्याची उंची सहज कळून येईल. दोरी सोडतांना ती घोड्याच्या पायाला किंवा अन्य ठिकाणीं न लागे अशी खबरदारी ठेवावी नाहींतर घोडा स्थीर उभा राहणार नाहीं. घोड्याची उंची मोजण्यांत दर चार इंचाला

घोड्याची उंची मोजणें.

एक हात ह्मणतात; पण सदोदित प्रचारांत नुसतें चौदा दोन=(चौदा हात दोन इंच=अठ्ठावन इंच), पंधरा एक=(पंधरा हात एक इंच=एकसष्ठ इंच) असें बोलण्याचा संप्रदाय आहे.

ह्या देशांतील घोडे बहुशः फार उंच असत नाहींत. इंग्लंड व आस्ट्रेलिया येथील घोडे फार मोठे असतात.

ह्या देशांत साधारण चौदा दोन (५८ इंच) उंचीचा घोडा चांगला कामालायक मापाचा असें समजतात. मापाचा घोडा.

चौदा एक आणि तेरा तीन यांच्या मधील उंचीचा आडघोडा मानतात. आडघोडा.

तेरा तीन पेक्षां कमी उंचीच्या घोड्याला तट्टू (बट) ह्मणण्याचा प्रघात आहे. तट्टू.

अलीकडे ह्या देशांत "पोलो"* खेळण्याचा प्रचार जास्त झाल्यामुळें मुंबईच्या बाजारांत चांगल्या तट्टाची किंमत सहज पांच सहाशें रुपये पडते.

ह्या तिन्हींपैकीं आपणाला गाडीसाठीं किती उंचीचा घोडा घेणें आहे याचा पक्का विचार ठरवावा;

* घोड्यावर बसून लांब दांडीच्या लांकडी हातोड्यानें चेंडू मारण्याचा खेळ.

शिवाय जनावर घेणें तें अरबी, इराणी कीं देशी हेंही ठरवावें; कारण ज्या उंचीचें आणि ज्या जातीचें जनावर खरेदी करणें असेल त्या बेतानें पैसा खर्च करावा लागतो.

आकार. घोड्याची उंची किती हा निश्चय झाल्यानंतर त्याच्या शरिराची एकंदर रचना कशी आहे, निरनिराळ्या अवयवांची ठेवण कशी आहे, त्या अवयवांत कांहीं शारीरिक व्यंगें अथवा रोग आहेत कीं काय वगैरे तपासण्याला सुरुवात करावी.

घोडा मैदानांत तपासावा. तबेल्यांत बांधलेल्या घोड्याजवळ जाऊन पाहिल्यानें त्याच्या शरिराच्या निरनिराळ्या अवयवांचें एकमेकांशीं प्रमाण कसें आहे हें लक्षांत येत नाहीं ह्मणून घोडा बाहेर मैदानांत आणून त्याचें सगळें शरीर एकदम नजरेस येईल इतक्या अंतरावर (सुमारें दाहा हातांवर) उभें राहून घोडा पहावा. प्रथम त्याच्या बाजूला उभें रहावें ह्मणजे घोडा लांब किंवा आंखूड, तसेंच उंच कीं ठेंगणा व साधारण अवयवांची ठेवण कशी आहे हें ध्यानांत येतें.

वसवंडा (मद्दू)पासून पुढल्या पायांच्या बाजूनें जमिनीपर्यंतच्या उंचीपेक्षां छातीपासून मांडयांच्या मागल्या

बाजूपर्यंतचें माप जास्ती भरल्यास तो घोडा लांब असून ठेंगणा असतो. हा घोडा बहुतकरून हरकामी होय. लांब असून ठेंगणा घोडा.

ज्या ठिकाणीं उभें राहून आपण घोड्याला तपासण्याची सुरवात केली तेथूनच त्याची मान आणि पुठ्ठा कशीं आहेत तीं पहावीं. हे दोन्ही अवयव चांगले बांकदार असून भरलेले असावे; तसेंच मांड्याही मांसल असाव्या. निमुळत्या मानेचा किंवा उतरत्या पुठ्याचा किंवा चपट्या मांड्यांचा घोडा बेडौल दिसून कामालाही कच्चा असतो. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं घोडा आंगानें भरला ह्मणजे हीं व्यंगें नाहींशीं होतात. विकत घेणाराची असली कांहीं समजूत आहे असें सौदागराला वाटलें कीं तो गिऱ्हाइकाची तारीफ करून त्याच्या येथील दाण्यापाण्याची प्रशंसा करतो आणि आपल्या जनावरासंबंधानें त्याला भुरळ घालतो. पण एक गोष्ट सदोदित लक्षांत ठेविली पाहिजे कीं खाण्यापिण्यानें एकंदर शरीर पुष्ट होतें, एकच भाग वाढत नाहीं; तेव्हां घोडा रोड असतां पुठ्याचें किंवा मानेचें शरिराच्या इतर भागांशीं जें प्रमाण तेंच तो लठ्ठ झाल्यानेंही राहणार. शिवाय शरिराचा नैसर्गिक बांधा कधींही बदलत

मान, पुठ्ठा, वगैरे.

सौदागराचें वाक्चातुर्य.

नाहीं. घोड्याचा व्यापार करणारांची गिऱ्हाइकाला फसविण्याची सर्व देशांत ख्याति आहे. पाश्चिमात्य लोकांत सुद्धां अशी ह्मणच पडली आहे कीं ' सौदागर आपल्या बापाला देखील फसविण्यास चुकणार नाहीं ' !!

घोड्याचा कोटा. तंगाच्या जाग्याजवळ घोड्याचा घेर चांगला विपुल असावा. पण ज्या घोड्याची छाती रुंद असते त्याचा तंगाजवळचा घेर कमी असतो. रुंद छातीचा घोडा मजलेच्या व मेहनतीच्या कामीं जास्त उपयोगी ह्मणून छाती रुंद असली तर तंगाजवळच्या घेराची फार चिकित्सा करण्याचें प्रयोजन नाहीं.

"अहुशिकम." कितीएक घोड्यांच्या कुशी अगदीं आंवळलेल्या असतात; असले घोडेही मजबुतीला कमी. त्यांला हिंदुस्थानींत " अहुशिकम " ह्मणतात.

घोड्याच्या समोर उभें राहून त्याची छाती आणि पुढले पाय यांचें अवलोकन करावें.

छाती. छाती रुंद असून मांसल असावी. घोड्याची छाती रुंद असली ह्मणजे अर्थात्च त्याचे पुढचे पाय एकमेकांपासून पुष्कळ अंतरावर असतात आणि ते एकमेकांवर

यांसून घोडा लंगडण्याचा संभव कमी. रुंद छातीच्या घोड्याला श्वासोच्छ्वास सुलभ रीतीनें करतां येतो ह्मणून असला घोडा मजलेच्या कामीं चांगला उपयोगीं पडतो.

घोड्याचे पुढले पाय सरळ असावे; आंत किंवा बाहेर फिरलेले असणें हीं दोन्ही व्यंगेंच पण किंचित् बाहेर फिरलेले असले तर फारशी हरकत नाहीं. एक पाय फिरलेला आणि एक सरळ हें मात्र वाईट. पुढले पाय.

पायांच्या नळ्या अगदीं साफ असाव्या; त्यांच्यावर आंतल्या किंवा बाहेरच्या बाजूला गांठी असूं नयेत. असल्या गांठी पुष्कळ घोड्यांला असतात. त्यांचा शारीरिक व्यंगांविषयीं विवेचन करतेवेळीं विचार होईल.

ढोंपर किंवा गुडघा रुंद आणि भक्कम असावा. ढोंपरापासून नेवरापर्यंत पायाचा भाग साफ असून हाडें आणि शिरा स्पष्ट दिसत असतील असा असावा. ढोंपर.

नेवराचे जागीं घोड्याचे पाय फार दबलेले किंवा फार उभे नसावे. घोडा उभा असला ह्मणजे नेवर.

नेवरांचा जमिनीशीं ४०।६० अंशाचा कोन होईल इतके दबते असावे.

खूर. खूर अगदीं काळेभोर असून कोठेंही तडकलेले नसावे.

मांड्या, कुल्ले वगैरे. घोड्याच्या पाठीमागें उभें राहून त्याच्या मांडया कुल्ले आणि मागल्या पायांचे गुडघे यांची ठेवण कशी आहे ती पहावी. त्यांत विशेषतः त्याचे कुल्ले कसे आहेत हें लक्षांत घ्यावें. ते चांगले मांसल असून एकमेकांशीं लागलेले असावे (ह्मणजे मलद्वाराच्या खालचा भाग पोकळ असूं नये.)

घोड्याच्या मागल्या भागांत महत्वाचा भाग मांडीचा सांधा होय. तो चपटा असून त्याच्यावर मेद (चर्बी) वाढलेली नसावी. तो सांधा उतरता असावा.

"कुलंज." कोंवळ्या वयांत घोडे चढाऊ केल्यानें त्यांचे मागील गुडघे आंत वळतात आणि एकमेकांवर घांसूं लागतात हें वाईट ह्मणून या बद्दलही चांगली खात्री करून घ्यावी. अशा प्रकारें ज्या घोड्याच्या मागल्या

पायांचीं ढोंपरें घांसतात त्याला "कुलंज" ह्मणतात. ह्या शिवाय ह्याच गुडघ्याला कितीएक रोग होतात त्यांचें विवेचन पुढें करण्यांत येईल.


घोड्याच्या समोर उभें राहून त्याच्या कपाळाची रचना ध्यानांत घ्यावी.

दोन्ही कानांच्या मध्यें कपाळ अरुंद असावें, कपाळ.
दोन्ही डोळ्यांच्या मध्यें रुंद असून नाकपुड्यांमध्यें फिरून अरुंद असावें, तसेंच डोळ्यांपासून नाकपुड्यांपर्यंत किंचित् खोलगट असलेलें चांगलें. तोंड पुढें अगदीं निमुळतें असावें.

जातवंत घोड्याच्या नाकपुड्या तो शांत उभा नाकपुड्या.
असला ह्मणजे आकुंचित् झालेल्या असतात पण तो धांवूं लागला ह्मणजे त्या फुगून रुंद होतात आणि त्यांच्या आंतल्या बाजूची त्वचा लालभडक होते. सारांश ज्या घोड्याच्या नाकपुड्या धांवतांना फुगतात तो घोडा मेहनतीला चांगला.

जबडा आणि गालफडांचीं हाडें रुंद असावीं जबडा.
ह्मणजे त्यापासून घोड्याला श्वासोच्छ्वास करण्यास अडचण पडत नाहीं आणि शिवाय मान चांगली वांकवून धरतां येते.

डोळे. डोळे पुढें आलेले असावे. डोळ्यांवरून घोड्याचा स्वभाव आणि त्याची शरीर प्रकृति या दोहोंचेंही अनुमान करतां येतें. ज्या घोड्याचे डोळे पाणीदार असून मोठे असतात तो स्वभावानें निर्मळ असतो, तसेंच त्याची प्रकृतीही निरोगी असल्याचें हें द्योतक होय. ज्या घोड्याची शरीरप्रकृति चांगली नसते त्याच्या डोळ्याच्या पापण्या पडलेल्या आणि एकंदर डोळा निस्तेज असतो.



आकृति १४.

कान. कान आंखूड असून त्यांचीं टोंकें अणीदार असावीं. कानांवरही घोड्याच्या धीटपणाचें आणि चलाखीचें अ-

नुमान बांधतां येतें. हें घोड्याच्या सौंदर्याचें वर्णन आकृति १४ चें मननपूर्वक अवलोकन केल्यानें ध्यानांत येईल.

जातवंत घोड्याच्या कानांचें चलन वलन.

उत्तम अरबी घोड्याचे कान तो तबेल्यांत असला ह्मणजे अगदीं गळलेले असतात पण तोच बाहेर निघाला ह्मणजे ते एकदम तरतरीत होऊन मागें पुढें असे हालूं लागतात. जातवंत घोड्यावर बसलेल्या स्वारानें फक्त त्याच्या कानाच्या चलनवलनाकडे नीट लक्ष ठेवलें तर त्याला अडी अडचणीची किंवा घोड्याची अन्य तऱ्हेनें फारशी खबरदारी ठेवण्याचें कारण नाहीं असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं.

प्रकरण ५.

खांद्याची रचना.

खांद्याच्या हाडांचें महत्व.


घोड्याच्या खांद्याच्या हाडांच्या ठेवणीवर त्याची चाल पुष्कळ अंशी अवलंबून असते. निरनिराळ्या घोड्यांच्या हाडांच्या रचनेंत फारच थोडा फरक असतो, तेणेंकरून खांद्याची ठेवण चांगल्या रीतीनें समजणें बरेंच कठीण आहे आणि तत्संबंधीं पुष्कळ अनुभव मिळाल्याशिवाय अमूक घोड्याचा खांदा स्वारीलायक, अमक्याचा गाडीच्या बेताचा किंवा अमक्याच्या खांद्याची रचना अशी कीं तो चालतांना अडखळेल अशी खात्रीपूर्वक सांगतां येणें नाहीं.

खांद्याची परीक्षा.

घोड्याच्या खांद्याची परीक्षा तीन स्थितींत करावी; (१) तो स्तब्ध उभा असेल तेव्हां (२) दुसऱ्यानें त्याची लगाम हातांत धरून आपल्या समोर तो चालवीत असतांना (३) स्वतः त्याच्या पाठीवर बसून त्याची गति लक्षांत आणून.

खांद्याचें हाड रुंदट चपटें असतें. तें वसवंडापा- खांद्याचें हाड.

सून छातीपर्यंत पुढच्या झों-
कावर तिरकस बसलेलें अ-
सतें (आकृति १९—१),
तें जितकें जास्त तिरकस
तितकी घोड्याची चाल
चांगली. शिवाय घोड्या-
च्या बगलेपासून या हाडा-
च्या खालच्या टोंकापर्यंत
जें हाड (२) असतें त्या-




आकृति १५.

च्या ठेवणीवरही घोड्याची गति पुष्कळ अंशी अवलं-
बून असते.

ढोंपरापासून बगलेपर्यंतच्या पायाच्या भागांतील "ह्युमेरस."
हाडाच्या वरच्या टोंकापासून खांद्याच्या हाडापर्यंत
पुढच्या झोंकावर बसलेल्या हाडाला (आकृति १९—२)
"ह्युमेरस" ह्मणतात. खांद्याचें हाड बरेंच पुढें झुकलेलें
आणि "ह्युमेरस" किंचित् सरळ असलेलें चांगलें. ह्या
मुद्याकडे दुर्लक्ष केल्यानें घोड्याच्या खांद्याविषयीं अ-
नुमान करण्यांत चूक होते.

खांद्याच्या हाडाची वाईट ठेवण.

"ह्युमेरस" हाड जितकें समूर उभें असेल तितकी पायाची ठेवण चांगली पुढें असते, पण खांद्याचें हाड समूर (३) आणि "ह्युमेरस" हीं समूर (४) आकृति १६ प्रमाणें असेल तितकी पायाची ठेवण मागें असते; अशी मागें असलेली ठेवण वाईट.




आकृति १६.


चांगली ठेवण.

आकृति १५ मध्यें दाखविल्याप्रमाणें खांद्याच्या हाडांची ठेवण असली ह्मणजे घोड्याला चालतानां पाय चांगला उचलून टाकतां येतो व अशा घोड्याची गति चांगली आणि चालींत धक्का असत नाहीं.

घोड्याचें शरीरही एक चौकोनी पेटी आणि


आकृति १७.

त्याचे पाय हे चार खांब अशी कल्पना केली तर त्या घोड्याचे पाय. पेटीचा (अर्थात् घोड्याच्या शरिराचा) भार चारही पायांवर सारखा वांटलेला आकृति १७ मध्यें दाखविल्याप्रमाणें असणें इष्ट होय. पण जर दोन पाय एका टोंकांपासून



आकृति १८.

आकृति १८ प्रमाणें आंत असले तर त्या टोंकांकडील भार सांवरून धरण्यासाठीं खांब विशेष मजबूत पाहिजेत. परमेश्वरी योजना अशी आहे कीं शरिराच्या ज्या भागांवर जास्त भार पडण्याचा संभव त्या भागांत अस्थि स्नायु वगैरेचा जास्त पुरवठा असतो. या नियमानुसार ज्या घोड्याच्या पुढल्या पायांची ठेवण आकृति १८ प्रमाणें आंत असते—ह्मणजे ज्याचें खांद्याचें हाड जास्त समूर असतें—त्याचे पुढले पाय जास्त भक्कम

दुहेरी हाडाचे पाय.

दिसतात; एवढ्यावरूनच किती एक लोक ह्मणतात कीं " खांद्याची ठेवण जरा चांगली नाहीं खरी पण पाय कसे दुहेरी हाडाचे भक्कम आहेत ". जर खांद्याचें हाड समूर किंवा "ह्युमेरस" फार तिरकस असून पाय दुहेरी हाडाचे असले तर त्यांत फारसा अर्थ नाहीं. खांद्याचें हाड चांगलें पुढें तिरकस आणि "ह्युमेरस" सरळ असून पाय दुहेरी हाडाचे असतील तर उत्तम.


गाडीच्या घोड्याचा खांदा किंचित् कमी तिरकस असला तरी चालतो.

पाय टाकण्याच्या शैलीवरून खांद्याची परीक्षा.

घोड्याची पाय टाकण्याची शैली कशी आहे तें तपासण्यासाठीं घोड्याचा लगाम अगदीं सैल त्याच्या मानेवर टाकावा आणि त्याला आपल्या सभोंवतीं मोठ्या मंडळावर प्रथम कदम चालीनें चालवावा आणि नंतर चौक चालीवर धांवडवावा.

ज्या घोड्याच्या खांद्याची रचना चांगली असते तो कदम चालींत आपलें डोकें वर ठेवून न अडखळतां लांब पाय टाकून चालतो. खांद्याची ठेवण दुडक्या चा-

ळींत चांगली समजते. दुडक्या चालीनें (ही गाडीची चाल) चालण्यासाठीं घोड्याला आकृति १९ मध्यें दा- दुडकी चाल.



आकृति १९.

खविल्याप्रमाणें पुढले पाय वर उचलून दूर पुढें टाकावे लागतात. लांब पावलें टाकून दुडक्या चालीनें घोडा जितक्या झपाट्यानें चालेल तितका गाडीच्या कामाला चांगला आणि गाडी हांकणाराला समाधानकारक होतो. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत घोड्याला दुडक्या चालीवर फार झपाट्यानें चालण्यास शिकवितात.

पावलें जवळ पडण्याचा परिणाम.

कांहीं घोडे भराभर पाय टाकतात असें दिसतें पण त्यांचीं पावलें दूर न पडतां जवळ जवळ पडतात. असले घोडे साधारण सपाट जमिनीवर बरेच चालतात पण उंच सखल जमिनीवर वारंवार ठेंचळतात. असले घोडे एखाद्या वेळीं ठेंच लागून अडखळले तर त्यांचा त्यांला तोल सांवरत नाहीं. ह्या घोड्यांच्या खांद्याच्या ठेवणींत विशेष व्यंग असतें. चौक चालीनें घोडा चालत असतां त्याच्या मागल्या पायांचीं पावलें पुढल्या पायांच्या पावलांपुढें पडतात कीं त्यांच्यावरच, पडतात हें चांगलें लक्षपूर्वक पहावें. ज्या घोड्याच्या मागल्या दोन्ही पायांचीं पावलें जुळून पुढल्या पायांच्या पावलांपुढें पडत असतील त्याच्या खांद्यांच्या हाडांची रचना चांगली आहे असें समजावें.

घोड्यावर बसून त्याच्या खांद्याची परीक्षा करणें.

घोड्यावर बसून सडकेवर हळू हळू चालावें आणि ज्या ठिकाणीं सडकेच्या बाजूला पांच सात इंच उंच बांधलेली पाउलवाट असेल तिच्यावर घोडा न्यावा. त्याची लगाम सैल सोडून थोडासा पाउलवाटेवर चालवावा आणि त्याला तसाच खालीं उतरण्याचा इषारा करून लगाम अगदीं ढिली सोडून स्वतः डोळे

मिटून बसावें. जर घोड्याच्या खांद्याची रचना चांगली असली तर तो घोडा अगदीं बिनआयासांनीं खालीं उतरेल, इतकेंच नव्हे पण बसणाराला यत्किंचित् धक्का लागणार नाहीं आणि घोडा पाउलवाटेवरून केव्हां उतरला हें सुद्धां कळणार नाहीं. जर खांद्यांची ठेवण असावी तशी नसली तर तो घोडा उतरतांना अडखळेल किंवा जो पुढला पाय त्याणें पुढें टाकला असेल त्या बाजूला गचकून खालीं गेल्यासारखा भास होऊन बसणाराला चांगला हिसका बसेल. मला स्वतःच्या अनुभवावरून ही युक्ति फार सोपी आणि सोईची वाटते.

घोड्याची मान त्याच्या खांद्याच्या हाडाशीं काटकोनांत असते आणि तें हाड जितकें उभें किंवा उतरतें असेल त्या बेतानें ती वर खालीं रहाते. ह्मणून घोडा स्थिर उभा असतांना तो आपली मान कितपत उंच ठेवतो हें लक्षांत घेतल्यानें खांद्यांच्या ठेवणीचें बरेंच अनुमान करतां येतें.

प्रकरण ६.

स्वभाव.

कुजक्या दुष्ट स्वभावाचा घोडा गाडींत वापरणें जोखिमीचें होय. असला घोडा गाडीला व आंत बसणाराला केव्हां अपाय करील याचा नेम नाहीं. घोड्याला

दुष्ट घोडा.

पांच सात वेळ आपल्या समोर निरनिराळ्या चालीनें चालविलें ह्मणजे तो चिडखोर, हट्टी वगैरे आहे कीं काय हें सहज दिसून येतें. शिवाय स्वभाव ओळखण्याचीं दोन तीन स्थूल लक्षणें आहेत. सहज घोड्याजवळ गेलें असतां जो घोडा कान मागें पाडतो तो चिडखोर असें समजावें.

चांगल्या स्वभावाचा घोडा ओळखणें.

मैदानांत स्तब्ध उभा असतां जो कान मागें पुढें फिरवून चोंहींकडे पहातो तो उत्साही आणि तीव्र स्वभावाचा असतो. तसेंच ज्या घोड्याचे डोळे मोठे पाणिदार, पुढें आलेले आणि एकमेकांपासून दूर असतात तो घोडा सहनशील व मोकळ्या मनाचा असतो.

घोडा ठाणावर बांधलेला असेल तेव्हां किंवा मोतद्दारानें धरून उभा केला असेल त्यावेळीं त्याच्या पाठीवरून हात फिरविला असतां शेंपटी वर उचलून धरतो तो घोडाही साफ मनाचा जाणावा.

सवड असेल तेव्हां घोडा मोकळ्या जाग्यावर उभा करून आपण कांहीं अंतरावर उभें रहावें आणि त्याच्या पुठ्ठ्यावर अगदीं बारीक हरभऱ्याएवढा खडा त्याला न कळतां हलक्या हातानें मारावा. जर घोडा गंभीर शांत असला तर नुसता आंग शहारवून कान टवकारून दोन चार पावलें दूर जाऊन उभा राहील आणि चिडखोर असल्यास दुगाण्या झाडूं लागेल; पण अगदीं लठ्ठ असला तर त्याला कांहींच कळून आल्याचें दृष्टोत्पत्तीस येणार नाहीं.

कितीएक घोड्यांला लाथा मारण्याची किंवा अडून एकाच जाग्यावर उभें रहाण्याची खोड असते. असले घोडे गाडीच्या उपयोगाचे नाहींत.

घोड्याच्या स्वभावाची परीक्षा त्याला तास अर्धा तास निरनिराळ्या तऱ्हेनें फिरविल्यानें करतां येते.

गाडीचा घोडा कसा असावा.

गाडीचा घोडा शांत सहनशील आणि स्वच्छ मनाचा असावा. साधारण द्वाड घोड्याला योग्य काळजी घेऊन शिकविलें तर तो आपला द्वाडपणा टाकून देतो; पण ज्याला स्वतः घोडा शिकविण्याचा किंवा निदान हांकण्याचा सराव नसेल त्याणें होतां होईल तों द्वाड घोडा आपल्या गाडीला वापरूं नये.

प्रकरण ७.

शारीरिक व्यंगें.

कांहीं घोडे थोडेसे चालले तरी श्वास टाकतांना त्यांच्या गळ्यांत एक प्रकारचा घोगरा आवाज होऊं लागतो. हें जरी व्यंग आहे तरी जर आवाज फार होत नसला तर असला घोडा अगदीं टाकाऊ समजूं नये; बाकी सर्व बाबतींनीं चांगला असून फक्त गाडीच्याच उपयोगासाठीं घेणें असेल तर तो घोडा घेण्यास फारशी हरकत नाहीं.

तणस—(String-halt) घोडा तबेल्यांतून बाहेर आणवून चालवूं लागलें ह्मणजे तो मागला एक पाय आंखडून उचलून जमिनीवर ठेवतो आणि अशीं पांचपंचवीस पावलें चालल्यावर मग साफ चालूं लागतो. ह्याची दिसण्यांत व्यंग्यापेक्षां कांहीं हरकत नाहीं.

फुगलेले मुट्टे-(Ossified fet-locks) हे घोड्याला काम पुष्कळ पडल्यानें होतात, आणि त्यापासून

मुठ्यांच्या हाडांचे सांधे एकमेकांशी चिकटून जाऊन ते फुगीर दिसूं लागतात. मुठे फार फुगलेले नसून घोड्याला बेताचें काम आणि मुठ्यांची वेळच्यावेळीं चांगली मालीष करण्याची खबरदारी ठेविली तर असला घोडा घेण्यास हरकत नाहीं अशी कितीएकांची समजूत आहे.

मोत्रा—(Curbs, or curby hocks.) हा रोग मागल्या पायांच्या ढोंपराच्या सांध्याखालीं मागल्या बाजूला होतो (पहा आकृति २३ क). घोड्याचा मागला पाय ढोंपरापासून खालपर्यंत आकृति २० मध्यें दाखविल्याप्रमाणें सरळ असावा, इतकेंच नव्हे परंतु आकृति २१ मध्यें दाखविल्याप्रमाणें ढोंपराची मागली धार सरळ, साफ असावी. ह्या माझ्या ह्मणण्याचा अर्थ आकृति २१ आणि २३ क यांची तुलना करून पा-

आकृति २०.



आकृति २१.




हिल्यानें सहज लक्षांत येईल. आकृति २० मध्यें दाखविल्याप्रमाणें घोड्याचा मागला पाय सरळ असला ह्मणजे त्याच्या शरीराचा भार नुसत्या शिरांवर न पडतां पायाच्या नळीच्या हाडावर रहातो; पण आकृति २२ मध्यें दाखविल्याप्रमाणें पाय आंत वळलेला असला ह्मणजे शरीराचा भार विशेषतः पायाच्या मागल्या शिरेवर पडतो, तो सहन करण्यासाठीं शारीरिक नियमांप्रमाणें शिरेच्या ज्या भागावर विशेष ओझें पडतें (ह्मणजे ढोंपराच्या टोंकाजवळ) तेथें गांठी होऊं लागतात; त्या जसजशा टणक होत जातात तसतसें त्यांचें इतर शिरांवर आणि स्नायूंवर घर्षण होऊं लागतें. हें घर्षण चालतांना जास्त होतें तेव्हां सहजच घोडा लंगडतो. एकदां ह्या गांठींची वाढ पूर्ण झाली ह्मणजे फारशी अडचण रहात नाहीं. तत्रापि मोत्रे फुटलेल्या पायांचा घोडा मेहेनतीच्या कामीं उपयोगी नाहीं. घोड्याला दोन पायांवर

आकृति २२.



उभें करणें, लंगोरी उडवणें किंवा तो गाडींत चालत असतांना वरचेवर एकदम झटक्यानें उभें करणें यापासून प्रायः हा रोग होतो. घोड्याचा चांगला निरोगी पाय आकृति २१ मध्यें दाखविला आहेच. जरी दिसण्यांत पाय चांगला असला तरी पुढें मोत्रे फुटण्याचा संभव असला तर पायाची रचना आकृति २३ अ प्रमाणें असते. ह्याची आकृति २१ बरोबर चांगली बारकाईनें तुलना केल्यानें सहज तफावत करून येईल.



आकृति २३.

आकृति २३ ब मधील पाय जरी निरोगी तरी त्याची ठेवण चांगली असें ह्मणतां येत नाहीं. आकृति २३

क तर स्पष्ट मोत्रे फुटलेल्या पायाचें चित्र होय. ज्या घोड्याला मोत्र्याचा दर्द झालेला असतो त्याच्या गुडघ्यांच्या हाडांचे सांधे जखडून जाऊन पायाची लचक नाहींशी होते, आणि घोडा आपला पाय चांगला उचलून मुरडून टाकूं शकत नाहीं; हें वर सांगीतले आहेच. त्यापासून पायाच्या खुराची पुढली धार झिजून जाते. मोत्र्याचा पाय ओळखण्याची ही एक खूण आहे.

ज्या घोड्याला हा रोग झालेला असतो तो तबेल्यांतून बाहेर निघतांना त्याचा पाय लांकडाच्या तुकड्यासारखा कडक झालेला दृष्टीस पडतो पण घोडा तसाच कांहीं वेळ चालला ह्मणजे त्या पायांत गरमावा येऊन पाय बराच लवचीक होऊन वळूं लागतो. अशा वेळीं हें व्यंग ओळखण्यास अडचण पडते. लबाड सौदागर हें व्यंग छपवून गिऱ्हाइकाला फसविण्यासाठीं घोड्याला बाहेर काढण्यापूर्वीं त्याच्या पायांची खूब मालीष करून पायांत गरमावा आणून मग घोडा दाखवितात. हा रोग तरुण घोड्याच्या पायांला असला तर हजार हिशांनीं तो घोडा पुढें लंगडूं लागतो.

ज्याप्रमाणें मागल्या पायांच्या ढोंपराच्या मागल्या बाजूला मोत्र्यांच्या गांठी होतात तशाच पायांच्या

आंतल्या बाजूलाही केव्हां केव्हां होतात त्याला इंग्रजी अश्ववैद्यशास्त्रांत **स्पॅव्हिन्स** ह्मणतात. ह्मातान्या घोडयाला स्पॅव्हिन्स असले तरी फारशी हरकत नाहीं कारण उतारवयांत तो रोग जास्त होण्याची धास्ती नसते. तत्रापि असल्या रोगाचा घोडा जरी वयानें जास्त असला तरी न घ्यावा हें उत्तम.

बेरहड्डी—(Splints) हा रोगही पायाच्या नळ्यांचाच होय. हा बहुतकरून घोड्याच्या पुढल्या पायांला होतो. तो गुडघ्यापासून पायाच्या मुट्ट्यांपर्यंत बहुशः नळीच्या आंतल्या बाजूला होतो. कधीं कधीं बाहेरच्याही बाजूला होतो. घोडयाच्या पायाजवळ उभें राहून पायाची नळी आंगठ्यानें चांचपीत खालीं मुट्ट्यापर्यंत यावें; जर एखादी टणक गांठ हाताला लागली तर ती बेरहड्डी ह्मणून समजावी. आकृति २४ मध्यें पुढल्या पायाला गुडघ्याखालीं मोठी बेरहड्डी निघालेली दाखविली आहे.



आकृति २४.

ज्वान घोडयाला बेरहड्डी असून तो घोडा लंगडत नसला

तरी पुढें लंगडूं लागण्याचा संभव असतो. हाडाची गांठ फार वाढली नसली तर ती नाहींशी करतां येते. या देशांत पुष्कळ लोक बेरहड्डी खात्रीनें नाहींशी करतात; पण बेरहड्डीचा घोडा विकत घेऊन मग ओषधोपचार करून रोग बरा करीत बसण्याची ज्यास हौस असेल त्याणेंच असला घोडा घ्यावा.

चक्रावळ—(Ring-bone) ज्या घोड्याला त्याच्या शक्तीबाहेर ओझें ओढावें लागतें त्याला हा रोग होतो. बहुतकरून भाडोत्री गाड्यांच्या घोड्यांला किंवा गाड्यांतून समावेश होईल तितक्या स्वाऱ्या बसून गाड्या ओढण्याचें ज्या बिचाऱ्या घोड्याच्या सदोदित नशीबीं असतें त्या घोड्याला हा रोग होतो.

आकृति २५.




हा रोग खुरावरच्या केंसांजवळ होतो. हा झाल्यानें खुराजवळच्या लहान लहान हाडांचे सांधे एकमेकांशीं चिकटून जातात. ज्या घोड्याला हा दर्द असतो त्याच्या खुराजवळचे केंस चांगले मृदु खालीं पडलेले न राहतां उसकटलेले असे दिसतात आणि घोडा लंगडतो; शिवाय त्याचा खूर त्याला जमिनीवर सपाट ठेवतां येत नाहीं; (पहा आकृति २९).

तसेंच हा रोग ज्या घोड्यांचा फरा व गळा सीधा असतो त्यांस विशेष होतो. आईबापांस हा रोग असेल तर तो त्यांच्या संततीला होतो.

चालतांना कांहीं घोड्यांचा पुढला एक पाय दुसऱ्या पायाच्या गुडघ्याजवळ आंतल्या बाजूला हापटून तेथील केंस गेलेले असतात. ह्याप्रमाणें एखाद्यावेळीं खुराची धार दुसऱ्या पायाच्या शिरेवर हापटली तर इतकी कळ निघते कीं घोडा बेभान होऊन खालीं पडतो ह्मणून ह्या खोडीचा घोडा गाडीच्या उपयोगीं नाहीं. तसेंच ज्या घोड्याचे नेवर लागतात—ह्मणजे एका पायाचा खूर केव्हां केव्हां दुसऱ्या पायाच्या मुठ्यावर हापटतो—तेव्हां त्या ठोक्यानें घोडा ती कळ नाहींशी होईपर्यंत लंग करतो. खूर हापटत असल्याची मुठ्यावर निशाणी झालेली असते. ही खोड वरच्या खोडी इतकी भयंकर नाहीं. आणखीही असलीच एक खोड कांहीं घोड्यांला असते ती अशी—चालतांना मागले पायाच्या खुराची धार पुढल्या पायाच्या टांचेवर हापटते. ही खोड फारशी बाधक नसून नालबंदी करण्यांत बरीच सुधारून घेतां येते.

काहीं घोड्याच्या पायांचे सगळे खूर किंवा एखादा खूर आकृति २७ मध्यें दाखविल्याप्रमाणें तडकलेला असतो. ह्या भेगींला योग्य उपाय करून नीट करतां येतें खरें परंतु त्या फिरून होण्याचा संभव विशेष असतो ह्मणून असला घोडा जाणून विकत घेऊं नये.



आकृति २६.

घोडा विकत घेण्यापूर्वीं त्याच्या पायांचे तळवे नीट तपासून पहावे. पायांला नाल असले तर नाल काढवून सुद्धां तपासून पहाण्याला आळस करूं नये. कारण तळव्यालाही अनेक रोग असतात.

कितीएक घोडे वारंवार ठेंच लागून पुढल्या पायांच्या गुडघ्यावर पडतात. असले घोडे गाडीच्या उपयोगीं नाहीं. ज्या घोड्याला याप्रमाणें पडण्याची खोड असते त्याच्या गुडघ्यावरचे केंस गेलेले असतात.

घोड्याच्या पायालाच विशेष विकृति होतात, आणि तो चांगल्या रितीनें आपल्या उपयोगांत यावा

असें असेल तर त्याचे पाय चांगले तपासून पहाणें जरुरीचें होय. त्याचप्रमाणें डोळेही चांगले बारकाईनें पाहिले पाहिजेत. घोड्याच्या तोंडाजवळ उभें राहून त्याच्या प्रत्येक डोळ्याकडे तळहात हळू हळू न्यावा. जर डोळ्यांत कांहीं विशेष व्यंग असेल तर घोडा आपला डोळा न मिटतां तसाच ठेवील ह्मणजे त्या डोळ्यानें त्याला दिसत नाहीं असें समजावें.

मूजोर घोडा. लहानपणीं घोड्याला कडक लगाम घातल्यानें त्याच्या तोंडाच्या बेचकांला घट्टे पडून तेथील कातडी कठीण होते आणि पुढें त्याला लगामीचा इषारा कळेनासा होतो, तेव्हां अर्थात् लगामीला न जुमानतां तो मनास वाटेल त्याप्रमाणें ओढूं लागतो. अशा घोड्याला मूजोर घोडा ह्मणतात. हा घोड्याचा दुर्गुण ह्मणण्यापेक्षां वापरणाराचा आडाणीपणा किंवा निर्दयपणा ह्मटला पाहिजे. घोडा जर फारच मूजोर असेल तर गाडींत चालतांना तो गाडी केव्हां कोणीकडे ओढून नेईल याचा भरंवसा नसतो. पण जो घोडा मुद्दाम दांतांत लगाम धरून रासपट्टचा धरणाराच्या इषाऱ्याला न जुमानतां पळत सुटतो तो खास द्वाड आणि दुष्ट. असला घोडा गाडींत नसावा.

अलीकडे या देशांत भपकेदार जाहिराती प्रसिद्ध करून माल विकण्याचा पाश्चिमात्य तऱ्हेचा बराच प्रघात पडत चालला आहे. त्याच धोरणानें घोड्यांबद्दल ही वर्तमानपत्रांतून वेळोवेळीं घोड्यांचे व्यापारी जाहिराती देतात; त्यांतील वर्णन वाचून कधींही घोडा खरेदी करूं नये. स्वतः घोडा तपासून पाहून खात्री करून घ्यावी किंवा घोड्याचा चांगला अनुभवी माहितगार असेल त्याच्याकडून घोड्याची परीक्षा करवून खात्री करून घ्यावी.

वर दिलेल्या सूचनांप्रमाणें घोडा तपासून घेतला असतां चांगला उपयोगांत येण्यासारखा घोडा मिळण्यास हरकत पडणार नाहीं असा माझा समज आहे.

घोड्याच्या निरनिराळ्या भागांवर असलेल्या भोंवऱ्यांचे गुणदोष पहाण्याचा या देशांत फार पुरातन काळापासून प्रघात आहे. कदाचित् कोणी तिकडे अगदीं दुर्लक्ष करून जनावर चांगलें देखणें कामालायक आणि किमतीनें बेताचें इतक्याच गोष्टी लक्षांत आणून विकत घेतलें आणि पुढें प्रसंगवशात् तें परत विकण्याची वेळ "बालभोंवरी"

आल्यास बरीच आडचण पडते. घोड्याच्या आंगाव-रील चिन्हांविषयीं लोकांचा इतका दृढ ग्रह कां असावा याचें कारण परंपरेनें चालत आलेली समजूत या शिवाय आणखी कांहीं असावें असें वाटत नाहीं. तरी घोडा घेतेवेळीं या बाबतीचा विचार किती करावा हें ज्याच्या त्याच्या समजुतीवर आणि मनाच्या स्थिरतेवर अवलंबून असतें. ह्या बाबतींत इतका मतभेद आहे कीं एका देशांत किंबहुना एका प्रांतांत ज्या भोंवऱ्याला अशुभ मानतात तो दुसऱ्या देशांत मुळींच विचारांत घेत नाहींत. ज्यांस या संबंधाची सविस्तर माहिती पाहिजे असेल त्यांणीं या विषयावरील जुने फारशी, संस्कृत व प्राकृत ग्रंथ पहावे. साधारण प्रचारांत ज्या खुणा लोक पहातात त्यांचाच फक्त स्थलनिर्देश खालीं थोडक्यांत दिला आहे.

घोड्याच्या शरीरावर भोंवरे असतात; लोक त्यांतून किती एक शुभ आणि कितीएक अशुभ मानतात; तसेंच शरिराचा रंग व कितीएक अवयवांची रचना या संबंधानेंही शुभाशुभ विचार करण्याचा परिपाठ पडला आहे. या विषयाची संपूर्ण माहिती ह्या पुस्तकांत देणें शक्य नाहीं; तरी ज्या लोकांची ह्या चिन्हांच्या शुभाशुभतेविषयीं श्रद्धा असेल त्यांच्या उपयोगापुरती

"वालभोंवरी" संबंधी माहिती देऊन घोड्याच्या परीक्षेचें प्रकरण संपविण्याचा माझा विचार आहे.

घोड्याच्या शरीरावर एकंदर ९६ भोंवरे असतात, त्यांतून २० शुभ आणि ७६ अशुभ मानले आहेत.

घोड्याच्या कपाळाच्या मध्यभागीं एकच भोंवरी असल्यास ती शुभ मानतात.

कपाळावर दोन भोंवऱ्या बरोबर जोडीनें असल्या तर त्यास "चिमूट" ह्मणतात. हिच्यावद्दल फारसा आक्षेप नाहीं. चिमूट.

चिमटीच्या दोन भोंवऱ्यांवर तिसरी भोंवरी असली तर त्याला "बाशिंग" ह्मणतात. हें शुभ मानतात. बाशिंग.

कपाळावरच्या भोंवऱ्या वर खालीं असून तिरप्या असल्या तर त्याला "बेडाफोड" ह्मणतात. ही अशुभ मानतात. ह्याच भोंवऱ्या एका खालीं एक समूर असल्यास त्याला "उतरंड" ह्मणतात. ह्याचा प्राय: आक्षेप घेतला जात नाहीं. बेडाफोड.

घोड्याच्या एका डोळ्याच्या कोपऱ्यापासून दुसऱ्या डोळ्याच्या कोपऱ्यापर्यंत सरळ रेषा कल्पून तिच्याखालीं कपाळावरची भोंवरी असल्यास तिला "असुढाळ" जाणावी. ही फार अशुभ समजतात. हीच भोंवरी वर दर्शविलेल्या रेषेपासून खालच्या बाजूला असली तर तिला "गद्धाभोंवरी" ह्मणतात. ही सुद्धां अशुभच, मात्र असुढाळीच्या इतकी वाईट मानीत नाहींत. असुढाळ. गद्धाभोंवरी.

दाढेखालीं दोन्ही जबड्यांवर दोन भोंवऱ्या असल्या तर त्यांस "दाढसांखळ" ह्मणतात. ही शुभ मानतात. एकच बाजूला भोंवरी असली तर ती अशुभ जाणावी. दाढसांखळ.

गालगोम. गालांवर दोन्ही बाजूंला भोंवऱ्या असल्या तर त्यांस " गाल गोम " ह्मणतात. या शुभ आहेत.

कर्णमूळ. दोन्ही कानांच्या मुळाशीं एक एक भोंवरी असली तर त्यास " कर्णमूळ " ह्मणतात; हें शुभ समजतात. एकाच कानाच्या मुळाशीं भोंवरी असली तर ती अशुभ.

सापण. अयाळीच्या दोन्ही बाजूंला एक एक किंवा दोन दोन किंवा कितीही पण दोन्हीं बाजूंला सारखे भोंवरे असले तर चिंता नाहीं पण एका बाजू पेक्षां दुसऱ्या बाजूला जास्त भोंवरे असले तर अशुभ. तसेंच एका बाजूला भोंवरा आणि दुसऱ्या बाजूला शेंपटाच्या आकाराची भोंवरी असली तर तिला " सापण " ह्मणतात. ही अशुभ मानतात.

कंठीभोंवरी. देवमण. घोड्याच्या गळ्याखालीं कंठावर भोंवरी असली तर तिला " कंठी भोंवरी " ह्मणतात. गळ्यापासून सुमारें अर्धा फूट खालीं असलेल्या भोंवरीचें नांव " देवमण ". हीं दोन्ही शुभ चिन्हें समजतात.

पंख्याची भोंवरी. छातीच्या खालीं दोन्ही बाहूंच्या मुळांत असलेल्या भोंवऱ्यांला पंख्याच्या भोंवऱ्या ह्मणतात. ह्या शुभ मानलेल्या आहेत.

छत्रभंग. घोड्याच्या मद्दूवर भोंवरी असल्यास तिला " छत्रभंग " ह्मणतात. कांहीं लोक हिला "आसनखोड" ह्मणतात. ही अशुभ मानलेली आहे.

हृदावळ. छातीच्या मध्यभागीं जी भोंवरी असते तिला "हृदावळ" ह्मणतात. कदाचित् छातीवर पांच भोंवरे असले तर "पंचमुखी हृदावळ" जाणावी. छातीवर कातडीच्या सुरकुत्यांत भोंवरी असली तरी तीही हृदावळच मानतात. हृदावळ अगदीं अशुभ मानलेली आहे.

तंगाखालीं एकच वाटोळा भोंवरा असला तर त्याला "तंगावर्त" तंगावर्त.
ह्मणतात. हाच भोंवरा तंगाबाहेर असून लांबट असला तर त्याला "गोम" ह्मणतात. हीं दोन्ही चिन्हें अशुभ समजलीं जातात. गोम.

गोम सुमारें चार पांच इंच लांब असून तिचें तोंड मागल्या बाजूस असल्यास तिला "गंगापाट" ह्मणतात. पुष्कळ लोक ही गंगापाट.
अशुभ मानीत नाहींत.

बगलेजवळ रिकाबीचे ठिकाणीं एकच बाजूस भोंवरी अ- रिकाबतोड.
सली तर तिला "रिकाबतोड" ह्मणतात. ही अशुभ होय. दोन्ही बाजूंला असली तर शुभाशुभ नाहीं.

कुशीवर दोन्ही बाजूंस सम भोंवऱ्या असल्या तर त्या शुभ; विषम असल्यास अशुभ.

पुढल्या दोन्ही पायांच्या गुडघ्याखालीं बाहेरच्या भागावर खुंटीगाड.
एकएक भोंवरी असली आणि तिचें तोंड वर व शेंपूट खालीं याप्रमाणें असली तर तीस "डामेगाड" किंवा "खुंटीगाड" ह्मणतात. ह्या शुभ मानलेल्या आहेत. एकाच पायावर ही भोंवरी असल्यास अशुभ. जर ह्या भोंवरीचें तोंड खालीं व शेंपूट वर असलें तर तिला "डामेउखाड" किंवा "खुंटीउखाड" ह्मणतात. ही अशुभ. खुंटीउखाड.

इतर कितीएक चिन्हांविषयीं शुभाशुभ विचार—

कपाळावर पांढरा पट्टा असून तो तुटक असला तर तें अ- तुटपट्टा.
शुभ समजतात.

कपाळावर पांढरा पट्टा किंवा टिक्का असून त्यांत थोडे लाल दलभंजन.
किंवा काळे केंस असले तर त्याला "दलभंजन" ह्मणतात परंतु हे

केंस आंगठ्याखालीं झांकून जातील इतके असले पाहिजेत. ह्या चिन्हाला अशुभ मानलेलें आहे.

चांदिणी. घोड्याच्या कपाळावर आंगठ्याखालीं झांकून जाण्याएवढा लहान टिक्का असला तर त्याला " चांदिणी " ह्मणतात. ही फार अशुभ मानलेली आहे.

कृष्णांजनी. घोड्याच्या ओंठावर काळा चट्टा असतो त्यास "कृष्णांजनी"
कृष्णटाळू. ह्मणतात. तसेंच टाळूवर काळा चट्टा असला तर " कृष्णटाळू " ह्मणतात. दोन्ही ही अशुभ आहेत.

अरजल. घोडा एक रंगी असून त्याचा एकच पाय सफेत असला तर त्यास " अरजल " ह्मणतात. मुसलमान लोक हें अशुभ मानतात.

तसेंच कितीएक घोड्यांला एकच अण्ड असतो, हें अशुभ समजतात.

शालिहोत्राच्या पुस्तकांतून आणखी पुष्कळ बारीक बारीक चिन्हांचें वर्णन आहे परंतु वर दिलेलीं चिन्हें प्रचारांत पहाण्याचा रिवाज आहे.

प्रकरण ८.

घोड्याची जतन व त्याचा तबेला.

घोड्याची फक्त शारीरिक योग्यता पाहून घेतला किंवा शरीररचना आणि " बाल-भोंवरी " या दोन्ही संबंधी त्याची योग्यता लक्षांत आणून घोडा घेतला तरी त्याला चांगल्या रीतीनें संभाळण्याची जबाबदारी तो खरीद करणारावर येते हें उघड आहे. आपल्या पदरीं पडलेल्या मुक्या जनावरासंबंधी आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावल्याचें श्रेय घेण्यास आपल्यायेथील त्याचा निवास त्याला सुखावह होईल अशी योजना केली पाहीजे हें उघड आहे. घरांत कोणी नवीन मनुष्य येऊन राहिलें तर त्याला हव्या तशा सोयी करून घेतां येतात, पाहिजे ते पदार्थ मागतां येतात, वाटेल तेथें बसतां उठतां येतें, तसें घोड्याला करतां येत नाहीं. त्याणें सदा सर्वकाल मालक बांधून ठेवील तेथें रहावें, घालील तितकें अन्न खावें आणि मालक लादील तितका बोजा निमूटपणीं

घोड्याविषयीं मालकावर जबाबदारी.

विनतक्रार ओढवेल तसा ओढावा अशी त्याची स्थिति आहे; ह्मणजे त्याचें इहलोकींचें जीवित्व सर्वस्वी त्याच्या मालकावर असल्यामुळें त्याची सर्व तजवीज मालकानेंच लावून दिली पाहिजे; तींत पहिली बाबत ह्मटली ह्मणजे त्याची रहाण्याची जागा. ही घोड्याच्या नैसर्गिक स्वभावाला अनुकूल आहे कीं नाहीं हें पहाणें आणि ती जागा तशी नसली तर करून देणें किती महत्वाचें आहे याचा विचार वाचकानींच करावा. दिलगिरीची गोष्ट इतकीच कीं ह्या विषयाकडे बहुतेक सर्वांचें दुर्लक्ष नजरेस येतें. ह्या देशांत जे गृहस्थ एक दोन घोडे ठेवितात त्यांच्या येथील घोडे बांधण्याची जागा बहुधा त्यांच्या आरोग्यतेला अगदीं अयोग्य असते असें ह्मणावें लागतें. घराच्या पडवीच्या एखाद्या कोंपऱ्यांत किंवा दुसऱ्या कोणत्याही उपयोगीं न येणाऱ्या अशा ठिकाणीं घोडा आणि जवळच गाडी ठेवलेली असा प्रकार नजरेस येतो. ह्यापासून गाडी कशी खराब होते हें योग्य ठिकाणीं सांगण्यांत येईल. ह्या योजनेपासून घोड्याला बहुत अपाय होऊन अनेक रोग होतात इतकेंच सांप्रत सांगितलें ह्मणजे पुरे. ज्या घोड्याला नुसता चैनीसाठीं

घोड्याला ठेवण्याचा तबेला.

मालक दिवसांतून तास अर्धा तास बाहेर नेतो त्याला दररोज पांच सात तास बाहेर फिरणाऱ्या घोड्यापेक्षां मोठा आणि जास्त हवाशीर तबेला पाहिजे; नाहींतर त्याचे पाय फुगतात, तो ढांसूं लागतो किंवा त्याला दुसरा एखादा रोग होतो. अमुकच एक रोग न झाला तर त्याला खाल्लेलें अन्न अंगीं लागत नाहीं.

घोड्यासाठीं तबेला कायम करण्यांत मुख्य दोन तीन गोष्टींचा विचार केला पाहीजे.

तबेला बांधण्यांत मुख्य विचार करण्याच्या बाबती.

ज्या ठिकाणीं घोडा ठेवावयाचा किंवा त्याच्यासाठीं नवीन तबेला बांधावयाचा ती जागा अगदीं दमसर नसावी; किंवा पर्जन्यकाळीं तिच्या आजूबाजूनें पाण्याचीं गटारें भरून त्या जाग्यांत ओलावा न येईल अशा खात्रीची असावी. घोड्याला दमट जाग्यांत ठेवण्यापासून त्याला जितकी इजा होते तितकी कोणत्याही स्थितींत ठेवल्यापासून होत नाहीं.

छपर.

तबेल्यांत वारा चांगला खेळता असावा आणि त्याचें छप्पर जाड असावें ह्मणजे तें उन्हाळ्यांत तापून घोड्याला त्रास होत नाहीं. तबेल्याचें छप्पर बाजूच्या

भिंतीवरच न ठेवतां भिंती सुमारें सात आठ फूट उंच धरून त्यांवर दीड दोन फूट उंचीचे खांब ठेऊन वर लगी टाकाव्या आणि त्यांवर छपराची मांडणी करावी ह्मणजे चारही बाजूंनीं वारा हवातसा खेळता रहातो.

जमीन. तबेल्याची जमीन पक्की केली तर उत्तम, नाहीं तर निदान विटकरांचे मोठाले तुकडे कुटून जमीनींत बसवावे. अशा प्रकारें जमीन करण्यास सवड नसेल तर जमीनीवर पांच सहा इंचांचा रेतीचा थर घालावा, मात्र त्या रेतींतील जी रेती रोज मलमुत्रानें खराब होईल ती काढून टाकावी. जमीन पक्की असो किंवा कच्ची असो तिच्यावर पडलेलें पाणी पुढून घोड्याच्या पायबंदाकडे वाहून जाईल इतकीच उतरती करावी; फार उतरती करूं नये.

पडवी. तबेल्याच्या मागल्या बाजूला (ह्मणजे घोड्याच्या पिछाडीकडे) चार पांच फूट रुंदीची पडवी असावी. ज्या तबेल्यांत दोहोंपेक्षां जास्त घोडे ठेवावयाचे असतील त्या तबेल्याच्या पडवीला चार फूट उंच भिंत घालावी आणि पडवीच्या एका टोंकाला खिडकी आणि एका टोंकाला दरवाजा ठेवावा; किंवा दोन्ही बाजूंला

दरवाजे ठेवावे. भिंतीवर छपरापर्यंत उघडी जागा राहूं द्यावी.

एक किंवा दोन घोडे बाळगणारानें पडवी उघडी राहूं देऊन प्रत्येक घोड्याच्या ठाणालाच कवाडें करून बाहेर उघडतील अशीं ठेवावीं. तीं चिरलेल्या बांबूचीं असावीं.

तबेल्यांतील प्रत्येक ठाण (एक घोडा बांधण्याची जागा) निदान ८ फूट रुंद, १२ फूट लांब आणि माळ्यापर्यंत १० फूट उंच असावें. प्रत्येक घोड्याचें ठाण.

ठाणाची जमीन जरी उतरती केलेली असली तरी घोड्याचें मूत आणि पाणी सर्व एका ठिकाणीं जमा होण्यासाठीं कांहीं तरी योजना असणें जरूर, ह्मणून प्रचारांत ठाणाच्या मध्यभागीं खळगा करून त्यावर दोन जाड्या फळ्या घालून सर्व पाणी त्या खळग्यांत येईल अशा बेतानें तबेल्याची जमीन चोंहींकडून मध्यभागाकडे उतरती ठेवण्याचा मोतद्दारांचा फार आग्रह असतो. ही योजना फारशी प्रशंसनीय नव्हे; कारण, अशा प्रकारच्या मुताळींत जमलेलें पाणी वारंवार निघत नाहीं तेणेंकरून मुताळी.

तें सर्व आंत कुजून दुर्गंधी होते आणि त्यांतून अनेक प्रकारचे अपायकारक वायु निघतात. तबेल्याची जमीन वर सांगितल्याप्रमाणें जरी उतरती केलेली असली तरी मध्यभागीं मुताळी करावी पण ती अल्प आयासानें उघडून आंतील पाणी काढतां यावें अशी असावी. फूट दीड फूट औरस चौरस मजबूत चौकट करून वर लोखंडाची जाळी उचलून ठेवतां येईल अशी बसती करावी. ठाणाच्या मध्यभागीं दोन अडीच फूट खोल खळगा करून त्याच्या तोंडावर ही चौकट पक्की बसवावी आणि खालीं खळग्यांत लोखंडाचें डामर लावलेलें पातेलें किंवा बालडी ठेवावी; किंवा केरोसिन तेलाचा रिकामा डब्बा तोंड कापून आंतून बाहेरून डामर लावून त्या खळग्यांत ठेविला तरी चांगला. ही योजना फार थोड्या खर्चांत होते. एक दोन दिवसांनीं जाळी उचलून खळग्यांतील भांडें बाहेर लांब नेऊन रिकामें करावें. ही योजना सोईची होते.

ठाणावर घोडा मोकळा ठेवणें.

ज्या लोकांनीं अश्वसंरक्षणाबद्दल पुष्कळ विचार केला असून प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे त्यांचा असा सिद्धांत झाला आहे कीं घोड्याला अष्टोप्रहर आघाडी

पिछाडी लावून बांधून ठेवण्यापेक्षां जर त्याला दिवसांतून कांहीं वेळ मोकळा ठेवला तर फार चांगलें; तो ठाणांत मोकळा राहिल्यानें त्याला पुष्कळ आराम वाटतो. असें करण्यास ठाणाची फक्त रुंदी आठ फुटांपेक्षां जास्त पाहिजे. दहा फूट रुंदी धरली ह्मणजे पुरे. ह्यांत घोड्याला सकाळ संध्याकाळ आवाडी पिछाडी लावून बांधून ठेवतां येतो आणि दुपारीं व रात्रीं मोकळा ठेवतां येतो. ठाणाच्या दरवाजाच्या दोहों बाजूंला सहा फूट उंचीचा एक एक खांब पुरावा आणि त्या खांबाला जमीनीपासून सुमारें चार फुटांवर एक आणि पांच फुटांवर एक अशीं दोन भोंकें पाडून त्यांत दोन बाजूंस आडवें लांकूड घालून मध्यें दोरीनें घट्ट बांधून मग आंत घोडा मोकळा सोडावा.

ठाणाची पडदे भिंत.

दोन ठाणाच्या मधली भिंत एका घोड्याला दुसरा दिसणार नाहीं किंवा त्यांला एकमेकांला हुंगतां येणार नाहीं इतकी उंच असली ह्मणजे पुरे. घोडा ठाणावर मोकळा असला ह्मणजे प्रायः मान बाहेर काढून उभा रहातो; याचें कारण इतकेंच कीं त्यापासून त्याला स्वच्छ मोकळी हवा श्वासोच्छ्वासासाठीं सांपडते. यावरूनच

तबेल्यांत स्वच्छ हवा खेळती रहाणें किती महत्वाचें आहे हें व्यक्त होतें.

आघाडी पिछाडी.

आघाडी पिछाडी बांधण्यास तबेल्यांत खुंटे पुरण्याचा रिवाज आहे त्यापेक्षां लांकडाचे ओबडधोबड हात दीड हात लांबीचे ठोकळे घेऊन त्यांला लोखंडी कड्या मारून ते ठोकळे जमिनींत पुरून कड्या बाहेर ठेवाव्या, आणि आघाडी त्या कडयांला बांधावी. आघाडीची लांबी इतकी असावी कीं घोड्याला मान वर उचलण्याला कोणतीही हरकत पडूं नये. पिछाडीची कडी घोड्याच्या पायांपासून निदान दहा फुटांवर असावी.

तबेल्यांत घोड्दा मोकळा सोडण्यापूर्वीं आघाडी पिछाडी त्याच्या पायांत न गुंतेल अशा बेतानें आटपून ठेवावी.

मोतद्दार.

आमचा मुख्य विषय घोडा-गाडी आणि त्यांची योग्य जतन करून वापरणें हा असल्यामुळें नवीन आणलेल्या जनावराची शुश्रूषा करण्यासाठीं जो माणूस ठेवणें तो कसा असावा आणि त्याच्या बरोबर आपलें वर्तन कसें असावें याबद्दल येथें थोडें विवेचन केलें असतां अप्रासंगिक होईल असें वाटत नाहीं.

घोड्याला संभाळण्यासाठीं जो नोकर ठेवावयाचा तो सदृढ, शांत, उत्साही आणि इमानानें काम करणारा असावा. त्याणें पूर्वी कोठें नोकरी केलेली असल्यास तेथून त्याच्या निघण्याच्या कारणांचा वगैरे बारकाईनें तपास करून नंतर त्याला ठेवावा. जो उमेदवार घोड्यासंबंधी फार लांब लांब गोष्टी सांगतो तो बहुतकरून कामचुकार आणि पोशाखी असतो. कसा असावा.

घोड्याच्या नोकराला (ह्मणजे मोतद्दार किंवा साइस) यजमानानें जी ताकीद अगर हुकूम देणें तो स्पष्ट आणि निश्चयात्मक अशा रीतीनें द्यावा ह्मणजे त्या-बद्दल त्याला मागाहून कांहीं सबब सांगतां येणार नाहीं. त्याच्याशा मालकाचें बर्तन.

मोतद्दाराला पगार देण्यांत रुपया आठ आण्यांची कसर करणें चांगलें नव्हे. कारण त्यापासून फायद्यापेक्षां नुकसान मात्र जास्त होतें. कमी पगाराचा नोकर हर-प्रयत्न करून घोड्याच्या दाणावैरणींतून चोरी कर-ण्याचा यत्न करतो. मोतद्दाराकडून घरांतील दुसरें काम करविण्याची अपेक्षा ठेवूं नये. त्याला शिवीगाळ करूं नये. आपण सांगितल्याप्रमाणें काम न करील तर

त्याला तावडतोब काढून टाकावा हाच मार्ग उत्तम. त्याच्या बरोबर वादविवाद करण्यांत किंवा त्याला धमकविण्यांत अर्थ नाहीं.

त्याचें कर्तव्य.

घोडा आजारी झाला किंवा त्याला कांहीं इजा झाली तर मोतद्दारानें आपजबाबीवर कधींही ओषधोपचार करूं नये. तावडतोब यजमानाला वर्दी द्यावी, अशी व्यवस्था असावी.

मोतद्दाराला घोड्याचा तबेला सोडून कोठें जाणें असल्यास त्याणें यजमानाची परवानगी घेतल्याशिवाय कधींही जाऊं नये अशी सक्त ताकीद असावी.

प्रकरण ९.

शुश्रूषा.

घोडेवाल्यानें प्रत्यहीं सहा वाजण्यापूर्वीं उठावें आणि घोड्याची चाकरी करून तबेला साफ करणें वगैरे काम सात साडेसात वाजण्यापूर्वीं आटपावें.

घोड्याच्या शुश्रूषेसाठीं लागणारें सामान.

घोड्याची चाकरी करण्यासाठीं आणि त्याला योग्य बंदोबस्तानें ठेवण्यासाठीं जें सामान पाहिजे तें खालीं दिल्याप्रमाणें:—

सुताची आघाडीं, चामड्याचा मोरडा गळखोड अंधारी सुद्धां, पिछाडी सुंभाची चामड्याच्या पायबंदासुद्धां, काढणी सुताची, नोकरी करण्याच्या वेळीं चढविण्याची लगाम, खरारा, हताळी, ब्रश, दोन रुमाल, लोखंडी फणी, सुंभ-कोरणी (खुरांतील माती खडा वगैरे काढण्यासाठीं लोखंडी आंकडा), दोन जाडी खादीचे रुमाल, घाम फेंस काढण्यासाठीं लोखंडी पट्टी,

गवत तोलण्याचा कांटा, साबण, तोबरा, दोन झुली (एक थंडी आणि एक गरम), दोन बालड्या (एक लांकडी आणि एक लोखंडी), टोपली कचरा लीद जमा करण्यासाठीं, एक बरनिशर (लोखंडी सामान घांसून साफ करण्यासाठीं), एक रुमाल सामान पुसण्याचा; इतकें सामान अगदीं अवश्य असावें.

घोड्याची नोकरी.

घोड्याची चाकरी नीट होण्याकडे मालकाचें विशेष लक्ष असलें पाहिजे. चाकरी करण्याची पद्धत खालीं लिहिल्याप्रमाणें असावी.

शरीर साफ करणें.

घोड्याच्या शेजेचें ह्मणजे बिछान्याचें गवत नेमलेल्या ठिकाणीं तबेल्यांतील कोंपऱ्यांत ठेवावें. खराब झालेलें गवत आणि लीद कचरा वगैरे टोपलींत भरून खताचे जागीं टाकावें; हात धुऊन घोड्याला लगाम देऊन तिची दोरी उंच बांधावी अगर घोड्याच्या शेंपटीच्या दांडीखालून दोरी काढून कायदा करावा. नंतर रुमालानें घोड्याचें तोंड पुसून साफ करावें, मानेखालीं व हनुवटीखालीं पुसावें आणि पुढें खरारा करण्यास प्रारंभ करावा तो मळ निघेनासा होईपर्यंत करावा. कांहीं घोड्यांला खरारा

सोसत नाहीं; अशा जनावराला अगदीं हलक्या हातानें खरारा केला पाहिजे आणि तितकाही सोसत नाहीं असें दिसून आल्यास डाव्या हातांत खरारा ठेवून उजव्या हातानें ब्रश वारंवार घोड्याच्या आंगावर फिरवून तो ब्रश खराऱ्यावर चोळावा; असें केल्यानें सर्व मळ निघून येतो. नंतर घोड्याचें सर्व आंग कोरड्या रुमालानें पुसावें. रात्रीं घोडा लोळल्यानें त्याच्या आंगावर कोठें लिदीचे वगैरे डाग पडले असतील ते हताळीनें चोळून चोळून काढावे. पायही हताळीनेंच चांगले स्वच्छ करितां येतात; ब्रशनें अगर खराऱ्यानें तसे साफ होत नाहींत.

केंस साफ करणें.

इतकें कृत्य झाल्यानंतर घोड्याची शेंडी, आयाळ आणि शेंपूट ब्रशनें चांगलीं साफ करून लोखंडी फणीनें विंचरावीं. कांहीं मोतद्दार घोड्याच्या शेंपटीची दांडी ओल्या रुमालानें चोळून साफ करतात पण ही रीत चांगली नाहीं. घोड्याचे कान, नाक, डोळे, मलद्वार आणि मांड्या हीं दररोज पुसावीं. गाडीच्या घोड्याची आयाळ विंचरण्याची ती नेहमीं उजव्या बाजूला पडेल अशी विंचरावी.

खूर तपासणें. शेवटीं घोड्याच्या खुरांतील मळ आंकड्यानें काढून खूर पुसून साफ करावे. नाल ढिले झाले आहेत अथवा त्यांचा एखादा खिळा सईल झाला आहे कीं काय हें यजमानानें पहावें.

नाल बांधणें. घोड्याच्या संगोपनांत त्याच्या पायाला नाल बांधण्याचाही समावेश होतो. नाल बसविण्यासाठीं नालबंद बहुतकरून घोड्याचे खूर वाजवीपेक्षां जास्ती तासतात. विशेषतः खुराच्या तळांत असलेला त्रिकोणाकृति मृदुभाग (पुतळी) फार कापून काढतात; हें चांगलें नाहीं. यास्तव चांगला हुषार आणि पुष्कळ दिवस काम केलेला असा नालबंद पाहून त्याच्याकडून नाल बांधवावे. ते नेहमीं दरमहा एकदां तरी बांधवावे. जर घोड्याला काम

खोलबंदी. विशेष नसेल तर खोलबंदी करवावी—ह्मणजे जुने नाल काढून पायांचे वाढलेले खुर तासून तेच नाल फिरून बसवावे.

नाल बसविल्यानंतर तपासणी. नालांचे खिळ्यांपैकीं एखादा खिळा वांकडा लागून खुराच्या जिवंत भागांत गेला तर घोडा लंगडूं लागतो ह्मणून नालबंदी अगर खोलबंदी झाल्याबरोबर घोड्याला

सोडून फिरवून पहावा. घोडा किंचित् लंगडतो असें वाटल्यास नाल काढून टाकून घोडा तसाच बांधून ठेवावा आणि चार पांच दिवस विश्रांति देऊन तो लंगडत नाहीं अशी खात्री करून घेऊन मग फिरून नाल बसवावे. जो घोडा ठोकर खातो किंवा ज्याचे पाय एकमेकांवर हापटतात त्याला नाल कोणत्या तऱ्हेचे असावे हें चांगला कुशल नालबंद ठरवूं शकतो.

घोड्याच्या खुराला हवे तेव्हां अडकवितां यावे असे नाल फ्रान्स देशांत कांहीं लोक वापरतात. आलीकडे रबरी नालही इंग्लंड वगैरे देशांत निघाले आहेत. इकडे अजून ते प्रचारांत आले नाहींत.

नोकरीविषयीं दक्षता.

वर सांगीतल्याप्रमाणें दररोज प्रातःकाळीं व सायंकाळीं नोकरी झाली पाहिजे, आणि ती मोतद्दार करतो कीं नाहीं हें नेहमीं पाहिलें पाहिजे. स्वतः पहाण्याचें न होईल तर घरांतील खात्रीच्या मनुष्याकडून नजर ठेववावी.

घोड्याचा बिछाना.

सायंकाळची नोकरी जाहली म्हणजे ठाणावर गवत पसरून घोड्याचा बिछाना तयार करावा; तसेंच फार लांबीच्या पल्ल्यावरून घोडा आला असला तर त्याची

मालिष करून नंतर त्याचा बिछाना करावा. ज्या ठिकाणीं गवत महाग असून पेंढा मिळेल तेथें बिछान्यासाठीं पेंढा वापरला तरी चालेल.

मालिष. ज्याप्रमाणें माणूस चालून आल्यानंतर त्याचें आंग रगडणें, पाय दाबणें वगैरे त्याला सुखावह होतें त्याच प्रमाणें घोड्याची मालिष त्याला सुखावह होते. शिवाय त्याच्या आरोग्यतेसंबंधानेंही मालिष होणें फार चांगलें; तेणेंकरून अनेक प्रकारचे शारीरिक फायदे आहेत. मालिष करणें ती येणेंप्रमाणें:—घोडा बाहेरून फिरून आला ह्मणजे त्याला गाडींतून सोडून त्याचा लगाम ढिला करावा, त्याचे चारही पाय एका मागून एक उचलावे; मग त्याला हळू हळू सुमारें अर्धा तास घाम सुकेपर्यंत फिरवावा; नंतर ठाणावर आणून सर्व साज काढून मानेच्या दोन्ही बाजूंला मणगटाच्या भारानें खूब रगडावा; पुढें त्याच्या बाजू रगडण्याला प्रारंभ करावा. तळहातानें सुरवात करून मणगटाच्या जोरानें चोळावा. अशा प्रकारें चोळतांना हात अगदीं पोटाखालीं जाऊं द्यावा ह्मणजे हात जितका लांब नेववेल तितका न्यावा. बाजू रगडून झाल्यानंतर पुठ्ठा रगडण्याची सुरु-

वात करावी. पुठ्ठा रगडण्यांत घोड्याच्या बाजूला, किं- बहुना पुढल्या पायांजवळ, उभें रहावें. मागल्या पायां- जवळ कधींही उभें राहूं नये; कारण घोडा केव्हां लाथ मारील याचा नेम सांगतां येत नाहीं. सगळ्या शरी- राची मालिष झाल्यावर शेवटीं खालीं बसून चारही पाय रगडावे, ते वरून खालीं रगडीत जावें. अशा प्रकारें एकंदर निदान तासभर मालिष करावी.

मोतद्दार कितीही इमानी असला किंवा त्याला कितीही पगार दिला तरी घोड्याची नोकरी करण्यांत कुचरपणा करण्याची त्या लोकांस खोडच असते; ह्मणून केवळ मोतद्दाराच्या सांगण्यावरच मालकानें घोड्या- च्या नोकरीसंबंधीं संपूर्ण भरंवसा ठेवून राहूं नये.

घोडा धुण्याचा आग्रह आणि त्यापासून अपाय.

पुष्कळ मोतद्दार घोडा बाहेरून आला ह्मणजे कांहीं तरी निमित्त सांगून अथवा मालकाची नजर चुक- वून त्याला एकदम धुऊन काढतात. अशा कृत्याचा त- त्काल जरी परिणाम नजरेस न आला तरी तें घोड्याला फार अहितकारक आहे; त्यापासून घोड्याच्या कातडीवर जें एक प्रकारचें तेल असतें तें निघून जातें, रुधिराभि-

सरणाला व्यत्यय येतो, आणि प्रसंगवशात् ओल्या आंगावर थंड वारा लागून घोड्याला सर्दी होते. यास्तव घोडा फिरून येऊन गरम झालेला असतो तेव्हां मोतद्दारानें तो अगदीं धुऊं नये; वर सांगीतल्याप्रमाणें चांगली मालिष करून पुसूनच साफ करावा.

घोडा अगदीं धुऊं नये असें नाहीं; तो फिरून आल्यानंतर किंवा वारंवार धुऊं नये. महिन्यांतून एखाद्यावेळीं धुतल्यास हरकत नाहीं. ज्या दिवशीं धुवावयाचा असेल त्या दिवशीं हवेचें मान पाहून दोन प्रहरीं थंड पाण्यानें धुऊन अगदीं कोरडा करावा.

घोड्याचे पाय स्वच्छ करणें.

घोड्याचा बहुतेक उपयोग त्याच्या पायांवर अवलंबून असतो तेव्हां त्याच्या पायांची जतन विशेष राहिली पाहिजे हें उघड आहे. घोडा बाहेरून फिरून आला ह्मणजे त्याचे पाय रुमालानें आणि हताळीनेंच साफ करावे. पाय धुण्यांत श्रम कमी ह्मणून मोतद्दार अनेक सबबी सांगून पाय धुण्याचा यत्न करितात पण ती वहिवाट प्रत्येक मालकानें सक्तीनें बंद करावी. पाय धुण्यापासून पायाचे पुष्कळ रोग होतात. चिखलांतून घोडे

चालून आले असतील तर चिखल पुसून निघेल तितका काढावा, आणि राहील तो तसाच वाळूं देऊन सुखला ह्मणजे अगर दुसऱ्या दिवशीं साफ करून काढला तरी चालेल पण धुण्याच्या भरीस कधींही पडूं नये. ऊन पाण्यानें तर पाय कधींच धुऊं नये, तें फार वाईट; त्यापासून घोड्याच्या पायांला अनेक प्रकारचे रोग होतात.

अशा प्रकारें घोड्याची शुश्रूषा ठेविल्यास घोडा निरोगी राहून मालकाला चांगल्या प्रकारें काम देईल.

प्रकरण १०.

पोषण.

घोडयाच्या पोषणांत येणाऱ्या पदार्थांपैकीं गवत हें मुख्य आहे.

गवत. घोडयाला बाराही महिने गवत घालण्याचें तें वजन करून घालण्याचा रिवाज चांगला. साधारण घोडयाला आठ प्रहरां मिळून २० पासून २९ रतल गवत असलें ह्मणजे पुष्कळ होतें. हें गवत बारीक काडीचें, चांगलें वाळलेलें, पातीदार, मऊ आणि पिंवळ्या रंगाचें असावें. पावसानें भिजलेलें, काळें पडलेलें, रांठ किंवा जाड असलें तर तें घोडा मनापासून खात नाहीं. कदाचित् खाल्लें तर तें व्हावें तितकें हितकारक होत नाहीं.

ज्यांच्या येथें पांच सहा घोडे असतील त्यांणीं गवत कातरण्याचें यंत्र वापरल्यास चांगलें. त्याला सुमारें ७९ रुपये पडतात. ह्या यंत्रानें गवत कापून दिल्यास फुकट

जात नाहीं. एक दोन घोडे ठेवणाराला असलें यंत्र घेणें किंचित् जड होण्याचा संभव खरा.

जर प्रत्यहीं दुर्वा (हरियाळी) चा एखादा भारा सुमारें पांच पासून दहा रतल मिळेल तर तो खाऊं घालणें हितावह. ही हरिआळी नदीच्या कांठांवर सांपडते. ती आणिली ह्मणजे तशीच वाळवावी आणि तिच्या पाळांची माती ठोकून काढून नंतर घोड्याला खाण्यास द्यावी, ताजी देऊं नये; ज्या दिवशीं आणली असेल त्याच्या दुसऱ्या दिवशीं देणें चांगलें. दुर्वा (हरियाळी).

असली हरियाळी देण्याची सवड झाल्यास जितकी देण्यांत येईल तितक्या बेतानें गवत कमी करावें.

ल्युसरन ह्मणून मेथीसारखें गवत अलिकडे फार प्रचारांत आलें आहे तेंही दिलें असतां उत्तम. दररोज ६।८ पौंड पर्यंत द्यावें; तें आणल्याबरोबर तास अर्धा तास उन्हांत ठेवावें. घोड्यानें सकाळची चंदी खाल्ली ह्मणजे अर्धे द्यावें आणि नंतर बाकीचें तिसऱ्या प्रहरीं द्यावें. ल्युसरन.

गाजरांचे दिवसांत पाच सहा रत्तल गाजरें द्यावीं. तीं कापून त्यांचे बारीक तुकडे करून द्यावे; घोड्याला चांगलीं मानवतात. गाजरें.

मध्यम बांध्याचा घोडा असून त्याला पुढें सांगितल्याप्रमाणें जर चंदी देण्याचा प्रघात ठेविला तर ऋतुमानाप्रमाणें गाजरें, ल्युसरन वगैरे आणि गवत एकंदर मिळून २९ रतल दररोज दिल्यास पुरे.

चंदी. घोड्याच्या पोषणासंबंधी दुसरी बाब चंदीची. या देशांत घोड्याला चणा, मठ, बाजरी, उडीद, मूग, चणी आणि कोठें कोठें जव, कुळीथ इत्यादी धान्यें देण्याचा प्रघात आहे. त्यांपैकीं प्रत्येकाचे गुण आणि कोणतें धान्य कसें द्यावें याचा थोडक्यांत विचार खालीं लिहिल्याप्रमाणें.

इतर धान्यें देण्यापेक्षां दररोज उत्तम पिंवळा चणा तीन वेळां मिळून ६ पासून १९ रतलपर्यंत घोडा लहान मोठा असेल त्या मानानें द्यावा. सकाळीं व संध्याकाळीं नोकरी झाल्यावर चंदी द्यावी; आणि दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास द्यावी.

घोड्याला जी चंदी देण्याची ती चांगली निवडून स्वच्छ करून द्यावी; तींत खडे वगैरे असून एखादा खडा घोड्याच्या दांताला लागला तर तो कितीएक दिवस पर्यंत चंदी खाईनासा होतो.

घोड्याला चोरदांत येतात तेव्हांही घोडा चंदी खात नाहीं. हे दांत बारीक टोंकीचे असतात ते नीट परीक्षा करून उपटूनच काढावे.

घोड्याला सदोदित चंदी सुखीच द्यावी. ती भरडून दिली तर चांगली. फक्त घोडा अगदीं वृद्ध झाला ह्मणजे किंवा आजारी असेल तेव्हां भिजवून किंवा शिजवून द्यावी. ज्याच्या घरीं चार पांच घोडे असतील त्याणें चणे भरडण्याचें यंत्र ठेवावें. मोतद्दार जांत्यानें चणे भरडण्यास नाखुष असतात, पण यंत्राने भरडून घेण्यास हरकत करीत नाहीं. हा केवळ समजूतीचा प्रकार. जांत्यावर भरडण्यांत त्यांला थोडा कमीपणा वाटतो!

घोड्याला काम कमी जास्ती पडेल त्या बेतानें चंदी कमी ज्यास्ती करावी. ज्यावेळीं अतीशय काम पडेल त्या दिवशीं घोडा खाईल तितकीही चंदी दिली असतां कांहीं हरकत नाहीं.

चंदींत गव्हांचा सुखा भुसा रतल दोन रतल घालणें चांगलें. भुसा.

चंदीत नेहेमीं दोन तीन तोळे मीठ अवश्य घालावें. मीठ.
घोड्यानें चंदी हळूहळू खाल्ल्यानें त्याच्या अंगीं लागते.

ह्मणून ती एखाद्या रुंद पेटींत घालून त्याच्या पुढें ठेवावी; अशा तऱ्हेनें चंदी खाण्याची घोड्याला संवय होईपर्यंत मोतद्दारानें जवळ उभें राहिलें पाहिजे. मुशाफरींत असतानां ही तजवीज राहूं शकत नाहीं ह्मणून अशा प्रसंगीं तोबरा वापरावा; पण तो चामड्याचा असण्यापेक्षां किंतानाचा असला ह्मणजे हवा तेव्हां सहज धुऊन साफ करितां येतो.

अडदावा. अडदावा—ह्मणजे भाजलेले जवस आणि चणे भरडून त्यांत पावशेर गुळाचें पाणी—घोड्याला थंडीच्या दिवसांत दिल्यास चांगला.

अळशी. अळशीनें घोडा चांगला तयार होतो; प्रथम हें धान्य घोडा खात नाहीं पण संवय झाली ह्मणजे खातो.

बाजरी. बाजरी मध्यें कस कमी आणि धान्य फार बारीक. त्यापासून घोड्याला विशेष फायदा न होतां पुष्कळ वेळां लिदींतून ती जशीच्या तशी निघून जाते.

चणी. चणी ह्मणजे बारीक कमी कसाच्या चण्याची जात. हाही घोड्याला कोणत्याच प्रकारें हितावह नाहीं.

उत्तर हिंदुस्थानांत जवस भाजून चण्यांत मिसळून देतात. जवस चांगले पौष्टिक आहेत परंतु ते घोड्याला पुष्कळ देऊं नये. कधीं कधीं द्यावे. जवस.

हें धान्य विशेषतः कोंकणांत फार होतें. घोड्याला कुळीथ देण्याची जरुर पडली तर ते शिजवून द्यावे. कुळीथ.

चंदी देण्याच्या अगोदर पाणी पाजावें. ज्या तबेल्यांत घोडा मोकळा ठेवण्याची तजवीज असेल तेथें एक लांकडाचा कोठींबा किंवा लांबट पीप ठेऊन तें सदोदित सकाळपासून संध्याकाळपर्यंत पाण्यानें भरून ठेवावें आणि रात्रीं त्यांतील पाणी काढून टाकावें ह्मणजे घोडा तहान लागेल त्यावेळीं पाणी पितो आणि एकंदर त्याच्या पोटांत पाणी बेताचें जातें. पण नेमलेल्या वेळीं दिवसांतून दोन अगर तीन वेळां पाणी दाखविलें ह्मणजे घोडा एकदम पुष्कळ पाणी पितो तें चांगलें नव्हे. घोडा बाहेरून आला ह्मणजे जरी घामानें भिजलेला असला तरी त्याला पाणी दाखवावें, कांहीं हरकत नाहीं; मात्र एकदम पुष्कळ पाजूं नये. लांब प्रवास करीत असतानां जेथें जेथें चांगलें पाणी आढळेल तेथें तेथें घोड्याला पाणी पाजण्यास हरकत नाहीं; मात्र एकदम पाणी.

पुष्कळ पाजूं नये. कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं घोडा बाहेर जाण्यापूर्वीं दोन चार तास त्याला पाणी देऊं नये पण ही चूक आहे. घोडा आजारी असल्याशिवाय अन्य वेळीं त्याला पाणी देण्यासंबंधानें कधींही हरकत करण्याचें कारण नाहीं.

रातब. पुष्कळ मोतद्दारांचा घोड्यांला रातब देण्याचा फार आग्रह असतो. हा रातब ह्मणजे शिजविलेले उडीद किंवा मूग आणि त्यांत तूप गूळ. घोडा रोड झाला असतां हा दिल्यापासून तो पुष्ट होतो खरा परंतु रातब सगळा घोड्याच्याच पोटांत गेला तर चांगला. रातब सदोदित देण्याची जरुर नाहीं ; आणि जेव्हां देण्याचा तेव्हां तो घोड्याच्या पोटांत जाण्याविषयीं फार खबरदारी ठेविली पाहिजे. थंडीच्या दिवसांत सुमारें दोन शेर उडीद किंवा मूग अर्धा शेर तूप आणि अर्धा शेर गूळ याप्रमाणें प्रतिवर्षीं महिनाभर दिल्यास वाईट नाहीं.

मसाला. घोड्याला मसाला देण्याचाही प्रघात पुष्कळ नजरेस येतो; परंतु अश्व वैद्य किंवा शालिहोत्री यांच्या संमती शिवाय उगीच कांहीं तरी मसाला देण्यांत अर्थ नाहीं.

प्रकरण ११.


गाडीच्या घोड्याचा साज.

ज्याला घोड्याच्या गाडीची पुरी माहिती करून घेऊन गाडी हांकावयास शिकणें असेल त्याणें साजाच्या (हारनेसच्या) प्रत्येक भागाची आणि ते एकमेकांशीं कसे जोडलेले असतात याची चांगली ओळख करून घ्यावी.

साजाचे निरनिराळे भाग कोणते, ते एकमेकांशीं कसे जोडलेले असतात आणि साज घोड्यावर कसा घालावा हें आकृति २७ कडे पाहिल्यानें सहज ध्यानीं येईल. ह्या आकृतिंत दाखविलेला साज एक घोड्याचा आहे. जोडीच्या साजांत कांहीं भाग जास्त असतात ते पुढें योग्य ठिकाणीं दाखविण्यांत येतील.

साजाचे मुख्य भाग तीनः—

आकृति २७



(अ) गाडी ओढण्यासाठीं;

(ब) गाडी उचलून धरण्यासाठीं;

(क) घोड्याला हांकण्यासाठीं.

अ. गाडी ओढण्यासाठीं उपयोगीं पडणारे साजाचे भागः—

१. हांसोळी–Collar कालर.

२. हल्के–Hames हम्स.

३. छातीपट्टा–Breast-plate ब्रेस्टप्लेट.

४. जोतपट्टे–Traces ट्रेसेस.

ब. गाडी उचलून धरण्यासाठीं उपयोगीं पडणारे साजाचे भागः—

५. कठडी; छाल–Pad पॅड.

६. ढल्ली; नमदा–Numdah नमदा.

७. तंग–Girth गर्थ.

८. लुगी–Shaft-tug शफ्टटग.

९. बारकश–Back-band बॅकबॅन्ड.

१०. बेलीतंग–Belly-band बेलीबॅन्ड.

११. दुमची–Crupper क्रुपर.

क. घोडा हांकण्यासाठीं उपयोगीं पडणारे भागः—

१२. अंधारी—Blinkers ब्लिंकर्स.

१३. सरदवाळी—Head-piece हेडपीस.

१४. नासबंद—Nose-band नोझबॅन्ड.

१५. गलतनी—Throat-lash थ्रोटलॅश.

१६. बहादुरी—Lip-strap लिपस्ट्रप. *

१७. कनसीरा—Brow-band ब्रोबॅन्ड.

१८. कायजा—Bearing-rein बेअरिंगरेन.

१९. रासपट्ट्या—Reins रेन्स.

२०. लगाम—Bit बिट. *

२१. सांखळी; जेरकडी—Curb-chain कर्बचेन.*

२२. पुष्तंग—Breeching ब्रीचिंग.

२३. लाथपट्टा—Kicking-strap किकिंगस्ट्रप.

२४. जेरबंद—Martingale मार्टिंगेल. *

साजाचे वर सांगीतलेले भाग एकमेकांशीं जोडण्यासाठीं बकसुऱ्यांची (बकल्स Buckles) योजना असते. बकसुऱ्यांनीं जोडलेल्या भागांच्या चाम-

* हा भाग आकृतींत काढलेला आहे परंतु त्या ठिकाणीं आंकडा घातलेला नाहीं.

ड्याचीं टोंकें सुटीं राहूं नये ह्मणून बकसुव्यांजवळ चामड्याचीं नाकें (कीपर्स Keepers) लावलेलीं असतात.

हांसोळी (१) हा साजाचा मुख्य भाग होय. हांसोळी घोड्याच्या मानेला आणि खांद्यावर चांगली बसणारी असणें अगदीं अवश्य आहे ह्मणून जिनगरांनीं चापाच्या, कमाणीच्या, वगैरे अनेक प्रकारच्या हांसोळ्या केल्या; पण आकृति २७ मधल्या नमुन्याची पेंढा घालून चामड्यानें मढविलेली हांसोळी (१)च फार सोईची आणि सांप्रत प्रचारांत आहे. हांसोळी.

हांसोळी बेताची असून जोतपट्टे योग्य ठिकाणीं बसविलेले असले तर घोड्याला गाडी ओढण्यांत त्रास व इजा होत नाहीं. हांसोळी लहान असली तर तिचा घोड्याच्या घशावर दाब पडून त्याला श्वासोच्छ्वास करण्याला फार अडचण पडते; तसेंच हांसोळी मोठी सईल असली तर घोड्याचा खांदा आणि मान घांसून तेथें जखम होते आणि सहजच त्याला मागें हटण्याची किंवा अडण्याची संवय लागते. बेताची नसल्याचे परिणाम.

हांसोळी अशी बनविलेली असावी कीं गाडी ओ- कशी असावी.

ढतेवेळीं जोतपट्ट्यांवर पडणारा भार तिच्या योगानें घो-ड्याच्या खांद्यांच्या सर्व भागांवर विभागला जावा. ती घोड्याच्या खांद्यांवर सपाट राहील अशी असावी. हांसोळी आणि घोड्याची मान या दोहोंमध्यें दोन्ही बाजूंला दोन तीन बोटें फिरवितां येतील इतकी ती मोठी असावी. तसेंच घोड्याची मान आणि हांसोळीचा खालचा भाग ह्यांमध्यें तळहात मोकळेपणीं फिरवितां येईल इतकी ती लांब असावी.

केव्हां केव्हां हांसोळीच्या खालीं चामड्याची गादी (हांसोळी घामानें लौकर खराब न व्हावी ह्मणून) घातलेली नजरेस येते पण ती न वापरावी हें चांगलें.

हल्के. हल्के (२) लोखंडाचे असतात. ते हांसोळीच्या पन्हळींत चांगले बसते असून हांसोळीबरोबर घट्ट जखडून बांधलेले असावे; नाहीं तर एखाद्या उंचवट्यावरून गाडी खालीं उतरतेवेळीं अथवा एकदम घोडे आंवरून धरण्याच्या प्रसंगीं हल्के बाहेर निसटून येण्याचा फार संभव असतो. तसें न होऊं देण्यासाठीं हांसोळीच्या खालच्या भागाशीं हल्क्यांच्या कड्यांतून एक लहानशी चामड्याची वादी ओढून बांधावी.

जोडीच्या साजांतील हल्क्यांच्या वाद्यांचीं टोंकें आंतल्या बाजूला रहातील अशा तऱ्हेनें त्या वाद्या बांधाव्या.

हल्क्यांच्या दोन्ही बाजूंला दोन वाटोळीं कडीं असतात त्यांतून रासपट्ट्या काढून लगामीला लावतात.

जोतपट्टे अडकविण्याचे बकसुवेही हल्क्यांलाच लावलेले असतात.

जोडीच्या साजांतील हांसोळीच्या हल्क्याला खालीं एक सुटें वाटोळें कडें असतें त्यांत पोलपीस* घालून घोडा पोलाशीं जोडला जातो.


अलिकडे कितीएक हौशी लोक हांसोळीच्या ऐवजीं आकृति २८ मध्यें दाखविलेला छातीपट्टा वापरतात. छातीपट्टा पाहिजे तसा लहान मोठ्या घोड्याला बसता करून घेतां येतो, ह्मणून तो वापरण्याचा प्रघात ठेवल्यानें पुष्कळ हांसोळ्या बाळगण्याची जरूर रहात नाहीं. सुमारें तीन इंच रुंदीचा जाडी चामड्याचा पट्टा छातीपट्टा.

---

* **पोलपीस**—जोडीच्या घोड्यांपैकीं प्रत्येक घोडा पोलाशीं अडकविण्याचा चामड्याचा पट्टा.

घेऊन त्याच्या आंतील बाजूला नरम गादी मढवून छातीपट्टा करतात. हा पट्टा मानेवरून दोहों बाजूंला पडणाऱ्या एका वादीनें उचलून धरलेला असतो. (आ. २७; ३)

आकृति २८



कसा घालावा. छातीपट्टा खांद्याच्या हाडांच्या वरच्या टोंकाजवळ सपाट पडता राहीला पाहिजे आणि त्याची जुळणी काळजीपूर्वक झाली पाहिजे. नेहेमीं चूक अशी होते कीं तो फार खालीं लावितात. छातीपट्ट्याच्या प्रत्येक टोंकाला एक मोठा बकसुवा असतो त्याला जोतपट्टा अडकवितात. हांसोळी घालून घोड्याकडून जि-

तकें काम करवून घेतां येतें तितकें छातीपट्टा वापरल्यानें येत नाहीं. छातीपट्टा हांसोळीपेक्षां हलका असल्यामुळें त्यापासून घोड्याच्या मानेवर ओझें पडत नाहीं. चांगल्या चालू झालेल्या घोड्याला बेताचेंच ओझें ओढणें असल्यास छातीपट्टा लावल्यास हरकत नाहीं.

हांसोळीच्या हल्क्यांला ज्याप्रमाणें रासपट्ट्या घालण्यासाठीं कडीं असतात त्याचप्रमाणें छातीपट्ट्याच्या मानेवरील वादीलाही कडीं लावलेलीं असतात. (पहा आकृति २८ अ, ब).

जोडीच्या साजाच्या छातीपट्ट्याला मधोमध वाटोळी कडी लावलेली असते तिला पोलपीस लावतां येतो.

जोतपट्टे (४) जाडी चामड्याच्या दीडपासून दोन इंच रुंदीच्या निदान तीन पट्ट्या घेऊन एके ठिकाणीं शिंवून केलेले असतात. लबाड जिनगर मधली पट्टी एकसंधी न घेतां लहान लहान तुकडे घालतात. जोतपट्टे.

जोतपट्ट्याच्या एका टोंकाला सुमारें एक पासून दीड इंच लांब आणि अर्धा इंचपर्यंत रुंद भोंक असतें तें गंडेरीच्या आंकड्यांत अडकवितात. ह्याठिकाणीं

जोतपट्ट्याला दोन्ही बाजूंला पितळेच्या किंवा लोखंडाच्या पट्ट्या मारून गंडेरीच्या आंकड्यांत अडकविण्याचीं भोंकें पाडल्यानें मजबुती जास्ती येते.

जोतपट्ट्याच्या दुसऱ्या टोंकाला हल्क्याच्या बकसुव्यांतील खिळ्याच्या बेताचीं भोंकें निदान पांच पासून सहापर्यंत असावीं, ह्मणजे जोतपट्टे सहज पाहिजे तसे आणि हवे तेव्हां कमी जास्ती करतां येतात.

बारकश कोठें रहावा.

गाडी ओढीत असतांना घोड्याच्या पाठीवरील पट्टा (बारकश ९) कठडीच्या मधोमध राहिला पाहिजे, ह्मणजे त्यापासून गाडीच्या ओढीचा नेट बारकशवर पडत नाहीं आणि घोड्याची "पाठ लागत"* नाहीं.

याप्रमाणें बारकश घोड्याच्या पाठीवर जागच्या जागीं राहण्यासाठीं जोतपट्ट्यांची लांबी बेताची असली पाहिजे.

एक घोड्याच्या गाडीचे जोतपट्टे फार लांब असले तर गाडी ओढतेवेळीं तिचा सर्व भार छुग्यांवर पडून घोड्याला

* पाठीला मद्दूजवळ कठडी घांसल्यानें जखम होते तिला पाठ लागणें ह्मणतात.

पट्ट्याच्या ऐवजीं पोलनेंच गाडीचा सगळा भार ओढावा लागतो. तसेंच पट्टे अगदीं आंखूड असले तर घोडा चालूं लागला ह्मणजे अर्थात् कठडी पुढें घसरते, दुमचीची ओढ शेंपटीच्या दांड्यावर पडते आणि त्यामुळें पुष्कळवेळां घोडा लाथा मारूं लागतो.

घोड्याच्या पाठीवर एक लहान नमदा (६) किंवा गादी ठेवून साजाची कठडी (५) खोगिराप्रमाणें तंगानें (७) कसलेली असते. जोडीच्या साजाची कठडी अगदीं अरुंद आणि लहान असते, व ती एकेरी साजाच्या कठडीप्रमाणें घट्ट कसली जात नाहीं; कारण ज्याप्रमाणें एकेरी साजांतील कठडीवर गाडीचें सगळें ओझें असतें त्याप्रमाणें जोडीच्या कठडीवर मुळींच असत नाहीं.

कठडी आणि तंग.

कठडीचा सांगाडा लांकडाचा असून तो लोखंडाच्या पट्ट्यांनीं जोडलेला असतो. खालीं बुरणुसाची जाडी गादी घालून कठडी चामड्यानें मढलेली असते; तिच्या दोन्ही बाजूंला दोन कडीं असतात त्यांतून रासपट्ट्या घालून वर सांगितल्याप्रमाणें त्या हल्क्यांच्या कड्यांतून काढून लोखंडी लगामीला अडकवितात.

रासपट्ट्यांसाठीं कडी.

कठडीवर एक उभा खिळा असतो त्यांत कायजा (१८) अडकवितात. हा खिळा बहुतकरून नक्षीदार असतो.

छुगे आणि बारकश.

छुगे (८) बहुशः चामड्याचे केलेले असून कठडीच्या दोन्ही बाजूंला बारकशनें जोडलेले असतात. हे फक्त एकेरी साजांत असतात. गाडीचे दोन्ही पोल छुग्यांच्या आधारानें उचललेले रहातात. गाडी जोडतांना छुगे सदोदित पोलांच्या खिळ्यांच्या बाहेरच्या बाजूला ठेवावे, नाहीं तर एखाद्यावेळीं गाडी वेगानें चालत असतांना किंवा उतरणीवरून जात असतांना ती घोड्याच्या पुठ्यावर आपटून कधीं कधीं मोठा अपघात घडतो.

बेलीतंग.

छुगे जागच्याजागीं आणि चांगले घट्ट कसतां येण्यासाठीं बेलीतंग (१०) लावलेला असतो.

कठडीच्या मागल्या बाजूला एक लोखंडी अर्धवर्तुलाकार कोयंडा लावलेला असतो त्यांत दुमची (११) अडकवितात.

दुमची.

कठडी घोड्याच्या पाठीवर योग्य जागीं राहील अशा बेतानें दुमचीची जुळणी करावी. दुमची लहान

मोठी करण्यासाठीं तिला बकसुवा आणि वादी असते. सदोदित घोड्याचा पुठ्ठा व दुमची ह्यांमध्यें तळहात फिरेल इतकें अंतर राहील अशा बेतानें दुमची ढिली ठेवावी. दुमची फार घट्ट ओढून बांधल्यानें घोडच्याच्या शेंपटीच्या दांडीवर जोर पडून तो पुष्कळ वेळां लाथा मारूं लागतो.

कठडी जुनी झाली ह्मणजे ती सांध्यांतून उकलून रुंद होते, पण चामड्यानें मढलेली असल्यामुळें तिचे अगदीं निराळे तुकडे होत नाहींत; तरी ती घोड्याच्या पाठीला घांसूं लागते ह्मणून पुष्कळ लोक—विशेषतः भाडोतरी गाडीवाले—कठडीखालीं फार जाडी गादी घालतात. असली जुनी झालेली कठडी अगदीं वाईट दिसून शिवाय घोडच्याला त्रासदायक होते.

एकेरी साजाची कठडी तंगानें घट्ट कसलेली असावी नाहींतर गाडी चालतांना ती मागेंपुढें सरकून घोडच्याच्या पाठीला घट्टे पडतात किंवा तिच्यामुळें बगलेंतील चामडी घांसली जाते. अशाप्रकारें बगलेंत कठडीचा तंग लागूं नये ह्मणून तंगाखालीं पुष्कळवेळां जाडी बुरणूस घालतात. कठडी कसणें.

अंधारी. घोड्याला बाजूला पहातां येऊं नये ह्मणून वर्तुलाकार किंवा चौकोनी व किंचित् खोलगट असे चामड्यानें मढविलेले तळहाताएवढाले सरद्वालीला जे दोन लोखंडी पत्र्याचे तुकडे लावलेले असतात त्यांस अंधारी (१२) ह्मणतात.

गाडीच्या घोड्याला अंधारी घालावी किंवा न घालावी याविषयीं पुष्कळ मतभेद आहे; पण साधारणतः अंधारी घालणें चांगलें; मात्र ती अशा रीतीनें घालावी कीं घोड्याचे डोळे तिच्या मधोमध रहावे आणि लगामीवर दाब पडला तरी अंधारी उचलली जाऊन घोड्याला मागें पाहतां येऊं नये; तसेंच अंधारीचीं पुढलीं टोंकें आंत वळून घोड्याच्या डोळ्यांना न लागण्याबद्दल खबरदारी असावी. ह्या बाबतीकडे पुष्कळांचें दुर्लक्ष असतें. अमेरिकेंत आणि अगदीं हलक्या गिग वगैरे गाड्यांच्या घोड्याला पुष्कळ लोक अंधारी घालीत नाहींत.

सरद्वाली. सरद्वाली (१३) बेतानें घट्ट असली ह्मणजे लगामीवर दाब पडला तरी अंधारी फुगून घोड्याच्या कानशिलांपासून दूर सरकत नाहीं.

नासबंद (१४) व घोड्याचा जबडा ह्यांमध्यें दोन बोटें फिरवितां येतील इतका तो सैल असावा. नासबंद.

गलतनी (१९) फार घट्ट बांधूं नये. पुष्कळ घोडेवाले गलतनी जितकी घट्ट बांधवेल तितकी बांधतात, पण त्यापासून घोड्याला श्वासोच्छ्वास करण्यास अडचण पडते आणि घोडा घाबरतो. गलतनी व घोड्याचा गळा या दोंहोंमध्यें तीन बोटें फिरण्याइतकी जागा रहावी. गलतनी.

बहादुरी नेहमींच वापरतात असें नाहीं; जर वापरलीच तर ती फार ओढून बांधलेली नसावी. बहादुरी.

सरदवाली मागें सरकूं नये ह्मणून कनसीरा(१७) लावतात. ह्या पट्टीवर नकशी, किंवा रुपेरी मुलाम्याची सांखळी वगैरे शोभेसाठीं लावतात. ज्या ठिकाणीं सदरवालीला कनसीरा लावलेला असतो तेथें शोभेसाठीं धातुचीं नक्षीदार फुलें किंवा रेशमी फितीचे गोंडे (रोझेट्स) लावतात. कनसीरा.

कायजा लावण्याविषयींही निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे विचार आहेत. इतकी गोष्ट खरी कीं कायजा लावल्यानें आणि तो ओढून बांधल्यानें घोडा मान कायजा.

ऐटींत ठेवतो; अशा समजुतीनें पुष्कळ गाडी हांकणारे घोड्याचा कायजा ओढून ओढून कठडीवरच्या खिळ्यांत अडकवितात परंतु त्यापासून बिचाऱ्या त्या मुक्या प्राण्याला त्रास होऊन त्याची कोमल जीभ अनेकवेळां छिन्नविछिन्न होते. एकंदरीनें गाडीच्या घोड्याला कायजा न लावणें चांगलें. कदाचित् लावलाच तर फक्त गाडी चालत असतानां मात्र लावावा, आणि गाडी उभी राहिल्याबरोबर तो काढण्याविषयीं मोतद्दाराला सक्त ताकीद असावी. कधींही कायजा फार घट्ट लावूं नये. ज्या घोड्याला आपलें डोकें खालीं घालण्याची संवय असते त्याला कायजा लाविल्यानें तो डोकें खालीं घालीत नाहीं. कायजा नसला तर गाडीला चालणारच नाहींत असेही पुष्कळ घोडे असतात. कायज्याच्या योगानें घोड्याचें डोकें पाहिजे तितकें तोललेलें राहतें व तेणेंकरून हांकणाराच्या हातावर वजन पडत नाहीं. ज्वान किंवा लाथा मारणारा घोडा हांकतांना त्याचा कायजा सैल असावा हें बरें; कारण तशानें त्या घोड्याला आपलें डोकें दोन्ही पायांमध्यें घालून अनावर होऊन पळत सुटतां येत नाहीं. कायज्याची जु-

ळणी करण्यास थोडासा अभ्यास लागतो; कारण घोडा स्थिर उभा राहतो तेव्हां ती खरोखर असते त्यापेक्षां अधीक घट्ट आहे असें दिसतें.

गाडीचा घोडा हांकण्यासंबंधानें अति उपयोगाचा आणि महत्वाचा भाग ह्मटला ह्मणजे रासपट्ट्या होत. एकेरी साजाच्या रासपट्टीची लांबी २३ फूटांपासून २९ फुटांपर्यंत असावी. ही लांबी मुख्यत्वें घोड्याच्या लांबीवर अवलंबून असते हें उघडच आहे; परंतु हांकणारानें रासपट्ट्या हातांत धरल्या ह्मणजे त्याच्या हातांपासून पुढें निदान चार पांच फूट, ह्मणजे त्याच्या पायांपर्यंत पोंचतील इतक्या, लांबीच्या असाव्या. कितिएकांचा अभिप्राय असा आहे कीं रासपट्ट्या फार लांब ठेविल्यानें त्या हांकणाराच्या पायांत गुरफटण्याचा संभव असतो, परंतु ह्या अडचणीपेक्षां आंखूड रासपट्ट्यांनीं घोडा हांकण्यांत जो त्रास पडतो त्यावरून रासपट्ट्या लांब ठेवणें हें सोईचें असें माझें मत आहे. रासपट्ट्या.

कठडीवरील कड्यांपासून घोड्याच्या तोंडापर्यंतचा रासपट्ट्यांचा भाग वाटोळा असून त्याच्या पुढ्या-


पासून हांकणाराच्या हातांत रहाणारा भाग चपटा अशा प्रकारची रासपट्टी एका टोंकांपासून दुसऱ्या टोंकापर्यंत चपट्या रासपट्टीपेक्षां जास्त सोईवार असते. या दोंहों-पैकीं कोणत्याही प्रकारची रासपट्टी असली तरी हातांत जो भाग रहावयाचा त्याची रुंदी हांकणाराच्या बोटां-च्या लांबीच्या बेताची असावी. साधारणतः रासपट्टीची रुंदी एक इंच असावी. रासपट्ट्या फार जाडी असल्या तर नेहमीं ताठ व कठीण रहातात; तसेंच जर त्या फार पातळ असल्या तर मऊ पडून हातांतून सरकतात आणि त्यापासून हांकणाराला त्रास होतो ह्मणून रासपट्ट्या मध्यम जाडीच्या असाव्या.

कांहीं रासपट्ट्यांचा अर्धा भाग ह्मणजे जो भाग हांकणाराच्या हातांत रहावयाचा तो पांढऱ्या किंवा काळ्या रोगणी चामड्याचा असतो; त्यांत शोभेपेक्षां अन्य कोणत्याही तऱ्हेचा फायदा नाहीं.

कांहीं लोक रासपट्ट्यांच्या ठिकाणीं रेशमी दोरीचा उपयोग करतात. ही साफ न करतां येत नाहीं; तसेंच पाण्यानें भिजली ह्मणजे वाईट दिसूं लागते.

लगामी पुष्कळ तऱ्हेचा असतात. फार प्रचारांत असलेल्या दोन प्रकारच्या लगामी आकृति २९ मध्यें दाखविल्या आहेत. ह्या दोहोंपैकीं किंवा अन्य कोणत्याही प्रकारची लोखंडी लगाम वापरण्यांत असली तरी तिचा मधला दांडा घोड्याच्या तोंडांत त्याच्या सुळ्यांच्या वरच्या बाजूला सुमारें एक इंचावर राहील अशा बेतानें लावावी. लगाम.

आकृति २९.



जेरकडी फार घट्ट असूं नये; ती व घोड्याचा जबडा ह्यांमध्यें निदान दोन बोटें जातील इतकी जागा असावी. जर एखाद्या घोड्याला ओढ घेण्याची संवय असली तर अडाणी घोडेवाला सांखळी नेहमीं ब- जेरकडी.

नेल तितकी घट्ट अडकवतो. यापासून बहुतकरून घोडा उसळूं लागतो किंवा अधीकच जोरानें ओढूं लागतो, आणि सांखळीचा दाब जास्त पडून जबड्याच्या खालच्या भागाला दुखापत होते. अशी इजा झाल्यास त्याला उत्तम उपाय असा कीं सांखळीवर चामड्याचा तुकडा बसवावा, ह्मणजे त्यापासून ती दुखावलेल्या जागीं घांसत नाहीं.

बाग करणाऱ्या घोड्याला उपाय.

जर एखादा घोडा बाग करणारा (एकाच बाजूवर जाणारा) असला तर ज्या बाजूला त्याला जाण्याची संवय असेल त्या बाजूला त्याच्या बिटच्या खालच्या घरांत रासपट्टी अडकविल्यानें तो बहुतकरून सरळ चालूं लागतो. कांहीं घोडे फार कडक लगाम घातल्यानें ओढतात पण नुसत्या सुतळीच्या लगामीनें ओढीत नाहींत. फार हलक्या तोंडाच्या घोड्याला चामड्यानें मढविलेलें दुहेरी कड्यांचें कडचाळेंच (स्नेफल्) पुरतें.

मूजोर घोड्याला उपाय.

लगामीला न जुमानतां ओढून पळणाऱ्या घोड्याच्या नाकावर जाळी घातल्यानें तो आपली खोड टाकतो असें अनुभवास आलें आहे. परंतु हा जाळी-

चा गुण कायमचा आहे कीं नाहीं ह्याबद्दल संशय आहे. ह्मणून जाळी सदोदित न घालतां मधून मधून कांहीं दिवस घालूं नये.

घोडा फार दिवसांपासून मूजोर असला तर त्याला कोणत्याही बिटची एकदां संवय झाली ह्मणजे पुढें तो तिला ऐकेनासा होतो, अशा घोड्याला वारंवार बिट बदलण्याशिवाय अन्य उपाय नाहीं.

डोंगराळ प्रदेशांतून गाडी हांकतांना (ब्रीचिंग) पुष्तंग अवश्य लावावा. व मुख्यत्वेंकरून दुचाकी गाडीच्या घोड्याला तर हा पाहिजेच. तो मांडीच्या वरील भागापासून सुमारें एक फूट लोंबता दूर राहील असा असावा; आणि घोडा जोडलेला असतो तेव्हां त्याच्या आंगापासून सुमारें चार सहा इंच खेळता ठेवावा. पुष्तंगाचा उपयोग.

डागकार्टला तीन प्रकारचे (ब्रीचिंग) पुष्तंग लावतां येतात. तीन प्रकारचे पुष्तंग.

१ बारकशच्या एका बाजूस छुग्यापासून घोड्याच्या मांड्यावरून थेट दुसऱ्या छुग्यापर्यंत असणारा पट्टा.

२ एका पोलाच्या बाहेरच्या बाजूला बसविलेल्या पितळेच्या कडीला अडकवून वरच्याप्रमाणेंच घोड्याच्या मांडयांवरून दुसऱ्या बाजूच्या पोलाला लावलेल्या कडींत अडकविलेला पट्टा. हा (ब्रीचिंग) पुष्तंग लावण्याच्या कड्या गाडीच्या सुपडीपासून सरासरी दोन अडीच फुटांचे लांबीवर पोलाच्या बाहेरच्या बाजूला लावतात.

३ चामड्याचा एक रुंद पट्टा गाडीच्या पुढच्या भागापासून ह्मणजे सुपडीपासून सुमारें सहा किंवा आठ इंचांवर दोन्ही पोलांला ताणून बांधलेला असतो. हा नेहमीं तयार मिळतो, ह्याची जुळणीवगैरे कांहीं करावें लागत नाहीं; हा दिसण्यांत सुरेख असून चांगला उपयोगी असतो. ब्राउन्स पेटन्ट ह्या नांवानें हा प्रसिद्ध आहे.

पुष्तंग घांसल्यास उपाय.

जर कदाचित् घोड्याच्या मांड्या पुष्तंगाच्या योगानें घांसल्या तर अधीक नुकसान न होऊं देण्याची उत्तम युक्ति ह्मटली ह्मणजे मेंढ्याच्या कातड्याचा एक मोठा तुकडा घेऊन त्यावरील केंस बाहेर ठेवून तो पट्ट्यावरून शिंवून टाकणें ही होय.

साज एकेरी किंवा दुहेरी असला तरी लाथपट्टा उपयोगांत आणण्यास हरकत नाहीं. एकेरी साजांत हा पट्टा एका पोलापासून दुमचीच्या दुरमडींतून दुसऱ्या पोलाशीं अडकवावा. दुहेरी साजामध्यें हा कठडीला अडकविलेला असतो. ह्याचे दोन्ही भाग कठडीपासून गंडेरीपर्यंत दुमचींतून एकमेकांशीं घोड्याच्या पुठ्ठ्यावरून एका आंखूड पट्ट्यानें जोडलेले असतात. लाथपट्टे अशा रीतीनें जुळवावे कीं त्यापासून घोड्याच्या पुठ्ठ्याकडील सर्व भागाचें चलनवलन होण्यास कोणत्याही प्रकारें अडचण होऊं नये. लाथपट्टे घट्ट असून जर घोडा एकदम चौकचालीनें चालूं लागला तर ते पट्टे त्याच्या पुठ्ठ्याला लागून तो लाथा झाडूं लागतो. हे पट्टे घोड्याच्या पुठ्ठ्यापासून एक हात अंतरावर खेळते रहावे. लाथपट्टा.

कित्येक घोड्यांला वर मान करून चालण्याची संवय असते व त्यामुळें ते जोरानें लगाम ओढतात. अशा घोड्यांला (मार्टिंगेल्) जेरबंद चांगला उपयोगीं पडतो. जेरबंद.

जो घोडा आपलें डोकें वर उडवितो त्याला आणि जो मागल्या पायावर उभा रहातो त्याला जेरबंद लावणें फार चांगलें. घोड्याचें नाक त्याच्या

खांद्यासमोर येईल अशा बेतानें जेरबंद ओढून लावावा; व तो सामान्यतः नासबंदालाच लावावा; परंतु तो बिटला जोडला असतांही हरकत नाहीं; आणि ह्याप्रमाणें जोडला ह्मणजे अर्धचंद्राकृति किंवा ज्याला सांधा नाहीं अशा स्नेफल् लगामीचा उपयोग करणें चांगलें, कारण ह्या जोडणीपासून घोड्याच्या तोंडाच्या कोंपऱ्याला दुखापत होण्याचा संभव फारच कमी असतो.

"चीकलेदर्स्."

लोखंडाच्या लगामीच्या दोन्ही टोंकांला जाडी चामड्याचे वाटोळे तुकडे अडकवितात त्यांस " चीकलेदर्स् " ह्मणतात.

सुमारें दोन अडीच इंचांचे जाडी टणक चामड्याचे तुकडे घेऊन त्यांस कड्याळ्याच्या दांड्याच्या जाडीचीं मधोमध भोंकें पाडावीं आणि त्या भोंकांपासून बाहेरच्या धारेपर्यंत समोर चीर पाडावी आणि एक एक तुकडा कडळ्याच्या टोंकांस अडकवावा. हे वापरल्यानें घोड्यांच्या गालफडांला लगामीच्या कड्यांनीं चिमटा बसत नाहीं, शिवाय त्यामुळें घोड्याला लगाम दातांत धरतां येत नाहीं.

वाग करणाऱ्या घोड्याला उपाय.

जो घोडा एकाच बागेवर ओढतो त्याच्या लगामीला चामड्याचे तुकडे लावून ज्या बाजूला तो ओढतो त्या बाजूच्या तुकड्याला थोड्या छताच्या चुका (टेकसी) माराव्या ह्मणजे त्या चुका बोंचल्यानें घोडा बाग करण्याचें टाकून देतो.

कधीं कधीं फार जोरानें ओढणाऱ्या घोड्याला—विशेषतः जोडींतल्या घोड्याला—तोंडांत मोठा लिव्हर्पूल बिट सैल चढवून रासपट्ट्या गालकड्यांला अडकवून हांकल्यानें घोडा आटोक्यांत रहातो. जरूर पडली तर ह्याच गालकड्यांला कायजा लावतां येतो.

घोड्याच्या तोंडाची कळ.

वस्तुतः बहुतकरून प्रत्येक घोड्याच्या तोंडाची विवक्षित कळ असते; मात्र ती सांपडली पाहिजे किंवा शोधून काढतां आली पाहिजे; ती शोधून काढण्याचें श्रेय घेणें हें अगत्याचें आहे. ती सांपडण्याला पुष्कळ शांतता व पुष्कळ प्रयोग करून पहाणें जरूर आहे, ह्मणून ज्याला निरनिराळे घोडे हांकावयाचे असतात त्याच्यापाशीं बिटांचा जातवार मोठा संग्रहच असला पाहिजे.

गाडी हांकणाराच्या हाताचा परिणाम.

गाडी हांकण्यांत लोखंडी लगाम, रासपट्ट्या वगैरे सर्व सामान उत्तम असून हांकणाराचा हात जड असला तर घोडे नीट चालत नाहींत. जसा लिहिणाराचा हात जड अगर हलका त्याचप्रमाणें गाडी हांकणारांचा हात जड अगर हलका असतो; तरी रासपट्ट्या लोखंडी लगामीच्या कड्यांत वर खालीं लावतांना हांकणारानें आपला हात कसा आहे ह्याचा विचार केला पाहिजे. घोडा आणि त्याचा हांकणारा यांचा परस्पराशीं संबंध किती हें जरी मोजून दाखवितां येत नाहीं तरी तो पुष्कळ अंशीं हांकणाराच्या हातावर अवलंबून रहातो. हातावर केव्हां किती भार ठेवावा हें अनुभवानें आणि अभ्यासानें कळूं लागतें.

चाबूक.

गाडीच्या घोड्याच्या साजाच्या भागांपैकींच चाबूक हा एक महत्वाचा भाग आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

एक घोड्याच्या गाडीचा चाबूक.

चाबूक जितका हलका आणि समतोल असेल तितका चांगला. त्याची काठी बारीक असून ताठ कणखर असावी. एक घोड्याच्या गाडीच्या चाबकाची वादी काठीच्या निम्मे लांब असावी. वादीचें टोंक नेहेमीं चामड्याचें असलेलें चांगलें.

एक घोड्याची गाडी हांकण्यासाठीं कांहीं हौशी लोक स्वारीच्या चाबकासारखाच लांब चाबूक वापरतात.

जोडीचा, टन्डेमचा व चौकडीचा चाबूक पुष्कळ लांब आणि जड असून त्याची वादी बहुशः काठीच्या दिढी दुपटीनें लांब असते. जोडीच्या गाडीचा चाबूक.

चाबूक गाडीखान्यांत कधींही भिंतीला टेंकून किंवा एखाद्या कोंपऱ्यांत उभा करून ठेवूं नये, तेणेंकरून तो लौकर वांकून जातो, ह्मणून तो नेहेमीं खुंटीला टांगून ठेवावा. चाबूक कसा ठेवावा.

जोडीच्या आणि चौकडीच्या साजाचे मुख्य भाग एकेरी साजाप्रमाणेंच असतात. ह्या साजाच्या विशेष भागांचें वर्णन पुढें योग्य ठिकाणीं देण्यांत येईल.

गाडीच्या घोड्याचा साज दोन प्रकारच्या चामड्याचा करतात. (१) काळ्या रोगणी चामड्याचा; (२) तपकिरी चामड्याचा. त्याचप्रमाणें त्यांतील धातूचे भाग ह्मणजे बकसुवे, कडीं वगैरे पितळेचीं किंवा चांदीचा मुलामा दिलेलीं असतात. दोन प्रकारचे साज.

रोगणी चामड्याचा व मुलाम्याच्या बकसुव्यांचा असा साज असला तर त्याला तपकिरी चामड्याच्या व पितळी बकसुव्यांच्या साजापेक्षां किंमत अधीक पडते; तो जास्ती देखणा खरा पण तपकिरी चामड्याच्या साजा इतका टिकाऊ असत नाहीं. ह्या दोहोंपैकीं कोणत्याही जातीचा साज असला तरी तो चांगला स्वच्छ ठेवून त्याला वेळच्या वेळीं तेल वगैरे लावल्यानें तो जास्त टिकतो.

मुलाम्याचे बकसुवे वगैरे साफ करणें.

चांदीच्या मुलाम्याचे बकसुवे साफ करणें असतील तेव्हां पाण्यांत खडू भिजवून त्यांवर तो चांगला दाट लावावा; खडूचा लेप वाळल्यावर बारीक कपड्याच्या रुमालानें सर्व भाग साफ पुसून काढावे; नंतर शामीलेदर ह्मणून मऊ पिंवळें चामडें असतें त्याणें ते चांगले चोळावे.

पितळी सामान साफ करणें.

पितळी सामान साफ करणें झाल्यास त्याला खोबऱ्याचें तेल लावून विलायती पिंवळ्या मातीच्या विटेनें घांसावें. नंतर तें प्रथम रुमालानें आणि मग शामी लेदरनें पुसावें.

लोखंडी लगाम आणि तिची जेरकडी व साजाचे इतर लोखंडी भाग अगदीं स्वच्छ चकचकीत ठेवावे. ते स्वच्छ करण्यांत प्रथम खोबऱ्याचें तेल लावावें. चिनी प्याले वगैरेचे तुकडे बारीक कुटून त्यांची चांगली पुड करावी आणि तेल लावलेल्या लोखंडी भागांवर बराच वेळपर्यंत ती जोरानें घांसावी; मग ते सर्व भाग रुमालानें साफ पुसावे, आणि बरनिशर (तिख्याच्या कड्यांची गुंफलेली चौकोनी जाळी) नें चांगली जिल्हई येईपर्यंत घांसावे. लगाम व जेरकडी साफ करणें.

रोगणी चामड्याच्या साजाला चकाकी आहे तों पर्यंत तो दर पंधरा दिवसांनीं चांगला पुसून त्याला सालाड ऑइल (एका जातीच्या वनस्पतीचें तेल बाजारांत मिळतें त्याला कांहीं लोक सालीट तेल ह्मणतात) थोडें थोडें लावावें आणि चकाकी मलीन झाल्यावर त्याला आयतें मिळत असलेलें बॉइल्ड ऑइल (शिजविलेलें अळशीचें तेल, ह्याला बाजारांत बेलतेल ह्मणतात) लावावें. रोगणी साजाला तेल कोणतें आणि कसें लावावें.

तपकिरी चामड्याचा साज साफ करण्याचा अनुक्रम खालीं लिहिल्याप्रमाणें ठेवावा. तपकिरी साज साफ करणें.

दर पंधरा दिवसांनीं साजाचे भाग निरनिराळे सोडवावे आणि बारसोप नांवाच्या साबणावर खादीचा ओला रुमाल घांसून साबण घांसलेल्या बाजूनें तो रुमाल साजाच्या प्रत्येक भागावर घांसावा. नंतर कोरड्या रुमालानें सर्व भाग चांगले पुसून काढावे.

बारसोपपेक्षां प्रापर्ट्स सॅडल सोप चांगला. त्याच्यावर ओला स्पंज किंवा ओला रुमाल अगदीं हलक्या हातानें फिरवून तो साजाच्या चामड्यावर जोरानें घांसावा. साबू आंत जिरून चामडें कोरडें पडलें ह्मणजे तें बारीक रुमालानें चांगलें पुसावें; ह्यापासून चामड्याला जिल्हई येऊन तें मऊ होतें.

खोबऱ्याचें तेल कोणत्या भागांस लावावें.

दर आठ दिवसांनीं साजांतील जोतपट्टे, बेलीतंग वगैरे भागांला खोबऱ्याचें तेल बरेंच लावावें; कठडी, हांसोळी किंवा छातीपट्टा व अंधारी इत्यादि भागांला थोडें लावावें. रासपट्ट्यांचा जो भाग घोड्याच्या पुठ्यापासून गाडीकडे ह्मणजे हांकणाराच्या हातांत नेहेमीं राहून पायांवर वगैरे पडण्याचा तितक्याशिवाय बाकीच्या भागाला तेल लावावें.

तेलापेक्षां मेणतेल लावणें जास्ती चांगलें. मेणतेल तयार करणें असल्यास खालीं दिलेल्या जिनसा सांगितल्या प्रमाणानें घ्याव्याः— मेणतेल.

अळशीचें तेल	सव्वाशेर	शेर ४० रु० भाराचा.
टरपेन्टाइन	पावशेर	,,
पिंवळें मेण	पावशेर	,,
राजन (राळ)	पावशेर	,,
बकऱ्याची चरबी	अर्धाशेर	,,
कागदी निंबें	अर्धाशेर	,,
कापूर	एकतोळा	

बारसोपची वडी एक, अजमासें दोन शेर.

कोलन वाटर दोन तोळे.

प्रथम अळशीचें तेल चांगलें ऊन करून तें गाळून घ्यावें. नंतर पिंवळें मेण, बारसोप, राळ व चरबी हे जिन्नस निरनिराळे ऊन करून पातळ झाल्यानंतर ते सर्व अळशीच्या तेलांत मिसळावे आणि त्यांत टरपेन्टाइन ओतावें; कोलन वाटरांत कापूर विरघळवून तें वरील मिश्रणांत टाकावें आणि मग त्या सर्व मिश्रणास एक कढ येईपर्यंत तें विस्तवावर ठेवावें. विस्तवावरून कसें करावें.

उतरल्यानंतर कागदी निंबांचा रस आंत पिळून एकंदर मिश्रण चांगलें ढवळावें ह्मणजे मेणतेल तयार झालें.

मेणतेल कसें लावावें.

हें तेल ज्या तपकिरी किंवा पांढऱ्या चामड्यास लावावयाचें असेल तें पाण्यानें व साबणानें प्रथम चांगलें धुवावें; नंतर तें पुसून अगदीं कोरडें झाल्यावर उन्हांत ठेवावें. ओलावा गेला ह्मणजे वरील मेणतेल हातानें जोरानें घांसावें आणि तें चामडें उन्हांत ठेवून तापल्यावर जाड खादीच्या रुमालानें चांगलें पुसावें. मग दुसरा स्वच्छ रुमाल घेऊन त्यानें तें पुन्हां चांगलें पुसावें. अशा रीतीनें तेलकटपणा राहिला नाहीं अशी पक्की खात्री होईपर्यंत पुसावें.

खोबऱ्याचें तेल लावण्यापेक्षां मेणतेल लावण्याची खटपट जास्ती आहे पण त्यापासून साज जास्त चांगला राहतो.

पावसाळ्यांत साजाला तेल जितकें वारंवार लाववेल तितकें चांगलें.

प्रकरण १२.

गाडीला नवीन घोडा चालविणें.

गाडीचा घोडा चांगल्या रीतीनें गाडींत चालू होईपर्यंत त्याला जो साज वापरावयाचा तो एखादा जुनाच असून त्यांत शोभेपेक्षां मजबुतीकडे लक्ष जास्ती असावें; जुना साज नरम झालेला असल्यामुळें घोड्याच्या शरीरावर जेथच्या तेथें बसून त्याला त्रास होत नाहीं.

घोडा चांगला चालूं लागला ह्मणजे नवा साज वापरावा. तो आयता तयार घेण्यापेक्षां हुषार कारागिराकडून घोड्याला बेताचा बसेसा करविणें उत्तम.

विकत घेतलेला घोडा गाडींत चालता असला तर फक्त सामान घालून गाडीला जोडला ह्मणजे झालें. परंतु जर तो गाडींत चालू नसला तर त्याला शिकवावें लागतें. गाडींत घोडा चालू करण्यासाठीं त्याच्या बरोबर मारकूट करण्यापेक्षां त्याची समजूत पाडून सौम्यपणानें शिकविलें तर तो लवकर शिकतो.

नवा घोडा चालू करणें.


नव्या घो-
ड्याला अंधारी
घालणें.

नवीन घोड्याला प्रथम अंधारी घालतांना तो घाबरतो ह्मणून फार सावधगिरीनें त्याला दिलासा देऊन ती घालावी आणि ती काढतेवेळीं त्याच्या डोळ्यांला अगदीं लागूं देऊं नये. पहिल्यानेंच जर त्याला अंधारी- पासून किंवा साजाच्या कोणत्याही भागापासून इजा होऊन एकदां भीती बसली तर ती दूर करण्यास फार प्रयास पडतात. शिकणाऊ घोड्याला ठाणावर अंधारी चढविण्यापूर्वी तिला लावलेलें कड्याळें काढून ठेवून अंधारी घालावी आणि ती अर्धा तास तशीच राहूं द्यावी; ती चढविलेली असतांनाच त्याला गवत खाऊं घालावें नंतर कड्याळें लावून अंधारीसुद्धां बाहेर न्यावा. असें एक दोन दिवस करावें. अंधारीची चांगली संवय न झाली आणि गाडीला घोडा तसाच जोडला तर तो घाबरून त्याला मागें हटण्याची खोड लागते.

हांसोळी घा-
लणें.

अंधारीची संवय बरीच झाली ह्मणजे हांसोळीची संवय करावी; ती सुद्धां अंधारी प्रमाणेंच घोडा ठाणावर असतांना घालावी आणि नंतर हांसोळीसकट त्याला बाहेर न्यावा. पुढें हांसोळीच्या बकसुऱ्याला जोतपट्टे ला- वून ते पाठीवर टाकून घोड्याला फिरवावा. हा क्रम चार पांच दिवस सकाळ संध्याकाळ चालू ठेवावा. पाठीवरील (पॅड) कठडी दुमची सुद्धां अगदीं शेवटीं घालावी.

ह्याप्रमाणें घोड्याला साजाच्या सर्व भागांची चांगली ओळख झाल्यावर त्याला बाहेर न्यावा आणि आकृति ३० मध्यें दाखविल्याप्रमाणें दोन लांब रासपट्ट्या लावून फिरवावा. रासपट्ट्या लावणें.



आकृति ३०.

रासपट्ट्या साधारण एकेरी काढणीसारख्या असल्या तरी हरकत नाहीं.

नव्या घोड्याला गाडीसाठीं तयार करणें.

चामड्याचा निदान चारपांच इंच रुंदीचा पट्टा घेऊन त्याचा घोड्याच्या पाठीवरून पोटाखालून पुरेल इतका, सरासरी सहा सात फूट, लांब तंग करावा; आणि घोड्याच्या दोन्ही बाजूंवर येतील अशा बेताच्या त्याला दोन चामड्याच्या कड्या लवाव्या. ह्या तंगाला दुमची लावण्याची सोय करावी. हा तंग कसून कड्यांतून रासपट्ट्यांचीं टोंकें काढून लगामीच्या कड्यांला बांधावीं आणि दोन्ही रासपट्ट्या मागें दूर धरून घोड्याला चाबकाच्या इषाऱ्यानें आकृतींत दाखविल्याप्रमाणें चालवावा. तंगाच्या ऐवजीं एकेरी साजाची कठडी घालून पोल घालण्याच्या छुग्यांतून रासपट्ट्या घातल्या तरी काम होतें. आकृति ३० मध्यें हीच योजना दाखविली आहे. इंग्रजी खोगिराच्या लोखंडी रिकाबी काढून रिकाबसोटांतून काढण्या घालून लगामीला लावल्यानेंही इच्छित उद्देश पार पडतो.

काढण्या लांब असल्या तर त्या पायांत गुरफटतील ह्मणून दुमचीमध्यें लाथपट्टा लावून त्याच्या नाकांतून

आकृतींत दाखविल्याप्रमाणें त्या घालून नंतर तंगाच्या कड्यांतून नेऊन मग बिटमध्यें अडकवाव्या.

बिटला बराच सैल असा इंग्रजी खडा जेरबंद ठेवावा. लगाम तोंडांतील सुळ्यांच्या आणि दाढांच्या मधोमध राहून घोड्याच्या तोंडाच्या कोंपऱ्यांवर तिचा दाब पडे इतकें घोड्याला डोकें उंच करतां येईल अशा बेतानें जेरबंद लावावा. आकृतींत जेरबंद लावलेला नाहीं.

घोड्याला इकडे तिकडे चालवून चाबकाच्या इषाऱ्यानें त्याला बिटवर कमी जास्ती ओढ पडेल त्याप्रमाणें चालण्यास शिकवावें. हांकणारानें नेहमीं चाबूक आपल्या हातांतच ठेवावा आणि एका बाजूची रासपट्टी आंखूड करून वाटोळा घेरे घालीत घोड्याला चालवावा. ह्यापासून तो एकसारखा चालण्यास शिकतो; व हांकणारालाही त्याचा पुट्ठा नीट दोन्ही रासपट्ट्यांच्या मध्यें ठेवतां येतो आणि त्याला वांकडें तिकडें चालण्याची संवय लागत नाहीं.

ह्या प्रमाणें घोड्याला पुठ्यावर किंवा मांड्याच्या बाजूनें रासपट्ट्या पडून चालण्याची संवय लावण्यापासून

दुसरा फायदा असा आहे कीं त्याला जोतपट्टे किंवा ब्रीचिंग लावलें तरी तो लाथा मारीत नाहीं.

घोड्याला दोन्ही बाजूंनीं फिरवावा.

रासपट्ट्याचा पुठ्ठ्यावर किंवा मांड्यांच्या बाजूवर असल्यानें जर घोडा फारच कातावला तर त्या त्याच्या पाठीवरून घेऊन हांकावयास लागावें. त्याला एकाच रासपट्टीवर फार वेळ पर्यंत मंडळावर धरूं नये; उलट सुलट मंडळावर फिरवावा. तत्रापि जर त्याच्या तोंडाची एक बाजू दुसरीपेक्षां अधीक कठीण असली तर दोन्ही बाजूंनीं सारखा होईपर्यंत जी बाजू कठीण असेल त्या बाजूवर त्याला जास्त वेळ फिरवावा ह्मणजे तो वाग करीत नाहीं, किंवा एकाच बाजूवर तिरकस चालत नाहीं.

मागें हटविणें.

घोडा रासपट्ट्यांच्या इषाऱ्याप्रमाणें एकदम चालण्यास व दोन्ही बाजूंस सारखा नीट वळण्यास शिकला ह्मणजे मग त्याला रासपट्ट्यांच्या इषाऱ्यानें मागें हटण्यास शिकवावें. हेंही पूर्णपणें त्याला येऊं लागलें ह्मणजे मग साज घालून जोतपट्टे लावावे.

घोड्याला इकडून तिकडे फिरवीत असतां जोतपट्टे ओढण्यास दोन माणसें लावावीं; ह्यापासून घोड्या-

च्या खांद्यावर पडणाऱ्या भाराचें मान हवें तसें आणि पाहिजे तेव्हां कमी जास्ती करतां येतें. आरंभीं थोडा-च भार घालावा आणि घोड्याला खांद्यानें ओढण्याची जसजशी संवय होईल तसा भार वाढवावा.

प्रारंभीं घोड्याला फार हळू चालवावा. कित्तीएक घोडे एकदम तबेल्याबाहेर आणून गाडीला किंवा ब्रेकला जोडले तरी चांगले नीट चालतात पण पुष्कळ घोडे असल्या उतावळेपणानें कायमचे बिघडून जातात.

गाडीला घोडा चालू करण्याचा फळा.

या देशांत घोड्याला प्रथम लांकडाच्या जाड फळ्याला जोडून गाडींत कसें चालावें हें शिकवितात. हा फळा सुमारें चार पांच फूट लांब, दीड फूट रुंद आणि दोन इंच जाड असतो; त्याच्या एका टोंकाला लांब गंडेरी बसविलेली असते आणि एक उभा खुंटा सुमार चार फूट उंच बसविलेला असतो. गंडेरीला घोड्याचे जोतपट्टे अडकवितात आणि शिकविणारा फळ्यावर बसविलेल्या उभ्या दांड्याला धरून उभा राहतो. घोडा गाडीला जोडण्यास योग्य होईपर्यंत त्याला दररोज ह्या फळ्याला जुंपून चालवितात. घोडा शि-

कविण्याची ही रीत वाईट नाहीं; कारण अशा तऱ्हेनें जोडलेल्या घोड्यानें जरी लाथा किंवा उड्या मारल्या तरी त्यापासून त्याला फारशी इजा होत नाहीं, शिवाय तो फळा हलका असून पाहिजे तेव्हां त्याच्यावर जरूरीप्रमाणें एक दोन माणसें उभीं केल्यानें भार कमजास्त करतां येतो. ह्या योजनेनें शिकविलेला घोडा बहुशः गाडी ओढतांना हिसके मारीत नाहीं.

हा फळा ओढावयास घोडा शिकला आणि पाहिजे तसा वळूं लागला ह्मणजे तो ब्रेकला किंवा डागकार्टला जोडून हांकण्याच्या लायकीचा झाला असें समजावें.

चालू घोड्याच्या जोडीला नवा घोडा चालविणें.

सवड असल्यास दुहेरी ब्रेकला एका बाजूला नवा घोडा जोडावा आणि शिकलेला घोडा त्याच्या जोडीला जोडावा ह्मणजे तोच शांतपणानें ब्रेक ओढण्याचें सर्व काम उड्या वगैरे मारल्याशिवाय करतो, आणि नव्या घोड्याला चालण्याची व गाडी ओढण्याची सहज संवय होते. पुष्कळ ब्रेकचे जुने घोडे नव्या घोड्याची चाल लक्षपूर्वक अवलोकन करण्यांत अगदीं दक्ष असतात, व त्या मानानें ब्रेक ओढण्यास सुरवात करतात.

गुडघ्या व कायजा.

नव्या घोड्याला जोडतांना कायजा व गुडघ्या (नी-कॅप्स) घालण्याचें कधींही विसरूं नये.

नवीन घोडा एकेरी ब्रेकला किंवा गाडीला जोडण्याच्या योग्य होईपर्यंत त्याला जोडीच्या ब्रेकला पोलाच्या उजव्या किंवा डाव्या बाजूला पाहिजे तिकडे जुंपून चालण्याची संवय करावी. जोडींत घोडा दोन्ही बाजूंला जोडावा.

नवीन घोडा गाडीला जोडून हांकतांना कांहीं दिवसपर्यंत त्याच्या लगामीला नेहमीं काढणी ठेवावी. जर तो फारच तुफानी असून एकटाच जोडलेला असला तर दोन काढण्या दोहों बाजूंला ठेवाव्या आणि चालतांना प्रत्येक बाजूची काढणी धरून चालण्यासाठीं एक एक माणूस ठेवावा.

बिनरहदारीच्या किंवा अगदीं मोकळ्या रस्त्यावरून गाडीच्या नव्या घोड्याला चालविण्यापेक्षां जेथें बरीच रहदारी असेल अशा रस्त्यानें चालविणें फार चांगलें; तेणेंकरून घोड्याचें लक्ष निरनिराळ्या वस्तूंकडे लागून तो कमी मस्ती करतो; शिवाय रहदारींतून चालण्याची त्याला संवय होते. नव्या घोड्याला रहदारीच्या रस्त्यांत चालवावा.

वर सांगितल्यापैकीं कोणत्याही प्रकारें जोडण्यापूर्वीं घोड्याला नुसती काढणी लावून दौडवणें चांगलें.

दुहेरी ब्रेक मिळण्यासारखा नसेल तर त्याच्या ऐवजीं हलकी मजबूत दुचाकी गाडी घेऊन तिलाच

कमानीच्या गाडीचा उपयोग. घोडा जोडावा. जड गाडी असून तिला कमानी नसल्या तर वाईट कारण असल्या गाडीचा खडखडाट फार होतो, आणि त्यापासून शिकणारा घोडा घाबरतो. शिवाय गाडीच्या वजनामुळें ती ओढतांना घोडा हिसके मारण्यास शिकण्याचा संभव असतो.

लाथपट्टा. नवीन घोड्याला चांगला मजबूत लाथपट्टा घालावा परंतु तो फार घट्ट ठेवूं नये. हा पट्टा घट्ट असून एखाद्यावेळीं घोडा चौक चालीनें चालूं लागला ह्मणजे तो त्याच्या कुशींला घांसल्यानें घोडा लाथा मारूं लागतो आणि त्यापासून त्याला लाथा झाडण्याची खोड लागते.

कायजा. कायजा सैल असावा पण घोड्याला आपलें डोकें खालीं घालून अगदीं छातीजवळ आणतां येणार नाहीं इतका तो घट्ट असला पाहिजे.

जेरबंद. जर घोड्याला डोकें वर ठेवण्याची लकब असली तर सैल जेरबंद लाविला असतां चांगलें; मात्र तो नासपट्ट्यांला बांधावा.

गाडीला नवीन घोडा जोडणें. गाडीला नवा घोडा जोडतांना त्याला धरून ठेवण्यासाठीं दोन माणसें जवळ ठेवावीं; आणि गाडीचे

पोल त्याच्या अंगाला कोठेंही लागूं न देतां त्याला गाडीला जोडावें. पोल उंच धरून ठेवावे; त्यांच्या खालीं जितका घोड्याला आणवेल तितका आणावा व गाडीपुढें नीट समूर उभा करावा, आणि मग पोल हळूच खालीं करून त्यांचीं टोकें छुग्यांत घालून गाडी पुढें लोटावी. नंतर होईल तितक्या त्वरेने जोतपट्टे हुकामध्यें घालावे व लाथपट्टा अडकवावा. एका मनुष्यानें घोड्याचा नासबंद किंवा लगाम धरून गाडी जोडीपर्यंत त्याच्या पुढच्या आंगास उभें रहावें. हांकणाराची सर्व प्रकारें निघण्याची तयारी होईपर्यंत घोड्याला धरून असलेल्या मनुष्यानें तेथून हालूं नये. हांकणारानें आपल्या हातांत रासपट्ट्या धरून गाडीच्या उजव्या बाजूला चालावें आणि घोड्याला काढणी लावून दोन माणसानीं त्याच्या दोन्ही बाजूंस चालावें. प्रारंभीं अशा प्रकारें चालविणें चांगलें; ह्यापासून नवीन घोड्याला निघतांना जें वजन ओढावयाचें असतें तें बरेंच कमी होतें. घोडा चालविणें.

जर घोडा नीटपणीं चालला तर थोडावेळ त्याच्याबरोबर एक मनुष्य धांवण्यासाठीं ठेवून हांकणारानें गाडी चालू झाल्यानंतर चढून बसावें व हांकूं लागावें. अशा

प्रकारें गाडी चालत असतांना चढून बसण्यांत फार सावध-
गिरी ठेविली पाहिजे. सवड असेल तर गाडीच्या मागून
चढावें हें चांगलें. हांकणारा गाडींत केव्हां चढला हें
घोड्याला न कळेल अशा सफाईनें व हळू चढावें.
गाडींत बसल्यावर जर घोडा एक चालीनें चांगला चालत
असला तर बरोबर धांवत असलेल्या मनुष्यानें हळूहळू
मागें राहून गाडीच्यामागें चढून बसण्यास हरकत
नाहीं. जर घोडा हिसके मारूं लागला तर फिरून त्या-
ला धरून चालवावें, पण त्याला अगदीं मारूं नये.

जोडलेला घोडा वळविणें.

ह्याप्रमाणें घोडा बराच दूरपर्यंत समूर नीटपणीं
चालला ह्मणजे मग त्याला वळण्यास शिकवावें. बनेल
तोंपर्यंत प्रथमतः त्याला फार मोठ्या घेरावर हळूहळू
वळवावें. असें करतांना मोतद्दारानें घोड्याला वळण्यांत
मदत करावी. ज्या बाजूला घोडा वळविण्याचा असेल
त्याच्या उलट बाजूचा पोल ढकलावा.

अडणाऱ्या घोड्याला उपाय.

जो घोडा केवळ कुचरपणानेंच अडून उभा राह-
तो त्याची एक तंगडी पट्ट्यानें उचलून बांधावी व तो
अगदीं थकून जाईपर्यंत त्याला तसाच उभा ठेवावा
ह्मणजे तो अडण्याची खोड टाकतो आणि त्याची तं-

गडी सोडतांच तो अगदीं मुकाट्यानें चालूं लागतो. अडणाऱ्या घोड्याला दोरीची दुमची करून वापरली असतांही उपयोग होतो. ही तयार करण्यास एक इंची सुताची दोरी अजमासें सोळा फूट लांब घेऊन ती दुहेरी करावी; ज्याठिकाणीं दुमडलेली असते तेथून सुमारें दोन फुटांवर गांठ देऊन त्यांत घोड्याची शेंपूट दुमचीसारखी घालावी आणि दोरीचीं दोन्ही टोंकें धरून दोन माणसांनीं ओढावीं; असें केल्यानें अडणारा घोडा बहुत करून चालूं लागतो. आयर्लंडांत घोडेवाले मूठभर रेंव घेऊन अडणाऱ्या घोड्याच्या तोंडांत घांसतात, त्यापासूनही कधीं कधीं उपयोग होतो.

गाडींत लाथा मारणाऱ्या घोड्याला उपाय.

घोडा प्रथमतः गाडीला जोडला ह्मणजे कधीं कधीं लाथा झाडूं लागतो तेव्हां अडणाऱ्या घोड्याप्रमाणें त्याची लगाम धरून मान वर करून ठेवल्यानें अथवा एक तंगडी बांधून ठेवल्यानें त्याला लाथा मारतां येत नाहींत; ह्या योजनेनें घोड्याची लाथा मारण्याची खोड समूळ नाहींशी करतां येते असें नाहीं पण निदान तेवढ्या वेळेपुरती तरी अटकवितां येते.

जर घोडा मूजोर असला तर त्याच्या तोंडांत लिव्हर्पूल बिट घालून तिला दुहेरी रासपट्ट्या लावाव्या, पैकीं एक गालाजवळच्या कडीला व दुसरी दांड्याला लावावी.

घोड्याला दररोज खंड न पडूं देतां एक सारखें सकाळ संध्याकाळ कांहीं दिवसपावेतों थोडें थोडें शिक्षण देत असावें. एकदम फार फिरवूं नये; फिरविण्याचें प्रमाण दररोज थोडें थोडें वाढवीत जावें.

फिरवून आणल्यावर घोडा सोडणें.

घोड्याला गाडींत फिरवून आणल्यानंतर त्याला गाडींतून सोडावा आणि तबेल्यांत नेतांना रासपट्ट्या जमिनीवर पडूं नयेत ह्मणून त्या हांसोळीच्या उजव्या कडींत अडकवाव्या. नाहींतर गाडी मागें घेतांना जर कदाचित् प्रसंगानुसार पुढच्या आंगास घोड्यानें उडी मारली तर त्या रासपट्ट्या गाडीच्या पोलाला कोठेंतरी अडकून घोड्याच्या तोंडाला जोराचा हिसका बसतो आणि त्यापासून तो फार घाबरतो.

जे घोडे अशा कांहीं कारणानें एकदां घाबरलेले असतात ते तें कारण बहुधा विसरत नाहींत आणि जेव्हां जेव्हां गाडी सोडावी तेव्हां तेव्हां ते एकदम पुढें उधळ-

तात आणि त्यापासून पुष्कळ अपघात होतात. जोतपट्टे सोडण्यापूर्वी नेहमीं लाथपट्टा काढला पाहिजे. ज्या घोड्याला पुढें उधळण्याची खोड असते त्याला सुधारण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे त्याला एखाद्या भिंतीसमोर अथवा जेथें त्याला पुढें उधळून जातां यावयाचें नाहीं अशा एखाद्या कोंपऱ्यांत हांकून न्यावा आणि नंतर पट्टे सोडून गाडी मागें सरकवावी.

गाडी सोडतांना उधळणाऱ्या घोड्याला उपाय.

ज्या घोड्याला चौकडींत पुढें जोडावयाचा असेल त्याला जोतपट्टे लावण्याच्या दांडक्याची संवय करावी. तो तबेल्यांत असतानां त्याच्या मांड्याच्या मागल्या भागाला लागेल असें एक दांडकें लोंबत ठेविल्यानें त्याला ही संवय होते.

नवीन घोडा गाडीला चालू करण्याच्या बाबतींत माझी शेवटची महत्वाची सुचना अशी आहे कीं घोडा गाडीला चालू करतांना प्रथमपासून त्याला साजाच्या कोणत्याही भागाची भीति बसेल असें होऊं देऊं नये किंवा कोणत्याही भागापासून त्याला यत्किंचित् दुखापत न होऊं देण्याची फार खबरदारी ठेवावी; कारण नवीन घोडा एकदां दुखावला किंवा बुजावला ह्मणजे त्याची भीति घालविणें

महत्वाची सुचना.

फारच कठीण होतें. शिकविण्यांत थोड्याशा निष्काळजी पणानें किंवा मोतद्दाराच्या अडाणीपणामुळें पुष्कळ उमदे घोडे गाडीच्या कामाला कितीएकवेळां अगदीं निरुपयोगी होतात.

वर सांगितलेल्या सूचनांचा घोड्याला शिकविण्यांत विचारपूर्वक उपयोग केला असतां तो गाडीला लौकर आणि चांगल्या रीतीनें चालूं लागेल.

प्रकरण १३.

एक घोड्याची गाडी जोडून चालविणें.

साज ठेवण्यांत एकच पद्धत असावी.

घोडा नवीन शिकणाऊ असला ह्मणजे त्याला गाडींत जोडण्यासंबंधीं मोतद्दाराची बरीच दक्षता आणि सावधपणा असतो, पण तो चांगला चालूं लागला ह्मणजे त्याच्यावर साज ठेवण्यांत आणि त्याला गाडीला जोडण्याच्या कामांत फार निष्काळजीपणा नजरेस येतो, हें प्रशंसनीय नव्हे. ह्यापासून केव्हां कोणत्या प्रकारचें नुकसान होईल याचा नेम नाहीं; शिवाय अशा निष्काळजीपणा पासून घोड्याला कोणती वाईट खोड लागेल हेंही सांगतां येत नाहीं; यास्तव घोडा नवीन असो किंवा कितीही जुना असो त्याच्यावर साज ठेवण्यांत आणि त्याला गाडीला जोडण्यांत योग्य दक्षता व एकच पद्धत राखणें सर्व तऱ्हेनें इष्ट होय.

रासपट्ट्यांशिवाय बाकीचा सर्व साज घोडा त·

बेल्यांत असतांनाच त्याच्यावर घालावा. साज घालण्याचा अनुक्रम खालीं लिहिल्याप्रमाणें ठेवावा.

हांसोळी घालणें.

घोड्याला ठाणमोरडा असला तर तो काढून प्रथम हांसोळी घालावी. हांसोळीची खालची बाजू रुंद असते ह्मणून गळ्यांत घालतेवेळीं ती वर करावी ह्मणजे घोड्याच्या डोळ्यांला इजा होत नाहीं. हांसोळी नवी असली तर ती घोड्याच्या जबड्यावर लवकर चढत नाहीं; अशावेळीं ती जबरदस्तीनें घालण्याचा प्रयत्न करून घोड्याला त्रास देण्यापेक्षां ह्मांसोळीचे हल्के सोडून ती ढोंपराच्या नेटानें रुंद करून चढवावी आणि नंतर वर हल्के बांधावे. पुष्कळ मोतद्दार घोड्यावर साज घालण्यासाठीं घोड्याचा गळखोड काढून टाकून अग्राडी मुळींच सोडून टाकतात पण हें चांगलें नव्हे. हांसोळी कानाच्या पलीकडे गेली ह्मणजे गळखोड सोडून ती मानेवरून खांद्यापर्यंत सरकवावी आणि गळखोड फिरून अडकवावा.

छातीपट्टा घालणें.

छातीपट्टा चढविण्यांत अशा प्रकारची भानगड नाहीं; गळखोड न सोडतां तो घालणें असेल तर छातीप-

ह्याच्या मानेवरच्या वादीचें एका बाजूचें टोंक बकसु-
ऱ्यांतून काढून तो चढवावा ह्मणजे झालें.

हांसोळी घातल्यानंतर कठडी पाठीवर ठेवून प्रथम दुमची शेंपटीवरून घालावी आणि जागच्याजागीं बसती करून नंतर कठडीचा तंग आंवळावा. शेंपटीचे सर्व केंस दुमचींतून बाहेर काढण्याची खबरदारी ठेवावी. दुमची घालणें.

कठडी घातल्यावर अंधारी चढवावी. पुष्कळ मोतद्दार आळसानें किंवा निष्काळजीनें अंधारी चढवितांना गलतनी व जेरकडी एका बाजूनें सोडीत नाहींत, ह्यापासून घोड्याला त्रास होतो; आणि मग अंधारी पुढें केल्याबरोबर घोड्याला मागें हटण्याची किंवा चमकण्याची संवय लागते. मोतद्दाराच्या मूर्खपणामुळें आपणावर येणारें संकट टाळण्याचा बिचारा घोडा यत्न करतो यांत नवल नाहीं पण त्यामुळें मोतद्दाराचा मिजाज गरम होऊन घोड्याच्या बरगड्यांवर ठोंसे बसतात!! तर असें न होऊं देण्याविषयीं मालकाची देखरेख असली पाहिजे. अंधारी चढविणें.

जर हांसोळीच्या बकसुऱ्यांतच जोतपट्टे अडकविलेले असले तर ते दोन्ही घोड्याच्या पाठीवर टाकावे.

रासपट्ट्या लावणें.

घोडा तबेल्यांत असतांनाच त्याच्या लगामीला रासपट्ट्या लावणें असल्या तर प्रथम त्यांत पीळ वगैरे पडलेला असेल तो काढावा, आणि दोन्ही टोंकें मिळवून घेऊन एक एक टोंक कठडीच्या कड्यांतून व हांसोळीच्या कड्यांतून काढून लगामीला लावावें, आणि रासपट्ट्यांचा मोकळा असलेला भाग कठडीच्या डाव्या कडींत घालून कायज्याच्या खिळ्यांत अडकवून ठेवावा. नंतर घोड्याची पिछाडी सोडावी. शेवटीं आघाडी सोडून घोड्याला नासबंदानें धरून बाहेर आणावा.

घोडा तबेल्यांतून बाहेर आणणें.

बिटचा दांडा किंवा रासपट्टी धरून कधींही घोड्याला चालवूं नये; अशानें मोतद्दाराच्या मनांत नसतांही घोड्याच्या तोंडाला पुष्कळवेळां हिसका बसून इजा होते. रासपट्टी अगर बिट धरलेली असून हिसका बसला तर फिरून तरी तोंडाला इजा होऊं नये ह्मणून घोडा मागें सरूं लागतो; अशा प्रसंगीं आडाणी मोतद्दार जोरानें बिट धरून पुढें ओढण्याचा प्रयत्न करतो आणि त्या झटापटींत बिचारा घोडा कधींकधीं उताणा पडतो; ह्मणून तबेल्यांतून घोडे बाहेर आणतांना मोठी सावधगिरी ठेविली पाहिजे. पुष्कळवेळां असें घडतें कीं घोडा तबेल्यांतून बा-

हेर आणतेवेळीं तो वांकडातिकडा फिरला किंवा मोतद्दाराच्या आडाणीपणामुळें मागें सरला तर तबेल्याच्या भिंतीला किंवा दरवाज्याला त्याचें ढुंगण घांसून त्याला इजा होते; शिवाय त्याच्या मनांत भीति बसून त्याला तबेल्याच्या दरवाज्यांतून सपाट्यानें बाहेर निसटून येण्याची अत्यंत वाईट संवय लागते.

गाडीला घोडा जोडणें.

घोडा बाहेर आणल्यावर त्याला गाडीच्या पोलांपासून दोनतीन फूट पुढें उभा करावा आणि एका माणसानें त्याच्यापुढें उभें रहावें; दुसऱ्यानें त्याच्या पाठीला न लागतील इतक्या बेतानें पोल उंच उचलून गाडी पुढें घ्यावी आणि पोलांचीं टोंकें छुग्यांत घालावीं. दोन्ही पोल उचलण्यास दोन माणसें असलीं तर चांगलेंच. घोडा चांगला वहिवटला ह्मणजे त्याला पुढें धरून ठेवावा लागत नाहीं. नवीन घोड्याला गाडीजवळ नेऊन दोन्ही पोलांमध्यें आणण्यासाठीं मागें हटवूं नये. छुग्यांत पोल बरोबर बसवून जोतपट्टे गंडेरीच्या हुकांत अडकवावे, लाथपट्टा जेथच्यातेथें अडकवावा आणि मग बेलीतंग आंवळावा.

बेलीतंग कसा लावावा.

बेलीतंगाचा पोलाला एक एक वळसा घालण्याची कित्येकांची चाल आहे पण ती चांगली असें

ह्मणतां येत नाहीं. गाडीचा तोल नीट लक्षांत न आणून गाडी बनविलेली असली ह्मणजे असा वळसा घालण्याची जरूर पडते. बेलीतंग आंवळल्यावर रासपट्ट्या गाडीच्या सुपडीवरील चापांत अडकवाव्या; त्या ओढून अडकवूं नये. गाडी हांकणारा रासपट्ट्या हातांत घेऊन बैठकीवर बसेपर्यंत कायजा चढवूं नये, तसाच घोड्याच्या मानेवर मोकळा राहूं द्यावा.

कायजा केव्हां चढवावा.

गाडीबरोबर असतांना मोतद्दाराचें कर्तव्य.

गाडी हांकणारा गाडी चालू करीपर्यंत मोतद्दारानें घोड्याच्या तोंडाजवळ उभें रहावें आणि रुमाल किंवा चवरी घेऊन त्याला माशा त्रास देत असल्यास उडवाव्या. हांकणारानें रासपट्ट्या हातांत घेऊन घोड्याला इशारा करून घोडा चालू झाला ह्मणजे मोतद्दारानें कायजा खिळ्यांत अडकवावा आणि आपल्या बैठकीवर जाऊन बसावें.

मोतद्दारानें सदोदित फार सावध असलें पाहिजे. यजमान गाडी हांकीत असतां रस्त्यांत गर्दी असली किंवा कोठें रासपट्टी अडकली तर हुकूम होण्याची वाट न पाहतां ताबडतोब खालीं उतरून अडचण दूर

करावी. जोडीच्या, चौकडीच्या व टान्डेम गाडींत तर याबद्दल मोतद्दाराची फारच सावधगिरी पाहिजे.

गाडी हांकणारा गाडीवर नसेल अशावेळीं मोतद्दारानें गाडी सोडून अगदीं हालूं नये; अशापासून अनेक अपघात झाल्याचीं उदाहरणें आहेत. विशेषतः दहापांच स्नेहांच्या गाड्या जमल्या ह्मणजे मोतद्दार आपआपली गाडी सोडून एकेठिकाणीं जमतात हें फार भयंकर होय.

गाडीचे घोडे हांकतां येणें ही एक विशेष महत्वाची कला आहे व ती उत्तम प्रकारें संपादन करण्यासाठीं चांगली मेहनत केली पाहिजे. नुसत्या रासपट्ट्या धरून झपाट्यानें घोडे हांकतां आले ह्मणजे ही कला साध्य झाली असें समजणें चुकीचें आहे. गाडी हांकण्यांत बैठकीवर बसावें कसें, रासपट्ट्या धराव्या कशा, चाबूक धरावा कसा, घोडे चालू कसे करावे, ते वळणावर फिरवावे कसे इत्यादि बाबती पद्धतशीर आल्या पाहिजेत. हांकणाराच्या संपूर्ण हुकमांत घोडे असून ते शिस्तवार चालत असलेले पाहण्यापासून जितका

गाडी हांकणें.

आनंद होतो तितकाच धाडसीपणानें वेड्यावांकड्या तऱ्हेनें हांकलेले घोडे पाहून तिरस्कार उत्पन्न होतो. घोडे बेफाम हांकणें ह्मणजे चांगलें हाकणें नव्हे. साधारण चांगल्या रस्त्यावर तासाला सात पासून दहा मैलांच्या वेगानें घोडे चालले ह्मणजे ती वाजवी गति झाली.

हांकताना हात कसे ठेवावे.

घोडे हांकण्यांत मुख्य गोष्ट ह्मणजे हांकणारानें आपले हात कसे ठेवावे ही होय. वर सांगितलेल्या गतीनें घोडे चालत असले ह्मणजे हांकणाराच्या हातांचीं कोंपरें त्याच्या कुशींजवळ असावीं.

गाडींत बसण्यापूर्वी साज तपासावा.


गाडींत बसून हांकण्यापूर्वी नेहमीं साजावर चोंहीकडे नीट नजर टाकून सर्व साज जेथच्यातेथें नीटनेटका आहे किंवा नाहीं हें पहावें; नंतर घोड्याच्या उजव्या बाजूला जाऊन रासपट्ट्या उजव्या हातांत घ्याव्या. डावी रास तर्जनीखालीं व उजवी तिसऱ्या बोटाखालीं ह्याप्रमाणें धराव्या.

गाडीवर बसल्यानंतर रासपट्ट्या कशा धराव्या.

गाडीवर चढल्याबरोबर बैठकीवर बसावें आणि उजव्या हातांतील रासपट्ट्या डाव्या हातांत घ्याव्या; त्यांत डावी रासपट्टी तर्जनीवर, व उजवी मध्यमांगुलीच्या खालीं

धरावी. अशानें हांकणाराचीं दोन बोटें रासपट्टयांच्यामध्यें येतात. असें करण्याचें कारण इतकेंच कीं रासपट्टयांच्यामध्यें एकच बोट असल्यानें घोड्याच्या तोंडावर मनगटाच्या चलनवलनाचा परिणाम घडण्यास जितकी सवड सांपडते तिच्यापेक्षां ह्या रीतीनें जास्त जोर सांपडून घोडा चांगला काबूंत रहातो. आंगठा थेट उजवीकडे वळलेला असावा, व तर्जनीचा झोंक अगदीं बाहेर उजव्या कुशीकडे असावा. येणेंकरून उजवी रासपट्टी बोटाच्या पेराजवळ रहाते (पहा आकृति ३१). व हाताची पाठ वर किंवा खालीं फिरविल्यानें रस्त्यांत घोड्याला अनुक्रमें उजवीकडे किंवा डावीकडे सहज फिरवितां येतें.

आकृति ३१.



गाडी हांकणारानें कसें बसावें.

गाडी हांकणारानें ताठ बसावें. पुढें ओणवून गाडी हांकणें अगदीं बेंगरूळ दिसतें. रासपट्ट्या डाव्या हातांत चांगल्या कबजांत घेतल्यानंतर चाबकाचा जेथें बरोबर समतोल होत असेल त्याठिकाणीं तो उजव्या हातानें धरावा, म्हणजे निघण्याची सर्व तयारी झाली. नंतर घोड्याच्या तोंडाला रासपट्ट्यांनीं हळूच इशारा करून त्याला चुचकारून निघण्याची खूण करावी. जर तो इतक्यानें निघाला नाहीं तर मग त्याला चाबूक लावून जागृत करावा व तो चालूं लागतांच लगाम धरलेला हात किंचित् खालीं करावा. ह्या बाबतीकडे दुर्लक्ष झाल्यानें घोडा अडावयास शिकतो.

मनगट कसें ठेवावें.

हाताचें मनगट बैठकीशीं सारखें समांतर असावें आणि हाताचीं बोटें शरीराच्या मध्यभागापासून चार इंचांच्या अंतरावर असावीं. तसेंच बोटांचीं पेरें पुढच्या आंगास असावीं. रासपट्ट्या धरण्यांत बोटें कशीं ठेवावीं, कोंपरें कशीं असावीं वगैरे स्थिति आकृति ३१ लक्षांत घेतल्यानें ध्यानांत येईल.

पहिल्या तीन बोटांनीं आकृति ३१ मध्यें दाखविल्याप्रमाणें रासपट्ट्या धरलेल्या असल्या म्हणजे त्या

सरकत नाहींत. तिन्ही बोटांपैकीं मध्यांगुली सदर आकृतींत दाखविल्याप्रमाणें धरावी.

रासपट्टीचा सुपडीजवळ सुटा असलेला भाग आपल्या उजव्या हातांत ठेवूं नये. उजवा हात होईल तितकें करून मोकळा ठेवावा ह्मणजे पाहिजे तेव्हां चाबकाचा उपयोग करण्यास अडचण पडत नाहीं. उजव्या हातांत रासपट्टी असेल तेव्हां घोड्याला कधींही मारूं नये हें उघड आहे; कारण कीं उजव्या हातांत उजवी रासपट्टी असतांना जर आपण घोड्याला चाबूक मारण्याचा प्रयत्न केला तर अर्थात् ती रासपट्टी ढिली पडते आणि घोडा लागलाच डाव्या बाजूला जाऊं लागतो.

उजवा हात मोकळा ठेवावा.

रस्त्यांत एखाद्या कोंपऱ्यावर डाव्या किंवा उजव्या आंगास वळावयाचें असेल तेव्हां मात्र त्या रासपट्टीवर आंगठ्याचा दाब द्यावा, किंवा जरूर पडल्यास दुसऱ्या हातानें ती रासपट्टी आंखूड करावी; परंतु नेहेमीं एकाच हातांत (डाव्या हातांत) रासपट्ट्या धरण्याचा प्रघात ठेवावा.

गाडी वळवितांना रासपट्ट्या कशा धराव्या.


गाडी वळविण्यासाठीं किंवा घोड्यानें चटकन एका बाजूला वळूं नये ह्मणून दुसऱ्या बाजूची रासपट्टी आंखूड करण्यासाठीं अथवा घोड्याला वाटोळा फिरविण्यासाठीं चाबकाचा उपयोग करण्याला उजवा हात मोकळा असल्यास फार उपयोगीं पडतो ह्मणून बनेल तितकें करून तो हात गुंतवूं नये.

डाव्या हातांतून उजवी रासपट्टी कधींही उजव्या हातांत घेऊं नये. घोडा इकडेतिकडे तोंड न फिरवितां सरळ उभा राहील इतक्या बेतानें प्रथमच डाव्या हातानें दोन्ही रासपट्ट्या धराव्या हा सारथ्यकलेंतील पहिला व अत्यंत महत्वाचा नियम आहे.

धरलेल्या रासपट्ट्यांच्या लांबींत फेरफार होऊं देऊं नये.

उजवा हात रासपट्टीवर असो वा नसो, हातामध्यें रासपट्ट्या धरल्यानंतर त्या हातांतून सरकून त्यांच्या लांबींत फेरफार होऊं न देण्याविषयीं चांगली खबरदारी ठेविली पाहिजे; हें नवीन शिकणारानें सदोदित लक्षांत ठेवावें.

आकृति ३२.



जो गाडी हांकणारा दोन्ही हातांत (आकृति ३२ मध्यें दाखविल्याप्रमाणें) रासपट्ट्या निरनिराळ्या धरून गाडी हांकतो त्याला त्याचें कर्तव्य माहीत आहे असें कधींही ह्मणतां येणार नाहीं; तथापि असा प्रकार पुष्कळ ठिकाणीं वारंवार दृष्टीस पडतो.

रासपट्ट्या दोन्ही हातांत धरून गाडी चालविणें गैरशिस्त.

विनाकारण चाबकाचा उपयोग करूं नये; तसेंच घोड्यानें कांहीं अन्याय केला असल्यास त्याला शिक्षा करण्याच्या वेळेखेरीज एऱ्हवीं त्याच्या तोंडाला कधीं-

घोड्याच्या तोंडाला लगामीचा हिसका मारूं नये.

ही लगामीचा हिसका देऊं नये. एखादा घोडा कान पाडून डोकें खालीं घालून लाथा झाडण्याची तयारी करूं लागला तर त्याला त्याच वेळीं लगामीचा झटका मारला तर त्यापासून फार उपयोग होतो. शिवाय त्याचवेळीं त्याच्या कानांच्यामध्यें चाबकानें फटका देखील मारावा.

बुजणाऱ्या किंवा भितऱ्या घोड्याशीं हांकणाराचें वर्तन.

बुजणाऱ्या किंवा भितऱ्या घोड्यावर चाबकाचा उपयोग कधींच करूं नये; त्यापासून तो दचकतो आणि तीं त्याची संवय मात्र दृढ होते. बुजणें हा घोड्याचा दुर्गुण ह्मणतां येत नाहीं, पण मज्जातंतुविकारापासून किंवा हांकणाराच्या मूर्खपणामुळें घोड्याला अशी संवय लागते. अशा घोड्याला मारण्यापेक्षां शब्दांनींच दिलासा देण्यानें फार फायदा होतो, कारण घोडा आपल्या हांकणाराचा आवाज जितका लवकर ओळखूं लागतो तितकें लवकर त्याला दुसरें कांहीं समजत नाहीं.

घोड्याला चालविण्यासाठीं किंवा त्यानें आपला वेग वाढवावा ह्मणून त्याच्या पाठीवर रासपट्ट्या कधींही आपटूं नये.

घोड्याला एकसारख्या गतीनें हांकावा.

घोड्याला एकसारख्या चालीनें चालण्यास शिकवावें. साधारण बहुतेक घोड्यांला दर तासाला आठपासून नऊ मैलांची चाल बेताची आहे. परंतु केव्हां अजमासें तासाला सहा आणि केव्हां दहा मैल अशा कमीजास्ती वेगानें घोडा चालवूं नये. चालीमध्यें घडोघडी फेरफार केल्यानें घोडा जसा थकून जातो तसा दुसऱ्या कशानेंही थकत नाहीं.

आपल्या घोड्याची चाल एकाएकीं एकदम वाढवूं नये किंवा कमी करूं नये. गाडींत बसणाराला त्यापासून फार त्रास होऊन शिवाय अशानें घोडा लवकर थकतो हें वर सांगितलेंच आहे.

जर आपल्याला लांबीच्या पल्ल्यावर जावयाचें असलें तर प्रथम कांहीं वेळपर्यंत थोडेंसें हळूहळू चालावें हें चांगलें.

घोडा एकदां नीट एका गतीनें चालूं लागला ह्मणजे हांकणारानें आपली नजर सारखी ठेवावी, व समोरून येणाऱ्या गाड्या कशाकाय येत आहेत तें लक्षपूर्वक

रस्त्यांत गाडी हांकणारानें कोणत्या बाबतीं-कडे लक्ष द्यावें.


नजरेंत घ्यावें, ह्मणजे आपणांस एकदम रासपट्ट्या ओढून मध्येंच उभें रहाण्याचा प्रसंग येणार नाहीं. आपणास दोन गाड्यांच्यामधून किंवा रस्त्याच्या बाजूनें निघून जातां येईल कीं नाहीं ह्याचें दुरूनच धोरण ठरवितां आलें पाहिजे, आणि जातां येणार नाहीं असें वाटल्यास ताबडतोब गति कमी करण्याला प्रारंभ करावा.

नवीन शिकणाराला गर्दीच्या जाग्यांतून गाडी घेऊन निघून जाण्याची जर खात्री वाटली नाहीं तर झपाट्यानें त्याजागीं जाण्याचा यत्न करण्यापेक्षां त्यानें आपल्या घोड्याची गति कमी करावी हें चांगलें; कारण गर्दीच्या ठिकाणीं झपाट्यानें जाऊन पुढें जातां आलें नाहीं तर मग तेथें एकदम घोड्याला आंवरण्याचा प्रसंग आल्यास फार पंचाईत पडून अपघात होण्याचा संभव जास्त असतो.

रासपट्ट्या आंखूड कशा कराव्या.

बहुशः जेव्हां घाईनें रासपट्ट्या ओढून घेण्याचा प्रसंग येतो तेव्हां हात एकदम वर उचलल्याशिवाय त्या आंखडतां येत नाहींत, पण हें कृत्य अगदीं आडाण्यासारखें होय. अशा प्रसंगीं योग्य उपाय ह्मटला ह्मणजे


रासपट्टया आकृति ३३ मध्यें दाखविल्याप्रमाणें उजव्या हाताच्या आंगठ्यानें व तर्जनीनें डाव्या हाताच्या मागें धराव्या, आणि त्यांतून जरूरीप्रमाणें पाहिजे ती कमी जास्ती करावी. अशा रीतीनें रासपट्टया पाहिजे तितक्या आंखूड करतां येतात.



आकृति ३३.

सदोदित रासपट्टया फार लांब असूं देण्यापेक्षां कांहींशा आंखूड ठेवून धरणें चांगलें. ज्यावेळीं रासपट्टया थोड्याच आंखडण्याची जरूर असेल त्यावेळीं त्यांवर डाव्याहातापुढें उजवा हात ठेवून आकृति ३४ मध्यें दाखविल्याप्रमाणें डाव्या हातानें त्यांस थोडासा कल द्यावा.

आकृति ३४.



मागील गाडी हांकणाराला सूचना.

शहरांतून गाडी हांकतांना आपण गाडी हळू चालविणार आहों किंवा कोंपऱ्यावर फिरविणार आहों असें आपल्या मागच्या गाड्या हांकणारांला सुचविण्याकरितां चाबकाचा दांडा मागील गाडीवाल्यांना दिसेल अशा बेतानें एकदोनदां हालविण्याचा लंडन शहरांत प्रघात आहे.

घसरड्या रस्त्यावर गाडी वळविणें.

शहरांतील रस्ते घसरडे असतात ह्मणून गाडी वळविण्याची जागा येण्यापूर्वींच कांहीं अंतरावर घोड्याची गति कमी करावी. अशा रस्त्यांतून बेसावधपणानें कोंपऱ्यावर गाड्या फिरविण्यापासून सदोदित

पुष्कळ अपघात घडतात. ही सूचना पुष्कळांला फाजील वाटेल परंतु गाडी हांकतांना त्यांच्या असें अनुभवास येईल कीं चांगल्या शिकलेल्या घोड्यांला देखील शहरांत अडचणीच्या वांकणांजवळून नेतांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे.

शेंपटीखालीं सांपडलेली रासपट्टी काढणें.

गाडीचा घोडा चालत असतां एखादेवेळीं रासपट्टी त्याच्या शेंपटीखालीं अडकते तेव्हां ती ओढून काढण्याचा प्रयत्न न करतां शेंपटी उचलून हळूच काढून घ्यावी. पुष्कळ मोतद्दार रासपट्टी ओढूं लागतात तेणेंकरून घोड्याला त्रास होऊन तो सहजच लाथा मारूं लागतो.

गाडी हांकतांना हातमोजे वापरणें.

गाडी हांकतांना हातमोजे घालण्याचा हिंदुस्थानांत प्रघात नाहीं पण ते वापरणें असतील तर चामड्याचे, नवेपणीं बोटांपेक्षां निदान एक इंच लांब व बरेच सैल असे घ्यावे. हातांच्या तळव्यांपाशीं व मनगटाजवळही ते पुष्कळ ढिले असावे कारण त्यांला एक दोनदां हातांची सर्दी लागली ह्मणजे ते आटून बेताचे होतात.

हातमोजे चढविलेले असले ह्मणजे हातांना वारा लागण्यासाठीं हातमोजांच्या पाठीला थोडीं बारीक भोंकें पाडावीं. हातमोजांचें कातडें चिवट व कठीण असावें, पण तें फार जाड असूं नये; त्यांला आंतून वाद्या असल्या तर त्यांपासून विशेषतः चौकडीच्या रासपट्ट्या धरून ती हांकतांना फार अडचण होते.

गाडी हांकणारानें लोंकरीचे मोजेही आपल्या बरोबर ठेवावे; पावसाळ्यांत ते अतिशय हितकारक असून त्यांवरून रासपट्ट्या सरकत नाहीं.

गाडी हांकण्यांत मलवस्त्र वापरणें.

गाडी हांकणारानें एकादें एप्रन (मलवस्त्र) किंवा रग सदोदित पायांवर घेण्याचा प्रघात ठेवावा. हें एप्रन उन्हाळ्यासाठीं मळकट रंगाचें पातळ लोंकरीच्या कापडाचें किंवा सुताचें असावें आणि पावसाळा व हिंवाळा या दोन्ही ऋतूंसाठीं आंतून गरम अस्तर लावलेलें जाडी बनातीचें असावें.

प्रकरण १४.

जोडी जोडणें आणि हांकणें.

जोडी चांगल्या रीतीनें हांकणें ह्मणजे कोणतेही पाहिजे ते दोन घोडे गाडीला जोडून चालविणें. हें काम नवीन शिकणाराला सकृत्‌दर्शनीं जितकें सोपें आहे असें वाटतें तितकें वास्तविक तें सोपें नाहीं. चांगल्या चालीचे, आपल्या कामांत पूर्णपणें वहिवटलेले घोडे आणि त्यांच्यावर बसता साज असें असून जोडी हांकणें ही अगदीं सोपी बाबत खरी आणि नवशिक्यानें असली जोडी हांकण्याचें पत्करलें तर तें त्याच्या हातून होणेंही शक्य आहे. परंतु जेव्हां दोन अगदीं निरनिराळे आणि गैरमाहिती घोडे हांकण्याचा प्रसंग येतो तेव्हां खऱ्या अडचणी लक्षांत येतात. जोडी हांकणें.

एक घोडा चांगल्या रीतीनें हांकतां येऊं लाग-

ला ह्मणजे मग जोडी हांकावयास शिकण्याची सुरवात करावी.

जोडी हांकण्यांत मुख्य कर्तबगारी.

जोडी हांकण्यांत मुख्य कर्तबगारी ह्मटली ह्मणजे दोन्ही घोड्यांला सारखीं पावलें टाकीत जोडीनें चालविणें आणि हांकणाराला विशेष मेहनत न पडतां दोन्ही घोड्यांकडून सारखें काम करून घेणें ही होय; हें साधण्यासाठीं घोड्यांवर बरोबर बसते साज घालून त्यांस नीट रीतीनें जोडणें, त्यांच्या रासपट्ट्या पाहिजे तितक्या लांब आंखूड ठेवणें, त्यांला त्रास न होईल अशा बेतानें पोलांशीं जुंपणें ह्या बाबती मुख्य होत.

ज्याप्रमाणें एकेरी साजाची जुळणी करतात त्याचप्रमाणें दुहेरी साजाचीही करितात; फरक मात्र एवढाच कीं जोडीच्या साजांतले बेलीतंग सैल असतात, ते इतके कीं ते व कठडीचे तंग ह्या दोहोंमध्यें दोनचार बोटांची जागा असते. जोडीच्या साजांतील बेलीतंगांचा उपयोग जोतपट्टे उचलून धरण्यापेक्षां जास्ती नसतो.

गाडीला जोडी ज़ोडणें.

जोडीच्या घोड्यांवर साज ठेवून त्यांला पृष्ट १६३ मध्यें सांगितल्याप्रमाणें तबेल्यांतून बाहेर काढून गाडी जवळ आणून उभे करावे. प्रत्येक घोडा पोलाला किंवा गंडेरीला लाथ मारणार नाहीं अशा तजविजीनें त्याला पो-

लाजवळ फार सावधगिरीनें उभा करावा; आणि एकदम हल्क्यांच्या खालच्या कडींत पोलपीस किंवा पोलसांखळी असली तर तिचा आंकडा अडकवावा. असें केल्यानें घोड्याला मागें गंडेरीकडे हटतां येणार नाहीं. नंतर गंडेरीच्या (रोलरबोल्ट) खुंट्यांपैकीं बाहेरच्या खुंट्यांला प्रत्येक घोड्याचा बाहेरचा जोतपट्टा अडकवावा; आणि मग आंतला (ह्मणजे पोलाजवळचा) पट्टा आंतल्या खुंट्याला अडकवावा. कधींही आंतला जोतपट्टा अगोदर अडकऊं नये. ज्या घोड्यांबद्दल खात्री नाहीं किंवा जे लाथा झाडणारे असतात ते गाडीला जोडतांना आंतील जोतपट्टे जितक्या त्वरेनें अडकवितां येतील तितक्या त्वरेनें अडकवावे, कारण हें काम करण्यासाठीं त्यांच्या पुठ्ठ्याच्या अगदीं मागें पायांजवळ जावें लागतें. जर दोहोंपैकीं एक घोडा लाथा झाडणारा असला तर त्यालाच पहिल्यानें जोडावा. नेहमीं गाडीचे घोडे सोडतांना वर सांगितलेल्या क्रमापेक्षां अगदीं उलट क्रमानें पट्टे काढावे—ह्मणजे (रोलरबोल्ट) खुंट्यांतून आंतले पट्टे अगोदर काढावे नंतर बाहेरचे पट्टे काढावे.

पोलाशीं घोडे अडकविणें.

घोडे पोलाला कधींही फार ताणून जोडूं नये, त्यापासून ते फारच अवघडतात. जोडीपेक्षां चौकडीमध्यें ही सावधगिरी जास्त ठेविली पाहिजे, कारण

चौकडीचा पोल फार जड असतो आणि पोलपीस किंवा पोलसांखळ्या जर घट्ट ओढलेल्या असल्या तर पोलाचें सगळें वजन नेहमीं घोड्यांच्या मानेवर पडतें. पोलसांखळ्यांच्या आंकड्यांचीं टोंकें खालच्या बाजूला केलेलीं आहेत कीं नाहीं हें नेहेमीं पहावें, नाहीं तर एखाद्यावेळीं घोड्यानें तोंड खालीं केलें ह्मणजे त्याच्या बिटचा खालचा दांडा त्या आंकड्यांत अडकतो.

पोलपीस व पोल सांखळ्या.


साधारण जोडीच्या कामाला किंवा नवीन शिकणाऊ घोड्यांला जोडण्यासाठीं सांखळ्यांचे ऐवजीं चामड्याचे (पोल–पीस) पोलपट्टेच वापरतात. ते स्वच्छ करण्याची फारशी खटपट नसते. पोलपट्टे चांगल्या मजबूत चामड्याचे केलेले असावे. चरबी किंवा सालीड तेल लावून ते नरम ठेवले पाहिजेत नाहींतर ते कडक होऊन लौकर तुटतात. पोलसांखळ्या घांसून स्वच्छ ठेवल्या तर फार झोंकदार दिसतात आणि घोडे चालतांना त्यांचा जो आवाज होतो तोही फार समाधानकारक असतो.

"कप्लिंगरेन्स"

आंखूड रासपट्टया (१; २ आ. ३९) ज्यांला "कप्लिंगरेन्स" ह्मणतात त्यांची योग्य जुळणी करतांना मोठी दक्षता ठेवावी लागते. घोड्यांच्या तोंडाच्या दोन्ही बाजूंवर सारखा भार पडून ते नीट सरळ चालतील व

त्यांची ओढ जोतपट्ट्यांवर सारखी पडेल अशा प्रकारें "कप्लिंगरेन्स" ची जुळणी केली पाहिजे.

अशा प्रकारें जुळणी करतां यावी ह्मणून बाहेरच्या रेनीला आकृति ३९ मध्यें दाखविल्याप्रमाणें आठ



आकृति ३५—सारख्या लांबीच्या "कप्लिंगरेन्स".

दहा भोकें ठेवावीं ह्मणजे त्यांत कप्लिंगरेनींचे बकसुवें मागें पुढें करतां येतात. अशी सोय केलेली असलीं ह्मणजे घोड्याच्या तोंडाला माफक येईल अशा रीतीनें पाहिजे ती कप्लिंगरेन लांब किंवा आंखूड करतां येते. कप्लिंगरेन्स कमजास्ती करण्याचें उदाहरणः—डावा घोडा आपले तोंड बाहेर ठेवून चालत असला तर उजव्या बाजूची कप्लिंगरेन वर चढवावी ह्मणजे त्याचें डोकें पोलाशीं समांतर होतें. ज्या बाजूची कप्लिंगरेन सैल करावी त्याच बाजूची बाहेरची रासपट्टी आपोआप आंखूड होते व तेणेंकरून त्या बाजूचा घोडा दुसऱ्यापेक्षां ज्यास्त मागें होतो.

दोन घोडे दिसण्यांत अगदीं सारखे असून डावा घोडा आपलें डोकें थोडेंसें बाहेर नेणारा—ह्मणजे अर्थात् पुढें उभा राहणारा—आणि त्याचें तोंड हलकें असलें आणि उजव्या घोड्याचें तोंड मागें असून तो आपलें डोकें अगदीं छातीजवळ ठेवणारा असला तर अशा जोडीची जोतपट्ट्यांवर सारखी ओढ पडण्यासाठीं डाव्या घोड्याच्या रेनी उजव्यापेक्षां बऱ्याच लांब ठे-

वल्या पाहिजेत हें उघड आहे. "कप्लिंगरेनी" सारख्या लांबीच्या ठेवून मधल्या भोंकांत अडकवून जर घोडे जोडले तर मग बकसुव्यांच्या दोन्हीं बाजूंला तीन चार भोंकें राहून रासपट्ट्या कमीजास्ती करण्यास जागा राहते. जो घोडा हलक्या तोंडाचा असेल त्याच्या लगामीच्या वरच्या किंवा गालाजवळच्या नाक्यांत रासपट्टी अडकवावी आणि जो घोडा ओढणारा कठीण तोंडाचा असेल त्याची रासपट्टी अगदीं खालच्या नाक्यांत घालावी. ही जुळणी बहुधा घोड्याला माफक येऊन चारही जोतपट्ट्यांवर सारखी ओढ रहाते.

दोन्ही "कप्लिंगरेनी" अतिशय घट्ट जुळण्याची लोक नेहमीं चूक करतात. ह्या जुळणीनें घोडे नीट समोर न चालतां आपलीं डोकीं आंत पोलाकडे नेतात; अशी संवय त्यांला न लागावी ह्मणून नेहमीं पोलाच्या एकाच बाजूला एकच घोडा न जोडतां दोन्ही वरचेवर उलटून पालटून जोडावे. असें करण्याला बहुशः घोडेवाले धजत नाहींत; ही चूक होय.

जोडीचे घोडे उलट सुलट जोडावे.

"कप्लिंगरेनी" घट्ट ठेवण्याची चूक चौकडीच्या पुढल्या घोड्यांसंबंधानें वारंवार दृष्टीस पडते; आणि त्याचें

कारण इतकेंच कीं पुढले घोडे पुष्कळ अंशीं मोकळे असल्यानें आटोक्याच्या बाहेर जातील ह्या धास्तीनें हांकणारे ही चूक करतात, पण त्यापासून घोड्याच्या आंतल्या बाजू एकमेकांवर घांसून घोडे चिडून अनेकवेळां तुफान करतात.

"बिलेट" चा उपयोग.

मुख्यत्वेंकरून जोडीचे नवीन घोडे शिकवितांना बिटला रासपट्ट्या अडकविण्यासाठीं "बिलेट" (रासपट्टीचा शेवटचा भाग) मध्यें एकाहून जास्त भोंकें ठेवावीं; त्यांच्या योगानें "कप्लिंगरेनींत" फेरबदल केल्याशिवाय बिलेटचें एक भोंक मागें किंवा पुढें सरकवून ताबडतोब कोणत्याही बाजूच्या घोड्याला मागें पुढें करतां येतें.

पोलावर आंग टाकण्याची घोड्याची खोड आणि उपाय.

जोडीच्या घोड्यांला कधीं कधीं पोलावर आंग टाकण्याची खोड लागते. मुख्यत्वेंकरून उतरणीवरून वारंवार उतरण्याचा प्रसंग असल्यास ही खोड लागते. ही त्यांची खोड घालविणें फार कठीण पडतें. जेव्हां घोडे प्रथम असें करूं लागतात तेव्हांच लक्ष ठेऊन चाबकाचा एक चांगला फटका मारला असतां ही त्यांची खोड सुटण्याचा संभव असतो.

एका चामड्याच्या तुकड्याला बारीक चुका मारून तो पोलावर ज्या बाजूचा घोडा पडत असेल तिकडे वाद्यांनीं बांधावा, ह्मणजे चुका टोंचल्यानें घोडा पोलावर येत नाहीं. चुका फार तीक्ष्ण नसाव्या.

जोडीच्या रासपट्ट्या एक घोड्याच्या रासपट्ट्यां प्रमाणेंच धराव्या. त्या डाव्या हाताच्या बोटांतून कधींही सरूं देऊं नये अथवा उजव्या घोड्याला उजवीकडे वळविण्याच्या अथवा गाडी रस्त्याच्या मधोमध नेण्याच्या उद्देशानें डाव्या हातांतून एक रासपट्टी काढून उजव्या हातांत घेऊं नये. जोडीच्या रासपट्ट्या कशा धराव्या.

आकृति ३४ मध्यें दाखविल्याप्रमाणें उजव्या हातानें रासपट्ट्या शरीराच्या मध्यभागाकडे कमज्यास्ती ओढाव्या पण हात लांब करून त्या एका बाजूकडे नेऊं नये.

गाडीचा घोडा सात आठ मैलांच्या गतीनें चालत असला ह्मणजे सरासरी पांच रत्तल ओझें उचलण्या इतका भार हांकणाराच्या हातावर पडतो. ह्यावरून जोडी, चौकडी वगैरे हांकण्यांत हातावर किती वजन रासपट्ट्या धरण्यांत हातावर ओझें.

पडतें याची सहज कल्पना होऊं शकते; परंतु गाडी हांकण्यांत हा भार एकसारखा उचलून धरावा लागत नाहीं; तो क्षणोक्षणीं कमी जास्ती होतो ह्मणून इतका जाणवत नाहीं.

घोड्याला हांसोळी लागण्याचें कारण.

जोडीच्या घोड्यांला सतत ओढून धरण्यापासून किंवा उतरणीवरून खालीं उतरतांना जोरानें मागें खेंचून धरण्यापासून हांसोळी घोड्याच्या खांद्यावर घांसते आणि तेथली कातडी घांसून जाते; अशा जखमेला तेल लावावें.

जोतपट्ट्यांची लांबी तपासणें.

जोतपट्टे नेहेमीं ताणून त्यांची लांबी कमी जास्ती होते ह्मणून महिन्या पंधरा दिवशीं ते चारही मिळवून पहावे. आंखूड पट्टा असेल तो आंतल्या बाजूला घालून त्याच्यावर खूण करावी, ह्मणजे चुकीनें तो बाहेरच्या बाजूला लावला जाणार नाहीं.

कधीं कधीं घोड्याच्या दोन्ही बाजूंवर सारखा दाब आणण्यासाठीं आंतला पट्टा बाहेरील पट्ट्यापेक्षां अर्धा इंच किंवा कधीं एक इंचही आंखूड ठेवावा लागतो.


बेअरिंग स्ट्रपचा उपयोग.

" बेअरिंगस्ट्रॅप्स " ची लांबी जोतपट्ट्यांचा झोल खालीं पडूं न देतां त्यांपासून ते समोर राहतील इतकीच

असावी; अधीक असली तर घोडा हांसोळीवर भार घालून गाडी ओढूं लागला ह्मणजे त्या एकदम वर उचलतात.

एकंदर साज दोन्ही घोड्यांवर योग्य रीतीनें घालून ते गाडींत चालत असले ह्मणजे खालच्या आकृतीप्रमाणें दिसतात.

आकृति ३६.



प्रकरण १५.

गाडीचे निरनिराळे भाग.

गाडी बाळगण्यासंबंधानें मुख्य तीन बाबतींचा विचार केला पाहिजे—(१) गाडी कोणत्या कामासाठीं ठेवावयाची (२) गाडी विकत घेण्यासाठीं किती रक्कम खर्च करावयाची आणि (३) ती संभाळावयाची कशी.

सांप्रत प्रचारांत असलेल्या गाड्यांचे मोठाले दोन वर्ग करतां येतात (१) दुचाकी (२) चारचाकी.

दुचाकी आणि चारचाकी गाड्या.

दुचाकी गाड्या चारचाकी गाड्यांपेक्षां किंमतीच्या मानानें जितक्या कमी त्याच बेतानें कमी सुखावह असतात. दुचाकी गाड्या हलक्या असल्यामुळें ज्या शहरांतील रस्ते फारसे चांगले नसतात तेथें एक घोडा जुंपून वापरण्यास जास्त सोईवार होतात. मुंबई पुणें वगैरे शहरांतून कांहीं चारचाकी गाड्यांला एक घोडा

जोडला असतां फारशी हरकत नाहीं कारण तेथील बहुतेक रस्ते इतके चांगले पक्के आहेत कीं त्यांवरून चारचाकी गाड्या ओढण्यास एक घोड्याला फार श्रम पडत नाहीं; पण ज्या ठिकाणीं रस्ते पक्के नाहीं तेथें डागकार्ट, शिग्राम किंवा तांगा याच गाड्या एक घोड्याच्या बेताच्या होत; आणि त्याच बहुतकरून प्रचारांतही आहेत.

कच्च्या रस्त्यांवर वापरण्या लायक दुचाकी गाड्या.

ज्या प्रमाणें घोडा बाळगणाराला व साज वापरणाराला त्यांच्या सर्व भागांची माहिती पाहिजे त्याच प्रमाणें गाडीच्या मालकालाही तिच्या निरनिराळ्या भागांची ओळख असणें अवश्य आहे.

खालीं ज्या भागांचें वर्णन दिलें आहे ते सर्व एकाच गाडीचे नसून कांहीं एकींत तर कांहीं दुसरींत आढळतील. त्या बहुतेकांची चांगली ओळख करून घेणें फार उपयोगी होय.

गाडीचा सांगाडा.

गाडीचा सांगाडा हा भाग फार महत्वाचा आहे. दुचाकी गाडीच्या सांगाड्याची रचना फार बिकट नसते पण चारचाकी गाड्यांचा सांगडा फार काळजीनें बन-

विला पाहिजे. ह्या सांगाड्याच्या खालच्या बाजूला मोठाले दोन अडीच बोटें रुंदीचे आणि पावइंचा पासून अर्ध्या इंच जाडीचे एकसंधी लोखंडी पट्टे मारलेले असतात. सांगाड्याचीं लांकडें बाभूळ तणस इत्यादि चिंवट जातींचीं असावीं. मधल्या फळ्या (पानेल) विन गांठीच्या लांकडाच्या असाव्या. होतां होईल तों सांगाड्याचा प्रत्येक सांधा चाकीच्या स्क्रूनें बसविलेला असावा. निरनिराळ्या गाड्यांच्या सांगाड्याची लांबी निरनिराळी असते हें उघडच आहे.

बैठक. बैठकी रुंद असून बसणारांच्या उंचीच्या मानानें असणें जरूर होय. बहुशः बैठकींची रुंदी पंधरा पासून वीस इंच असावी. लहान व्हिक्टोरिया किंवा लान्डोलेट् मधली पुढली बैठक अगदीं अरुंद असते, पण ती पुऱ्या मापाची असावी असा मूळचाच हेतू नाहीं.

कठडा. उघड्या गाड्यांच्या—ह्मणजे डागकार्ट, वागनेट, मेल फेटन—बैठकींला चारही बाजूनीं लोखंडी वाटोळ्या किंवा चौकोनी गजांचा कठडा असतो आणि त्याच्या वरच्या बाजूला तीन चार इंच रुंदीची फळीला मढवि-

लेली गादी असते. हा कठडा बैठकीशीं साध्या स्क्रूनीं जोडलेला असतो त्यापेक्षां चाकीच्या स्क्रूनीं जोडणें चांगलें.

हांकणाराच्या बैठकीच्या पुढच्या बाजूला लावलेल्या उभ्या चौकटीला सुपडी ह्मणतात. बहुतकरून लोखंडी चौकटीला रोगणी चामडें मढवून सुपडी करतात; पण कितीएक गाड्यांला ही लांकडाच्या फळीची किंवा चिपांचीच असते. घोड्याच्या रासपट्ट्या बेतवार उंचीवर रहाण्यांत सुपडीचा विशेष उपयोग होतो. सुपडी.

आमनिबस्, बॅरुश, ड्राग अशा मोठ्या गाड्यांत हांकणाराची बैठक फार उंच असून घोड्यांच्या अगदीं पुठ्ठ्यांवर आलेली असल्यामुळें त्या गाड्यांला सुपडी असत नाहीं.

गाडी उभी असली ह्मणजे रासपट्ट्या जमिनीवर लोळूं नये किंवा घोड्याच्या पायांत गुरफटूं नये ह्मणून त्या अडकविण्यासाठीं सुपडीच्या उजव्या भागावर एक चाप बसविलेला असतो. तसेंच कितीएक गाड्यांला चाबूक ठेवण्याची नळी सुपडीला लावलेली असते. ह्या रासपट्ट्यांचा चाप, व चाबकाची नळी.

ठिकाणीं नळी लावण्यापेक्षां हांकणाराच्या बैठकीच्या उजव्या बाजूला किंचित् मागल्या झोंकावर ही नळी बसविणें जास्त सोईचें होय. कांहीं हौशी लोक सुपडीला पुढें लहान कंदील लावण्याची आणि रासपट्टचा अडकविण्याच्या चापाजवळ घड्याळ ठेवण्याची योजना करतात.

कंदिलाचे आंकडे.

कांहीं गाड्यांला कंदिलांचे आंकडे सुपडीला लावलेले असतात पण त्यापेक्षां पुढल्या बैठकीच्या बाजुला असावे. हे आंकडे ब्रूहाम, लान्डोलेट इत्यादि गाड्यांच्या मधल्या भागाला लावतात. पुष्कळ लोक दुचाकी गाड्यांला कंदील लावण्याचे आंकडे चाकांजवळ बसवितात, परंतु ज्या शहरांतून रस्ते चांगले नाहीं तेथें ही योजना उपयोगी नाहीं. मोठाल्या गाड्यांचे कंदील बहुतकरून आंकड्यांला कायमचेच बसविलेले असतात. पण पुष्कळ गाड्यांला कंदील आंकड्यांत बसविण्याची सोय केलेली असते, तेव्हां त्यांत कंदील बसवून त्यांच्या खालच्या बाजूला एक बारीक कोयंडा असतो त्यांतून दोरी किंवा चामड्याची वादी घालून कंदील आंकड्यांच्या दांड्याला घट्ट बांधावे.

कंदील दोन तऱ्हेचे असतात—(१) मेणबत्ती वापरण्याचे (२) तेल वापरण्याचे. बहुतकरून पहिल्या तऱ्हेचेच जास्त प्रचारांत आहेत. शहरांतील भाडोतरी गाडीवाले आणि टप्प्यावरील टांगेवाले तेलाचे कंदील वापरतात. कंदिलांच्या जोडीची किंमत ५ रुपयांपासून १०० रुपये पर्यंत असते. बिल्लोरी कांचेच्या कंदिलांला किंमत जास्त पडते. कंदील.

कंदिलाचे मुख्य भाग तीन आहेत. मेणबत्ती रहाण्याची नळी आणि त्यांतील तारेची कमान (२) मेणबत्ती दाबून धरण्याची कडी (३) कांचा. तारेची कमान चांगली साफ न केली तर ती लौकर खराब होते.

कांच फार तापली आणि तिच्यावर एकदम पाण्याचे थेंब पडले तर ती तडकते; ही बाबत पावसाळ्यांत विशेष लक्षांत ठेवली पाहिजे.

आलीकडे कांहीं श्रीमान् लोक आपल्या गाड्यांला विजेचेच कंदील लावतात.

गाड्यांच्या पायऱ्या ह्मणजे योग्य ठिकाणीं एक लोखंडी दांडा लावून त्याला एक चार पांच इंच चौकोनी पायरी.

जाड लोखंडी पत्रा बसवून गाडींत चढण्यासाठीं केलेली योजना. अशा पायरीला खालच्या बाजूनें एक तीर दिलेला असावा. कितीएक शिग्रामांच्या पायऱ्या घडी करण्याच्या असतात. तसेंच लान्डो, फेटन वगैरे गाड्यांला तऱ्हेतऱ्हेच्या आपोआप घडी होणाऱ्या किंवा दरवाजा उघडल्याबरोबर उघडणाऱ्या आणि दरवाजा बंद झाल्याबरोबर घडी होणाऱ्या पायऱ्या लावलेल्या असतात. ह्या सोईवार खऱ्या परंतु आडाणी वापरणाराच्या हातून लौकर खराबही होतात.

पायरीचा पाय ठेवण्याचा पत्रा पुष्कळ खरखरीत केलेला असावा ह्मणजे गाडीवर चढतांना पाय सरत नाहीं. पायऱ्यांवरून पाय सरूं नये ह्मणून कांहीं गाडी बनविणारे पाय ठेवण्याच्या पत्र्याला रबराच्या पट्या लावतात.

एक घोड्याचे पोल.

दुचाकी गाडीला दोन पोल असतात. त्यांचीं पुढलीं टोंकें वांकविलेलीं असून तोंडावर लोखंडाच्या किंवा पितळेच्या वसव्या बसवितात. गाडीच्या सांगाड्याशीं पोल बसविण्याच्या अनेक रीती आहेत. प्रायशः

लोखंडाच्या कमानी लावून पोल त्यांवर बसवितात; तसेंच पोलांला समांतर अशा लोखंडी पऱ्याच्या कमानी लावतात. कितीएक पोलांला मजबूतीसाठीं ह्मणून खालीं सबंध लोखंडी पत्रा लावतात. पोलाला भोंकें पाडून चाकीच्या स्क्रूनीं हा पत्रा बसविण्यापेक्षां लोखंडी बंदांनीं बसविणें चांगलें. पोलाला भोंकें जितकीं कमी पडतील तितकें चांगलें, कारण ज्या ज्या ठिकाणीं भोंकें पडतात त्या त्या ठिकाणीं लांकडाच्या आंगच्या रेषा तुटून पोल कमजोर होतो.

दुचाकी गाड्यांचे पोल लान्सवुड ज्याला सुतार लोक नेनसुक ह्मणतात त्याचे उत्तम; त्याच्या खालोखाल ओकचे आणि त्याचा खालोखाल धामण, तणस इत्यादी जातींपैकीं कोणत्याही लांकडाचे असून अगदीं बिन गांठीचे असावे. जेवढा मोठा घोडा गाडीला जोडणें असेल त्याच्या लांबीवर पोलांची लांबी अवलंबून असते हें उघडच आहे. घोडा जोडला ह्मणजे पोलांचीं टोंकें त्याच्या मानेच्या अर्ध्या भागापर्यंत येतील इतक्या बेतानें त्यांची लांबी असावी. चारचाकी गाडीला एक घोडा जोडण्याचे पोल आंखूड असून गंडेरीला

लावतां येण्यासाठीं त्यांच्या टोंकांला भोंकें पाडून त्यांला लोखंडाच्या पट्ट्या मारलेल्या असाव्या.

गंडेरी. गंडेरीचा उपयोग दोन घोडे जोडण्यांत होतो. ही लांकडाची किंवा लोखंडी असते. सुमारें तीन इंच उंच आणि इंच दीड इंच जाड असे चार लोखंडी खुंटे (पैकीं दोन दोन्ही टोंकांला आणि दोन मध्यें या रीतीनें) गंडेरीला लावून त्यांत घोड्यांचे जोतपट्टे अडकवितात. ह्या खुंट्यांला "रोलरबोल्ट" ह्मणतात.

जोडीचा पोल. जोडी जोडण्याचा पोल अगदीं सरळ असून चांगल्या जून आणि बिन गांठीच्या लांकडाचा असावा. ह्या पोलांत यत्किंचित् व्यंग असल्यानें फार भयंकर अपघात घडतात. पुष्कळ खासगी जोडीच्या गाड्यांचे पोल वाजवीपेक्षां जास्त लांब असतात; त्यांचा कांहीं उपयोग न होतां उलट गाडी ओढण्यांत घोड्यांला जास्त त्रास मात्र होतो. ज्या गाडीला चौकडी जोडावयाची असेल तिचा पोल साडे दहा फुटांहून कमी नसून अक्रा फुटांपेक्षां जास्त लांब नसावा. त्याचें एक टोंक गाडीच्या चक्राखालीं जो लोखंडी आंकडा लावलेला असतो त्यांत बसवून मागें एक खिळा (पोलपिन) घालतात. पुढल्या

टोंकाला दोन लोखंडी कडीं पोलपीस किंवा सांखळ्या घालण्यासाठीं बसविलेलीं असतात. ह्याच ठिकाणीं एक मोठा लोखंडी हूक असतो त्याला चौकडीचे पुढले घोडे जोडतात.

जोडीचा पोल फार आंखूड असला तर घोड्यांचे मागले पाय गाडीच्या पुढल्या चाकांला हापटतात किंवा चाकांचा चिखल घोड्यांचा ढुंगणावर उडूं लागल्यानें त्यांस त्रास होऊन ते लाथा झाडूं लागतात.

पोलपीस ह्मणजे चामड्याचे पट्टे; हे जोडी जोडण्याच्या उपयोगीं पडतात (पहा पृ० १०८). हे चांगल्या कामावलेल्या चामड्याचे असून लवचीक व नरम असावे. जो पोलपीसचा उपयोग तोच पोल-सांखळ्यांचाही उपयोग, पण सांखळ्या दिसण्यांत जास्त डौलदार (पहा पृ० १७०) आणि चांगल्या असल्या तर मजबूतही असतात. पोलपीस व सांखळ्या.

चारचाकी गाड्यांच्या पुढल्या चाकांवर चक्कर असतें. चारचाकी गाडींत हा भाग फार महत्वाचा आहे. कितीएक गाड्यांला अर्धेच चक्कर असतें. अर्ध्या चक्क- चक्कर.

राची गाडी फिरवितांना फार संभाळून फिरविली पाहिजे नाहीं तर ती उलटते. अर्ध्या चक्राच्या गाडीपेक्षां सगळ्या चक्राची गाडी वापरणें जास्त सुरक्षित होय.

चाकें. चाकें चिंवट लांकडाचीं असावीं. हीं या देशांत बाभळीच्या लांकडाचीं करतात आणि तेंच लांकूड उत्तम.

चाकाचे भाग—तुंबे, रवे, वांकीं, आणि धांवः—तुंबे–हे लांकडाच्या साडाचे कांतलेले असून त्यांच्या दोन्ही तोंडांवर लोखंडी कडीं बसवितात. हे सरासरी पांच पासून सात इंच जाड असतात. रवे आणि वांकीं चांगल्या जून पुष्कळ दिवस ठेवून वाळलेल्या बिन गांठींच्या चिंवट लांकडाचीं असावीं. हे भाग तयार करून पुष्कळ दिवस ठेवल्यानंतर चाकें जोडलीं तर चांगलें. कितीएक विलायती व अमेरिकन गाड्यांच्या चाकांचीं वांकीं निरनिराळीं नसून एकच लांकूड वळवून त्याचें सबंध वर्तूळ करतात. ह्या देशांत वांकांची लांबी दिड दोन फुटांपेक्षां जास्ती नसते. प्रत्येक चाकाला बहुतकरून चौदा पासून सोळा रवे आणि सात आठ वांकीं घालतात.

धांव—ही लोखंडाची असते. नीमगोल धांव दिसण्यांत चांगली दिसते आणि पक्क्या सडकेवर वापरण्यास कांहीं हरकत नाहीं, पण ज्या ठिकाणीं रस्त्यांत धुरळा फार तेथें असल्या धांवेच्या चाकांनीं घोड्याला ओढ जास्त पडते; अशा प्रदेशांत धांव चपटीच असावी.

चाकांच्या लोखंडी धांवा काळजीपूर्वक न चढविल्या ह्मणजे चाकें द्रोणासारखीं होऊन रवे खराब होतात किंवा धांव सईल राहिली तर चाकें खिळखिळतात.

हल्लीं रबराच्या धांवा फार प्रचारांत येत चालल्या आहेत. ह्या धांवांचा एक मोठा फायदा असा कीं गाडी रस्त्यावरून चालत असतांना अगदीं खडखडाट होत नाहीं व बसणाराला हिसकाही कमी बसतो. ह्या देशांतील उष्ण हवेच्या मानानें रबरी धांवा नीट टिकत नाहीं. शिवाय ज्या धांवा इकडे दृष्टीस पडतात त्या बनवाव्या तशा बनविलेल्या नसतात. साधारण रबराच्या पट्टीला सुई एवढें भोंक पाडून ती ओढली तर त्या ठिकाणीं फाटत जातें ही गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे रबराच्या धांवा कां खराब होतात तें सहज लक्षांत येईल. सडकेवर गाडी चालतांना खडे, खिळे, कांचेचे तुकडे वगैरे रबरी धांवा.

टोंकीचे पदार्थ रबराला बोंचून त्या ठिकाणीं भोंकें पड-
तात, आणि रबरी धांवा जोरानें ओढून बसविलेल्या
असल्यामुळें त्या ठिकाणीं तुटूं लागतात.

ज्यांला रबरी धांवा वापरणें असतील त्यांणीं
आलीकडे नवीन प्रकारच्या निघालेल्या धांवा वापराव्या.
त्यांची रचना अशी असते कीं लोखंडाच्या सर्पाकृति
वांकविलेल्या तारेवर रबर चढवून त्याची धांव बनवि-
तात. ही धांव चाकावर बसविली ह्मणजे रबर ताणलें
न जातां लोखंडाच्या तारेच्या नेटामुळें ती सरत नाहीं.
असली रबरी धांव लौकर तुटतही नाहीं.

रबरी धांवा लोखंडी धांवांवरून चढवितात.
नुसत्या रबरी धांवांनीं चाक मजबूत होणें शक्य नाहीं.

रबरी धांवा लावलेल्या लोखंडी चाकांच्या कांहीं
गाड्या आलीकडे मुंबईस दृष्टीस पडतात पण त्या फार
काळजीपुरःसर वापरल्या पाहिजेत.

आंस (ॲक्सल्). आंस (ॲक्सल्) दोन जातीचे असतातः—(१)
तीन खिळ्यांचा (२) पेटन्ट किंवा पिन ॲक्सल्.

तीन खिळ्यांचा आंस वापरण्यांत फारशी खटपट

नसते पण त्यांत तेल वारंवार घालावें लागतें. पेटन्ट आंसांत दोन तीन महिन्यांनीं तेल घातलें म्हणजे पुरतें पण तें किंचित् कुशलतेनें आणि काळजीपूर्वक घालावें लागतें. तीन खिळ्यांच्या आंसाचा डबा काढून तेलानें भरून बसविला म्हणजे झालें पण पेटन्ट आंसांत तेल पाहिजे त्याला घालतां येत नाहीं.

आंसाचीं दोन्ही टोंकें तिरख्याचीं असतात. तीं लोखंडाच्या नळकंड्यांत घट्ट बसतीं केलेलीं असतात. हीं नळकंडीं चाकाच्या तुंब्यांत बसवितात. नळकंड्यांच्या तोंडावर पितळेचे डबे मळसुत्रानें फिरवून बसवितां येण्यासारखे केलेले असतात त्यांत तेल घालतात. आंसाचे बहुतकरून दोन तुकडे असतात ते गाडीची जितकी रुंदी ठेवावयाची असेल त्या बेतानें जोडून सांधतात. हा सांधा चांगला मजबूत झाला पाहिजे. ॲक्सलचे डबे.

गाडीच्या कमानी चार पांच किंवा सहा लोखंडी पत्रे एकावर एक जुळवून केलेल्या असतात. कमानी दुहेरी किंवा एकेरी असतात. दुहेरी कमानीला प्रायशः डबा-कमान आणि एकेरीला घोडा-कमान म्हणण्याचा कमानी.


संप्रदाय आहे. मोठाल्या गाड्यांला सहा सहा आठ आठ कमानी लावून त्या अगदीं पाळण्यासारख्या झुलत्या करतात त्यामुळें त्यांत अगदीं हिसका येत नाहीं. कमानींत लवचीकपणा आणि स्थितिस्थापकत्व जितकें असेल त्या प्रमाणानें त्यांची उपयुक्तता विशेष असते.

छत्री. गाडी जशी असेल त्या मानानें छत्री बनविलेली असते. डॉगकार्ट आणि तांगा यांची छत्री फार साधी असते. शिग्रामाची छत्री उघडण्या मिटण्याची नसल्यानें तींतही फारशी भानगड नसते. ब्रूहामची छत्री लांकडाच्या फळ्यांचीच असते. व्हिक्टोरिया, वागनेट, लान्डो या गाड्यांच्या छत्रीची रचना पुष्कळ बिकट असून तिला किंमतही फार पडते. ही विलायती किंवा कलकत्याच्या रोगणी चामड्याची असते. विलायती चामड्याची जास्त टिकाऊ आणि सुबक असते.

ह्या मुख्य भागांशिवाय इतर किरकोळ भागांचें वर्णन देणें शक्य नाहीं. दरवाज्यांच्या पड्यांच्या कमानी,

हांकणाराला इषारा करण्याची घंटा इत्यादि योजना कारागिराची कुशलता आणि गाडी घेणाराची ऐपत यांवर अवलंबून असतात.

ठिकठिकाणीं प्रचारांत असलेल्या सर्व गाड्यांचें साद्यंत वर्णन ह्या पुस्तकांत देणें शक्य नाहीं तत्रापि विशेष उपयोगी आणि चोंहींकडे नजरेस येणाऱ्या गाड्यांची रचना कशी असते, त्यांत कोणत्या भागांविषयीं जास्त खबरदारीनें चौकशी केली पाहिजे वगैरे माहिती पुढल्या प्रकरणांत देण्यांत येईल.



आकृति ३७. डॉगकार्ट.

प्रकरण १६.

दुचाकी गाड्या.

मागील प्रकरणांत गाड्यांचे दोन वर्ग करून त्यांच्या रचनेबद्दल साधारण वर्णन देण्यांत आलें आहे. त्यांतून दुचाकी गाड्या कोणत्या आणि त्या कसकशा उपयोगांत येऊं शकतात ह्या बाबतींचा प्रस्तुत प्रकरणांत विचार करण्याचा उद्देश आहे.

ज्या शहरांत रस्ते चांगले आणि ज्याला स्वतः गाडी हांकण्याची हौस असेल त्याणें दुचाकी गाड्यांपैकीं आकृति ३७ मध्यें दाखविलेल्या गाडीसारखी डॉगकार्ट वापरावी. असली गाडी मनासारखी मिळण्यासाठीं कारागिराला योग्य सूचना देऊन नवी करवावी किंवा खात्रीच्या कारखान्यांतून घ्यावी. डॉगकार्ट.

डॉगकार्ट गाडीची उंची तिला जो घोडा जोडावयाचा असेल त्याच्या उंचीच्या मानानें असली पाहिजे.

१३–३ पासून १४–३ पर्यंत उंचीच्या घोड्याला चांगल्या रीतीनें जोडतां येण्यासारखी डॉगकार्ट खालीं लिहिलेल्या वर्णनाप्रमाणें असावी.

चाकें. चाकें सुमारें साडेचार फूट उंच असावीं, ह्मणजे घोड्याला एखाद्या लहानशा उंचवट्यावरून ती सहज ओढून नेतां येते. जर चाकें लहान असलीं तर गाडी ओढण्याला घोड्याला त्रास पडतो. गाडीच्या चाकाला सात वांकीं आणि चौदा पर्यंत रवे असावे. तुंबे, रवे आणि वांकीं हीं जितकीं बारीक असतील तितकीं दिसण्यांत चांगलीं दिसतात पण दररोजच्या वहिवाटीला दीड पावणेदोन इंच रुंदीचीं वांकीं असावीं. दोन्ही चाकांच्या मधली रुंदी साडेचार पासून पांच फूट असावी, ह्मणजे गाडीच्या आंतल्या बाजूला पुष्कळ जागा रहाते व गाडी उलथून पडण्याचा संभव कमी असतो. ज्या रस्त्यांतून चाकोळ्या पडलेल्या नसतात, किंवा रस्ते खडी घालून पक्के केलेले असतात तेथें किंचित् जास्त रुंदी असली तरी चालते; जितकी रुंदी जास्त तितकी गाडींत जागा जास्त सांपडते. पण जर चाकोळ्या पडलेल्या रस्त्यांतून गाडी चालविण्याचा वारंवार प्रसंग येण्याचा संभव अ-

सेल तर दोन चाकोळ्यांमध्यें जितकीं रुंदी असेल तितक्या रुंदीचींच चाकें ठेवणें चांगलें. भारदारी खटाऱ्यांच्या चाकांनीं रस्त्यांत चाकोळ्या पडतात, आणि मध्यें उंचवटा रहातो; अशा रस्त्यांवर एक घोड्याला चालण्याला फार त्रास पडतो आणि शिवाय गाडीचीं चाकें बरोबर पन्हळांत राहिलीं नाहीं ह्मणजे प्रसंगवशात् गाडी उलटून पडण्याचीही धास्ती असते. ह्मणून जेथें पक्के रस्ते नाहींत किंवा रस्त्यांची चांगली दुरुस्ती नाहीं त्या ठिकाणच्या रिवाजाप्रमाणें चाकांचीं रुंदी ठेवावी हें चांगलें.

ज्यांना स्वतः गाडीची चौकस देखरेख होत नाहीं त्यांनीं आपल्या गाडीला सव्वा इंचाचा तीन खिळ्यांचाच आंस (ॲक्सल) ठेवावा.

एकाच डॉगकार्टला निरनिराळ्या उंचीचे घोडे जोडण्याच्या कामीं (बेन्ट् शॅफ्ट) वांकिवलेले पोल बरेच सोईचे असतात. गाडीला पोल कसे असावे हें पृष्ठ १८८ वर सांगितलें आहेच.

गाडीचा मुख्य भाग ह्मणजे मधला सांगाडा. हा होईल तितका रुंद ठेवण्याचा यत्न करावा; तसेंच तो

डॉगकार्टचा सांगाडा.

जितका लोखंडाच्या आंसाजवळ बसववेल तितका बसवावा, ह्मणजे गाडी उलटण्याचा धोका नसतो व गाडींत बसणारालाही जास्त सुख होतें.

डॉग्‌कार्टच्या सांगाड्याची लांबी साडेचारपासून पांच फुटांपर्यंत आणि रुंदी २ फूट १० इंचांपासून ३ फूट ९ इंचपर्यंत असते.

गाडीचा सांगाडा पोलांवर पक्का बसविलेला असला ह्मणजे तो घोड्यापासून सदोदित एकाच अंतरावर रहातो. शिवाय तो कायमचा बसविल्यानें गाडी फार हलकी बनवितां येते. पण जर सांगाडा मागें पुढें सरकणारा असला तर गाडी चालतांना आवाज होण्याचा जास्त संभव असतो.

वैठक. डॉगकार्टमध्यें दोन माणसें पुढें आणि दोन माणसें मागें याप्रमाणें बसतात, ह्मणून पुढली व मागली बैठक मिळून तीन फुटांपासून साडेतीन फुटांपर्यंत रुंद ठेवून मध्यें कठडा ठेवतात. कांहीं डॉगकार्टमध्यें दोन्ही बैठकी सारख्या न ठेवतां पुढली बैठक किंचित् जास्त रुंद ठेवतात.

गाडीची बैठक पंधरांपासून अठरा इंच उंच असावी, ह्मणजे हांकणाराला पायांखालीं घडवंची (फूट् स्टूल) घेण्याची फारशी अवश्यकता रहात नाहीं, किंवा त्याला अर्धवट उभा आहें असा भास होत नाहीं. गाडीच्या चौकटीच्या बाजूंच्या लांकडांत खांच पाडून तींत बैठकीची फळी मागेंपुढें सरकती ठेवणें चांगलें. पण कदाचित् घोडा खालीं पडला तरी ती बैठक खांचें-तून निसटून जाऊं नये अशा बेतानें बसविलेली असावी. फक्त बैठक निवून पडल्यानें पुष्कळ लोक खालीं पडून त्यांना दुखापत झाल्याचे दाखले आहेत. गाडीच्या बाजूंच्या कठडयांपेक्षां बैठक बरीच सखल असली तर अधीक सुखावह होते.

डॉगकार्टमध्यें एक माणूस असला किंवा चार असले तरी गाडीचें वजन समतोल राहील अशी मागच्या व पुढच्या बैठकींची योजना करावी. गाडींत दोहों-पेक्षां जास्त माणसें बसलेलीं असतात तेव्हां तोल सारखा रहाण्याकरतां बैठकी मागेंपुढें सरकवितां येतील अशी तजवीज ठेवली तर चांगलें.

फुट्-रेस्ट्. बैठक सरकविण्याची केलेली असली तर हांकणारासाठीं मागेंपुढें करतां येण्याजोगें एक फुट्-रेस्ट् बसविण्यासाठीं गाडींत ज्या ठिकाणीं हांकणाराचे पाय रहातात तेथें सुमारें सात आठ भोंकें जोडीनें पाडून ठेवावीं ह्मणजे त्यांत फुट्-रेस्ट्च्या खुंट्या सहज मागेंपुढें करतां येतात. ह्या फुट्-रेस्ट्वर पाय ठेवले ह्मणजे पायांचे तळवे तंगड्यांशीं काटकोनांत रहातील अशा बेतानें फुट्-रेस्ट् पुढून उतरतें केलेलें असून त्याला खालीं चार खुंट्या बसविलेल्या असाव्या. गाडीच्या तळांत पाडलेल्या भोंकांत ह्या खुंट्या बसविल्या ह्मणजे फुट्रेस्ट् आपोआप मागेंपुढें सरकत नाहीं.

कांहीं डॉगकार्टमध्यें लोखंडी दांड्याचें "बार फुट्-रेस्ट्" बसविलेलें असतें; तें दिसण्यांत चांगलें खरें पण तें विशेष धोक्याचें आहे, कारण गाडींतून खालीं उतरतांना दांड्याखालीं पायांचा पंजा अडकण्याचा संभव विशेष असतो.

डॉगकार्टची सुपडी दहा इंचांपासून एक फूटपर्यंत उंच असते. सुपडीविषयीं सविस्तर माहिती पृ० १८४ वर दिली आहे.

गाडीच्या बाजू व चाकें ह्यांच्यामध्यें पुष्कळ अंतर असलें तर तेथें कंदील बसवावे; पण जर जागा चांगली रुंद नसली तर कंदिलाचे आंकडे किंचित् वांकडे झाले ह्मणजे त्यामुळें कंदील चांकांवर आपटतात. वर सांगितलेल्या रीतीनें बसविलेले कंदील टॅन्डम गाडी हांकतांना फार सोईचे असतात; पण ही योजना उत्तम प्रतीचे रस्ते असतात त्या ठिकाणीं चांगली, इतर ठिकाणीं कंदील सुपडीला लावणें चांगलें. कंदील.

डॉग्कार्ट किंवा कोणतीही दुचाकी गाडी ओढण्यास सोईची युक्ति ह्मणजे सुपडीच्या खालीं दोन्ही पोलांशीं जोडलेला जो आडवा दांडा असतो त्याला चामड्याच्या मजबूत पट्ट्यांनीं एक दांडकें जोडून जोतपट्टे त्या दांडक्याच्या टोंकांला लावण्याची योजना करावी. गाडीच्या आंसाला चाकांजवळ आंकडे ठेवून त्यांत दोन मजबूत सांखळ्या अडकवून त्या दोन्ही सांखळ्या पट्टे जोडण्यासाठीं योजलेल्या दांडक्याला मधोमध लावाव्या. ह्या योजनेनें गाडी ओढण्यास चांगला नेट सांपडून, शिवाय पट्ट्यांचें दांडकें खेळतें राहिल्यानें घोड्याच्या खांद्यांवर पट्ट्यांचा जोर जसा पाहिजे जोतपट्ट्यांचें दांडकें.

तसा सहज कमी जास्ती होऊन त्याचे खांदे चोळवटत नाहींत. गाडी चालत असतांना दांडक्याला लावलेल्या सांखळ्यांवर ओढ पडते कीं नाहीं हें लक्षपूर्वक पहावें. तसेंच चामड्याच्या पट्ट्यावरही चांगली नजर ठेवावी.

पंखे. गाडी चालत असतांना चाकांचा चिखल बसणाराच्या आंगावर उडूं नये ह्मणून पंखे लावतात; हे रोगणी चामड्याचे किंवा लांकडी फळ्यांचे करतात. चामड्याचे पंखे फार किमती असतात. कमानी फार लवचीक असून पंखे सखल असले तर चाकें पंख्यांला घांसतात. ही बाबत गाडी विकत घेतानां नीट तपासून पहावी.

कमानी. कमानी गाडीच्या सांगाड्याच्या लांबीच्या मानानें ठेवल्या पाहिजेत. उंची लोखंडाच्या कमानी असल्यातर डॉगकार्टला दोनच घोडा-कमानी पुरतात. ह्या चारपासून साडेचार फूट लांब, दोन सव्वादोन इंच रुंद आणि चार पांच पत्र्यांच्या असाव्या. कांहीं कारागीर एक तिसरी कमान गाडीच्या मागल्या बाजूला लावतात.

छत्री. डॉगकार्टला छत्री लावण्याचा मूळचा उद्देश नाहीं. ह्या देशांत पुष्कळ ठिकाणीं ती लावलेली दृष्टीस


पडते; पण असावी तशी फार थोड्याच गाड्यांला असते. ओक लांकडाच्या ज्या छत्रीच्या आयत्या चिपा मिळतात त्या एकच लोखंडी खुंट्याला तीन बि-जागरें करून त्याला लावाव्या आणि वर साधें जाडी किंतान किंवा रोगणी कापड बसवावें आणि छत्री उभी रहाण्यासाठीं चामड्याच्या वाद्या लावाव्या. डॉगकार्टला असल्या छत्रीशिवाय दुसऱ्या प्रकारची छत्री अगदीं बेढब दिसते.

"करात किंवा करवत."

यजमानानें हांकण्यासारख्या दोन चाकांच्या गाड्यांपैकीं मुंबई शहरांत जी घोड्याची गाडी अगदीं प्रथम दिसूं लागली तिला "करात" किंवा "करवत" ह्मणतात. हे दोन्ही शब्द आणि तत्संज्ञित गाडी इंग्रजी "काब्रिओलेट" याचा अपभ्रंश असावे असें वाटतें. इंग्लंडांत ही गाडी पदार्थ-संग्रहालयांशिवाय इतर ठिकाणीं आतां दृष्टीस पडत नाहीं. मुंबईतील कांहीं जुन्या घराण्यांतून अजून ह्या प्रकारच्या गाड्या कोठें कोठें दिसतात; पण एकंदर सगळ्या शहरांत पांच पंचविसांपेक्षां जास्त नाहींत.

गिग. गिग नांवाची गाडी आकृति ३८ मध्यें दाखविली आहे. ही अगदीं हलकी असून तींत दोनच माणसें बसण्याची सोय असते. ही गाडी अलिकडेच ह्या देशांत दिसूं लागली आहे. आस्ट्रेलियामध्यें जमीनदार लोक आपआपल्या शेतांवर जाण्यासाठीं गिग गाडी वापरतात. सुरत वगैरे ठिकाणीं ज्याप्रमाणें हलक्या गाड्यांला लहान लहान बैल जोडून शर्यती करतात त्याचप्रमाणें अमेरिकेंत उंच चाकांच्या गिग गाड्यांला घोडे जोडून शर्यती लावण्याचा पुष्कळ परिपाठ आहे. इंग्लंडांत डॉक्टर लोक आपल्या धंद्याच्या संबंधानें फिरण्यासाठीं ही गाडी वापरतात.

बगी. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं बगी नांवाची गाडी मुंबईंत फार प्रचारांत होती. तेथें सगळ्या भाडोत्री गाड्या ह्याच तऱ्हेच्या होत्या; त्यांत हांकणाराच्या शेजारीं दोन माणसें जेमतेम बसत. ही अडचण दूर होण्यासाठीं हांकणाराची बैठक निराळी पुढें करण्यांत आली. आतां त्या जातीची गाडी फारच विरळा दृष्टीस पडते आणि तिच्या ठिकाणीं व्हिक्टोरियाच चोंहीकडे प्रचारांत आहे.




आकृति ३८. गिग.

हन्सम. लंडन शहरांत हन्सम नांवाची गाडी भाडोत्री लोक वापरतात. असल्या गाड्या मुंबईंत चालू करण्यासाठीं कांहीं वर्षांपूर्वीं एक मंडळी स्थापन झाली, आणि हन्सम गाड्या सुरूही झाल्या पण त्या लोकांला न आवडल्यामुळें लौकरच बंद पडल्या. ह्या गाडींत हांकणारा गाडीच्या मागें उंच बैठकीवर बसतो आणि घोड्याच्या रासपट्ट्या छत्रीवरून आपल्या हातांत धरून गाडी हांकतो.

शिघ्राम. ज्याला स्वतः गाडी हांकण्याची हौस नसून हरकामी अशी दुचाकी गाडी बाळगणें असेल त्याला आकृति ३९ मध्यें दाखविलेली शिघ्राम गाडी फार सोईवार आणि बेताची होय.

रचना. ही गाडी मूळ बैल जोडण्याची असून अलीकडेच तिला घोडा जोडण्याची योजना प्रचारांत आली आहे. साधारण शिघ्रामाची लांबी साडेचार फूट, रुंदी तीन पासून सव्वातीन फूट आणि खालच्या चौकटीची उंची सव्वा फूट असून छत्री सुद्धां उंची पांच फूट असते. चाकांचा व्यास चार फूट असावा. ह्या मापाच्या शिघ्रा-



आकृति ३९ शिग्राम.

माला दुहेरी किंवा डबा-कमानी लागत नाहींत. घोडा-कमानी पांच पत्र्यांच्या दीड इंच रुंद आणि एका टोंका-पासून दुसऱ्या टोंकापर्यंत निदान चार फूट लांब असाव्या. शिघ्रामाला दीड इंचाचा आंस घालावा.

बैठक. हांकणारासुद्धां शिघ्रामांत सहा माणसें बसूं शकतात. अलीकडे कांहीं शिघ्रामांतील बैठकी आडव्या ह्मणजे बसणारांच्या पाठी चाकांकडे होतील अशा बेतानें केलेल्या असतात. चित्रांतही असाच शिघ्राम दाखविला आहे. अशा योजनेनें शिघ्रामांत जाणें कांहींसें सोईचें होतें यापेक्षां कोणताही फायदा नाहीं; किंबहुना अशा बैठकीपासून शिघ्रामाचा सांगाडा खराब होऊन कांहीं दिवसांनीं त्याचें दार नीट लागेनासें होतें, असा अनुभव आहे. जुनी बैठकीची तऱ्हा (हिच्यामध्यें दोन बसणारांच्या पाठी दरवाज्याकडे आणि दोघांच्या पाठी घोड्याकडे असतात) चांगली असें वाटतें.

शिघ्रामाला वर मोठी वजनदार छत्री असते ह्मणून एकंदर गाडीचा सांगाडा लोखंडी आंसा (ॲक्सल) जवळ जितका ठेववेल तितका ठेवावा, नाहीं तर गा-

डीच्या एका चाकाखालीं जरी एकादा लहानसा उंचवटा आला तरी ती उलटण्याचा संभव फार असतो.

शिघ्रामाची छत्री बैठकीपासून ३॥ फूट उंच असावी. गाडी बनविणारे कारागीर शिघ्रामाची छत्री फार जड करतात तितकी जड न केली तर चांगलें. आंतल्या बाजूनें रोगणी किंवा साधें कापड मध्यें तट्टचा आणि वर जाडें किंतान असलें ह्मणजे पुरे. किंतानावर रोगण व सफेता याचे तीन तीन हात दिले ह्मणजे पुष्कळ होतात; मात्र एकदां रंग लावला ह्मणजे तो चांगला पक्का वाळण्यापूर्वीं दुसरा हात न देण्याविषयीं खबरदारी ठेवावी. शिघ्रामाचे पडदे मऊ आणि लवचीक आहेत कीं नाहींत तें गाडी खरीद करतेवेळीं नीट तपासून पहावें आणि गाडी वापरीत असतांही वारंवार सोडून पहाण्याचा प्रघात ठेवावा. छत्री.

जुन्या तऱ्हेच्या शिघ्रामांत पुढल्या बाजूला चार माणसें (दोन बाहेर आणि आंतल्या पुढल्या बैठकीवर दोन) बसण्याची जागा असल्यानें गाडीचा भार पुढें घोड्यावर जास्त पडण्याचा संभव असतो ह्मणून ती बनवितांना वजनाचा कारागिरानें चांगला विचार केला पाहिजे. कंदील.

दरवाज्याची कळ.

शिग्राम गाडीचे कंदील गाडीच्या पुढच्या बाजूला असतात त्यामुळें ते डॉगकार्टप्रमाणें चाकांशीं हापटण्याची कधींही भीती नसते.

शिग्राम गाडीच्या बैठकी जुन्या चालीच्या असल्या तर दरवाज्याला अडकवून धरण्याची मुठीची कळ असली तरी दरवाज्याच्या वरच्या टोंकाशीं एक लोखंडी आंकडा लावावा. गाडी चालण्याच्या हिसक्यानें मुठीची कळ एकादेवेळीं फिरून जाते आणि दरवाजा उघडतो. अशा वेळीं जर बसणाराचा भार दरवाज्यावर असला तर तो उलटून पडण्याचा संभव विशेष असतो.

तांगा.

जेथें आगगाडीची सोय नाहीं तेथें टपाल व उतारू नेण्यासाठीं टप्प्याटप्प्यांवर तट्टांच्या जोड्या ठेवून लोक तांग्यांतूनच प्रवास करतात. पण अलीकडे अशा कामासाठीं तांग्यांचा उपयोग कमी होऊं लागला आहे.

ज्या गृहस्थांला नेहेमी सरकारी नोकरीच्या संबंधानें किंवा शिकार वगैरेच्या कर्मणुकीसाठीं फिरण्याची हौस असते असे लोक दोन घोड्यांचा तांगा बाळगतात. ज्या प्रांतांत जमीन उंच सखल, खडकाळ,

किंवा जेथें रस्ते पक्के केलेले नसल्यामुळें गाड्यांच्या चाकानीं पन्हळ पडून मध्यें उंचवटा असतो अशा ठिकाणीं तांगा फार उपयोगीं पडतो.

तांग्याची सुद्धां मूळ कल्पना बैलगाडीवरून निघाली असावी असें वाटतें. ज्याप्रमाणें बैलांच्या मानेवर जोखड घालून गळ्याखालून जोत लावतात तसेंच तांग्याच्या घोड्यांला जोत लावून तांगे हांकण्याचा नाशीक, अहमदनगर वगैरे ठिकाणीं अद्याप प्रघात आहे.


तांग्याला घोडे जोडण्यांत अशा तऱ्हेनें मानेवर जोखड. जोखड घालण्याच्या रीतींत फेरफार करून तें घोड्याच्या पाठीवर घालण्याचा सांप्रत फार प्रचार आहे; त्याहूनही ज्यांची तितकी ऐपत असते ते लोक लांकडाच्या जोखडाऐवजीं लोखंडी दांडा वापरतात.

डॉगकार्टला तांग्याचें स्वरूप देण्याला आणि त्याप्रमाणें वापरण्याला फारशी अडचण पडत नाहीं, पण बहुशः डॉगकार्टचीं चाकें उंच असतात व बैठकीही उंच असतात ह्मणून डॉगकार्टचा तांगा बनवून जंगलांत

किंवा उंच सखल जमिनीवर घेऊन जाणें बऱ्याच अंशीं धोक्याचें आहे. तांग्याच्या चाकांचीं वांकीं आणि वरच्या धांवा रुंद असाव्या ह्मणजे रेताळ प्रदेशांत तो चालण्यास हरकत पडत नाहीं. तसेंच तांग्याच्या बैठकी जितक्या सखल असून आंसाजवळ राहतील तितक्या चांगल्या. असला तांगा सहसा उलटत नाहीं. ह्याला मध्यें जोडीच्या गाडी प्रमाणेंच एक पोल घालतात. ह्या पोलाच्या पुढच्या टोंकाला लंबवर्तुलाच्या चतुर्थांशासारख्या दोन लोखंडाच्या कमानी लावून वरच्या कमानीला लांकडाचें जोखड लावलेलें असतें.

तांग्याच्या घोड्यांचा साज.

तांग्याच्या घोड्यांचा साज पुष्कळ अंशीं जोडीच्या साजाप्रमाणेंच असतो; मात्र पाठीवरील कठडी जोडीच्या कठडीपेक्षां रुंद असून आकृति ४० मध्यें दाखविल्याप्रमाणें प्रत्येकाला दोन लोखंडी आंकडे असतात. त्याच्या मध्यें जोखड ठेवून वरून एक चामड्याची पट्टी दोन्ही आंकड्यांना बांधतात; असें केल्यानें तें बाहेर निसटून येत नाहीं. घोड्याच्या गळ्यांत जोडीच्या सामानाप्रमाणें हांसोळी न घालतां छातीपट्टा घालून त्यालाच जोतपट्टे लावतात. हे पट्टे तांग्याला अ-



आकृति ४०. तांगा.

डकविण्यासाठीं कांहीं तांग्यांना चारचाकी गाड्यांप्रमाणें गंडेरी असते, पण दोन निराळीं लांकडाचीं दांडकीं असून त्यांच्या दोंहों टोंकांना प्रत्येक तट्टाचे पट्टे लावून तीं दांडकीं आंकड्यानें तांग्याला अडकविलेलीं असावीं हें चांगलें. जोडीच्या गाडीप्रमाणें तांग्यालाही पोलपीस किंवा पोलसांखळ्या लावणें चांगलें. जोडीच्या साजांत घोड्याच्या रासपट्ट्या प्रत्येकाच्या कठडीवरील आंक-ड्यांतून घालून कठड्यांना लावतात. तांग्याच्या साजांत तशी सोय करतां येत नाहीं; त्याच्या ऐवजीं जोखडाला चार लोखंडी कोयंडे लावून त्यांतून रेनी काढून घेण्याची सोय केलेली असते.

तिरव्याच्या दांड्याचें जोखड.

एकंदरीनें या देशांत तांग्याला लांकडाचें जोखड सोईचें होतें. आकृति ४० मध्यें ह्याच प्रकारची जोडणी दाखविली आहे. कांहीं लोक त्या ऐवजीं तिरव्याचा दांडा घेऊन त्याला मधोमध लंबगोलाकृति भोंक पाडून त्यांत चामड्याचा पट्टा घालून तांग्याचा पोल त्याच्या बरोबर अडकवतात. घोड्याच्या पाठीवर कठडीला लोखंडाची एक एक खुंटी लावून तिला एक एक चक्री लावतात

आणि तिच्यावर तो दांडा ठेवतात. ही योजना दिसण्यांत विशेष डौलदार दिसते परंतु उपयोगाच्या मानानें पाहिलें तर त्रासदायक होण्याचा जास्त संभव आहे.

उत्तर हिंदुस्थानांत (हिमालय पर्वताच्या आसमंतांतील प्रदेशांत) तांगा जोडण्याची एक निराळीच रीत आहे; ती अशीः— उत्तर हिंदुस्थानांतील तांगा.

वर सांगितल्याप्रमाणें तांग्याला मध्यें पोल न लावतां एक घोडा जोडण्यासाठीं जसे दोन पोल असतात त्याप्रमाणेंच पोल लावून मागें जोडीच्या गाडी सारखी गंडेरी बसवितात. ती एकाच बाजूला लांब बाहेर वाढविलेली असते आणि एक घोडा दोन्ही पोलांच्यामध्यें जुंपून दुसरा घोडा ज्या बाजूला गंडेरी वाढविलेली असते त्या बाजूला उभा करून जोतपट्ट्यानीं गंडेरीला जोडतात. अशा योजनेनें डोंगरावरून चढतां उतरतांना दोन्ही घोडे चांगल्या तऱ्हेनें हांकणाराच्या स्वाधीन रहातात.

तांग्याला बहुतकरून शिग्रामासारखी छत्री लावतात. फरक इतकाच कीं ती मागून पुढून उघडी असते. छत्री.


बैठकी खालील पेटी.

तांग्याला आंस, कमानी वगैरे डॉगकार्ट प्रमाणेंच लावतात. प्रवासासाठीं करविलेल्या तांग्याला बैठकीखालीं पेटी असते; ती फार उपयोगी पडते. कांहीं तांग्यांचा मधला कठडा काढून मागल्या बाजूला लावून तांग्यांत निजतां येण्याची सोय होऊं शकते. कितीएक गृहस्थानीं तांग्याच्या पेटींत फोटोग्राफच्या कांचा धुतां येण्याची, कितीएकांनीं तांग्याच्या सुपडी जवळ जरुरीच्या वेळीं उभी करतां येण्यासारखी एक लहान घडवंची (टेबलासारखी) करविलेली आमच्या माहितींत आहे. पण असल्या योजना सर्व साधारण नसून ज्याच्या त्याच्या आवडीवर आणि पिशवीच्या उमेवर अवलंबून असतात ह्मणून त्यांचें या ठिकाणीं सविस्तर वर्णन केलेलें नाहीं.

प्रकरण १७.

चारचाकी गाड्या.

चारचाकी गाड्यांपैकीं कांहीं चाकरानें हांकण्याच्या आणि कांहीं स्वतः यजमानानें हांकण्याच्या सोईच्या असतात. चाकरानें हांकण्याच्या गाड्यांपैकीं मध्यम प्रतीच्या गृहस्थाला बेतवार आणि सोईच्या गाड्या म्हटल्या ह्मणजे व्हिएना-फेटन, व्हिक्टोरिया-फेटन, ब्रूहाम, लान्डो किंवा लान्डोलेट् ह्या होत.



आकृति ४१ व्हिएना फेटन.

व्हिक्टोरिआ-फेटन व व्हिएना-फेटन.

व्हिक्टोरिया-फेटन आणि व्हिएना-फेटन ह्या दोहोंमध्यें फारशी तफावत नसते. आकृति ४१ मधलें

चित्र व्हिएना-फेटनचें आहे; त्यावरून ह्या जातीच्या गाड्यांची साधारण रचना ध्यानांत येण्यासारखी आहे. ह्या गाड्यांना चार पांच पऱ्यांच्या डबा-कमानी लावतात. ह्यांच्या पुढल्या चाकांची उंची तीन फूट व मागल्या चाकांची उंची पावणेचार फूट असते. मागल्या बैठकीवर उघडण्या मिटण्याची छत्री असते. ह्या गाड्यांत पुढली बैठक अगदीं लहान असते, ती इतकी कीं जरुरीच्या वेळीं तिच्यावर जेमतेम बसतां येतें. मागली ह्मणजे मुख्य बैठक वीस इंच रुंद असते. व्हिएना-फेटनचे सांधे आकृतींत दाखविल्याप्रमाणें कोनाकृति जोडलेले असतात; व्हिक्टोरिया-फेटनच्या जोडणींत कोन न ठेवतां प्रत्येक सांधा वळवून वाटोळा करतात. ह्या दोन्ही गाड्यांना दारें नसतात.

डबल व्हिक्टोरिआ.

डबल-व्हिक्टोरिया गाडी वरच्या सारखीच असते, मात्र थोडीशी मोठी असून आंतली पुढली बैठक रुंद असते; आणि गाडीच्या दोन्ही बाजूंला दरवाजे असतात.

बोट-फेटन.

तशीच आणखी एक फेटन गाडी प्रचारांत आहे; ती डबल-व्हिक्टोरिया सारखी असून तिच्या सांगाड्या-

ची आकृति साधारण होडीसारखी असते म्हणून तिला "बोट-फेटन" म्हणतात.

फेटनला पडदे लावणें.

सर्व जातींच्या फेटनी व व्हिक्टोरिया ह्या गाड्या सखल असल्यानें चढण्यास फार सोईच्या असतात. ह्या गाड्या एतद्देशी स्त्रियांच्या उपयोगांत याव्या म्हणून कांहीं लोक छत्रीच्या पुढच्या टोंकापासून हांकणाराच्या बैठकीपर्यंत जरुरीच्या वेळीं लावतां येण्यासारखे दोहों बाजूंस दोन लोखंडी गज लावून त्यांना चिकाचे पडदे लावतात, पण ह्यापासून गाडीची एकंदर शोभा जाऊन कांहीं तरी विचित्र रचना होते.

ब्रूहाम.


ब्रूहाम दोनतीन प्रकारचे असतात. कांहीं पुढें वाटोळे, कांहीं चौकोनी घाटाचे आणि कांहीं अष्टकोनी, पण मूळ जोडणी एकच. ब्रूहामची छत्री वरून सपाट असून गाडीला कायमची जोडलेली असते आणि पुढें व बाजूला कांचेच्या तावदानाच्या खिडक्या असतात. मोठ्या ब्रूहाममध्यें आंत चार, हांकणाराच्या बैठकीवर दोन आणि मागें एक अशाप्रकारें सातपर्यंत मनुष्यांचा समावेश होण्याची सोय असते.

मिनिएचर ब्रू-हाम.

मिनिएचर-ब्रूहाम ह्मणून एक लहान ब्रूहाम प्रचारांत आहे. त्यांत पुढें बैठक नसून औषधें, पुस्तकें वगैरे बारीक जिन्नस ठेवण्यासाठीं एक लहानशी पेटी असते; शिवाय गाडी हांकणाराची बैठक एकाच माणसापुरती असून मागेंसुद्धां घडवंची नसते. डॉक्टर, बॅरिस्टर वगैरे लोक आपल्या दररोजच्या उद्योगासंबंधीं फिरण्यासाठीं प्रायशः हीच गाडी वापरतात.

चाकरानें हांकण्याच्या गाड्यांपैकीं सर्वांत सोईची आणि तिन्ही ऋतूंत वापरतां येण्यासारखी गाडी आकृति ४२ मध्यें दाखविली आहे, तिला लान्डो ह्मणतात.

आकृति ४२. लान्डो.



ह्या गाडींत चार माणसें चांगल्या रीतीनें बसूं शकतात. तिची छत्री दोन तुकड्यांची असून ती अशी बनविलेली असते कीं पाहिजे तेव्हां दोन्ही तुकडे पाडून सकाळीं संध्याकाळीं उघडी गाडी करून तींत फिरतां येतें किंवा जिकडून ऊन येत असेल तिकडलाच छत्रीचा एक भाग उभा करतां येतो; तसेंच जरूर पडल्यास दोन्ही तुकडे उभे करून गाडी बंद करतां येते. सारांश ह्या मुख्य सोईमुळें चारचाकी गाड्यांत लान्डो गाडी सर्व तऱ्हेनें सुखावह होते. ह्या गाडीच्या दोन तऱ्हा आहेत. एक सेलबोर्न-लान्डो (हीच चित्रांत दाखविलेली आहे), व दुसरी शेफ्टन-लान्डो. पहिलीची जोडणी मूळ अर्ल ऑफ् सेलबोर्ननें करविली असल्यामुळें त्याचेंच नांव तिला पडलें आहे; हिचे सांधे कोन ठेवून जोडलेले असतात. दुसरी तऱ्हा अर्ल् ऑफ् शेफ्टननें करविली. तींत गाडीच्या सांगाड्याचे सांधे व्हिक्टोरिया-फेटन प्रमाणें वांकवून जोडलेले असतात. हिला शेफ्टन्-लान्डो ह्मणतात.


लान्डोच्या दोन तऱ्हा.

कारागीर लोकांनीं आणि गाडी वापरणारांनीं लान्डो गाडीकडे जितकें लक्ष पोंचवून वेळोवेळीं सुधार-

णा केली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही गाडींत झाले-ली नाहीं. याचें कारण ही गाडी वापरणारांची संख्या विशेष इतकेंच असावें. चांगल्या लान्डोला बाराशें पासून दोन हजार रुपये किंमत पडते. ही किंमत फक्त चांगल्या मजबूत मध्यम प्रतीच्या गाडीची समजावी.

लान्डोलेट्.

लान्डोलेट् ह्मणून एक लान्डोचाच प्रकार आहे. ही लान्डोसारखीच असते पण लान्डोची छत्री पुढें आणि मागें अशी दोन्ही बाजूंस अर्धी अर्धी जशी पाडतां येते तशी लान्डोलेट्ची येत नाहीं, फक्त माग-ल्या बाजूला मात्र पाडतां येते. पुढच्या बाजूचा भाग तसाच उभा रहातो आणि त्याला डबल-ब्रूहामप्रमाणें कांचेच्या तावदानाची खिडकी असते (पहा आकृति



आकृति ४३.


४३). ह्या जातीच्या गाडींत फार तर तीन माणसांपेक्षां जास्त माणसें बसूं शकत नाहींत. हिचाही प्रायः मिनिएचर–ब्रूहामसारखाच उपयोग होतो. ज्यांला फार मोठी गाडी न ठेवतां, पाहिजे तेव्हां उघडी आणि पाहिजे तेव्हां बंद अशी गाडी बाळगण्याची इच्छा असते त्यांना ही गाडी फार चांगली. अलीकडे मिनिएचर-ब्रूहाम ऐवजीं वकील, डॉक्टर इत्यादि लोक हीच गाडी बाळगूं लागले आहेत.

चारचाकी गाड्यांपैकीं कांहीं स्वतः यजमानानें हांकण्याच्या सोईच्या असतात. त्यांपैकीं मुख्य गाड्या मेल-फेटन, वागनेट, आणि पार्क-फेटन् ह्या होत.

मेल-फेटन गाडींत चारच माणसें बसण्याची मेल-फेटन. जागा असून दोन बैठकी असतात. त्यांतून एका बैठकीला छत्री असते. ही बैठक पाहिजे तेव्हां पुढें बसविण्याची किंवा मागें बसविण्याची सोय केलेली असते. मेल-फेटनपेक्षां वागनेट गाडी जास्त सोईची आणि उपयोगी आहे. ती बहुतेक मेल-फेटन सारखीच असते. फक्त तिच्या बैठकी अल्प श्रमानें मागें पुढें

करतां येत नाहींत. ह्या गाडींत पुढल्या बैठकीवर दोन माणसें आणि मागें ज्या दोन आडव्या बैठकी असतात त्या प्रत्येकीवर दोन अशीं सहा माणसें बसूं शकतात. आकृति ४४ अवलोकनांत घेतल्यानें ह्या गाडीची साधारण रचना ध्यानांत येईल. वागनेटला दोन प्रकारची छत्री लावतां येते. एक मेल-फेटनसारखी फक्त पुढल्या बैठकी पुरती (तीच विशेष प्रचारांत असल्यामुळें आकृतींत दाखविली आहे) आणि दुसरी साधारण शिग्रामासारखीही कांहीं लोक करवितात; पण तिच्यामुळें एकंदर गाडी फार जड होते.

वागनेट. इंग्लंडांत चोंहींकडे आगगाडीची सोय होण्यापूर्वीं वागनेट गाडींतून टपाल पोंचविण्याची तजवीज होती. ह्या जातीच्या वागनेटची पुढली बैठक बरीच उंच असते. लॉर्ड स्टानहोप यांनीं आपल्या खासगत वागनेटची पुढली बैठक सखल करविली आणि एकंदर रचनेंत थोडासा फेरफार करून ती गाडी खानगी गृहस्थाला शोभण्यासारखी केली. ती त्यांच्याच नांवानें स्टानहोप-वागनेट ह्मणून अद्यापि ओळखली जाते. पुढल्या बैठकी-



आकृति ४४. वागनेट.

वर चढण्यासाठीं कांहीं वागनेट गाड्यांला घडी करण्याची पायरी लावलेली असते.

पार्क-फेटन.

सायंकाळच्या वेळीं मोठाल्या बागांतून किंवा समुद्रकांठीं हवा खाण्यासाठीं श्रीमान् युरोपियन स्त्रिया किंवा साधारणतः वयोवृद्ध सुखवस्तू गृहस्थ शांत असा एक आडघोडा किंवा दोन तट्टू जोडून पार्क-फेटन गाडी वापरतात. शहरांतील भर रहदारीच्या रस्त्यांतून किंवा कामकाजाच्या धामधुमींत ही गाडी फारशी दिसत नाहीं.

चारचाकी डागकार्ट.

कांहीं हौशी लोक चारचाकी डागकार्ट वापरतात; पण सायंकाळीं एक दोन स्नेही मंडळी घेऊन हवा खाण्याशिवाय ही गाडी जास्त उपयोगीं पडत नाहीं.

चाकांमध्यें अंतर थोडें असण्यापासून फायदा.

चारचाकी गाड्यांच्या पुढल्या चाकांपासून मागल्या चाकांपर्यंत जें अंतर असतें तें जितकें कमी असेल तितकी गाडी ओढण्यास हलकी होते. हा मुद्दा चारचाकी गाडी विकत घेतांना लक्षांत ठेवण्यासारखा आहे. व्हिक्टोरिआ गाडीच्या दोन चाकांमध्यें तीनपासून सव्वातीन फूट पर्यंत आणि लान्डोच्या चाकांमध्यें

सव्वातीन पासून साडेचार फूट अंतर असतें. वागनेटच्या दोन चाकांमध्यें दहा अक्रा इंचांपासून सहा इंच अंतर असूं शकतें.

चारचाकी गाड्या पुष्कळ प्रकारच्या आणि निरनिराळ्या आकृतीच्या बनविलेल्या असतात. बॅरूश, चारिअट, सोशिआब्ल, ड्राग, कार-आ-बांक, व्हि-आ-व्ही इत्यादि गाड्या बडेलोक किंवा राजे रजवाडे यांच्याशिवाय इतरांजवळ असणें शक्यच नाहीं, तेव्हां असल्या गाड्यांचें वर्णन न देतां ज्या गाड्या फार प्रचारांत आहेत तितक्यांचेंच अगदीं संक्षिप्त वर्णन येथें दिलें आहे. या विषयाची संपूर्ण माहिती होण्याला निरनिराळ्या कारखान्यांत जाऊन सर्व प्रकारच्या गाड्याच फार बारकाईनें आणि लक्षपूर्वक पाहिल्या पाहिजेत; कितीही वर्णन दिलें तरी चांगला बोध होणें शक्य नाहीं.

प्रकरण १८.

गाडी विकत घेणें आणि तिची जतन ठेवणें.

एकंदर दुचाकी किंवा चारचाकी गाड्यांची रचना आणि त्यांची बनावट ज्या देशांत व हवेंत त्या वापरण्याच्या असतील त्यांवर अवलंबून असते ह्मणून ह्या गोष्टी विशेष लक्षांत घेऊन गाडी खरेदी करावी. विलायती किंवा अमेरिकन गाड्या ह्या देशांतील रुक्ष व गरम हवेंत चांगल्या निभावत नाहींत.

जुनी गाडी घेण्यांत सावधगिरी.

जुन्या गाड्या खरेदी करण्यांत तर फार सावधगिरी ठेविली पाहिजे. विकणारा चांगला खात्रीचा असल्याशिवाय त्याच्या जवळून कधींही जुनी गाडी घेऊं नये. लांपी, रंग आणि वारनीश यांचा कारागिरानें विचारपूर्वक आणि धूर्तपणें उपयोग केला तर गाडीच्या जोडणींतील व्यंगें इतकीं बेमालूम करितां येतात कीं चांगले चांगले माहितगारसुद्धां सहज भुलून जातात.

गाडी विकत घेण्यांत मुख्य तपासण्याच्या बाबती ह्मटल्या ह्मणजे जोडकामांत वापरलेलीं लांकडें, आंस, (अकूसल) आणि कमानी; बाकी अस्तराचें कापड किंवा चामडें आणि इतर सामान हीं सहज बदलून ज्याला त्याला आपल्या आवडीनें आणि ऐपतीप्रमाणें घालतां येतात. गाडी कशी तपासावी.

नवी गाडी करविणें असेल तर त्या संबंधानें लांकूड जून आणि दोन चार वर्षें सुकलेलें असें असावें नाहीं तर गाडी तयार झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं सांधे ढिले पडून गाडी खडखडूं लागते. लांकूड जून आहे कीं नाहीं याची नुसतें बाहेरून पाहून खात्री होणें बरेंच कठीण ह्मणून ही बाबत गाडी करणाराच्या भरंवशावर किंवा चार सहा महिने वापरून नंतर गाडी-चे सर्व पैसे देण्याचे कबुलायतीवर ठेविली पाहिजे. गाडी बनत असतांना दररोज पहाण्यांत येत असली तर जोडकामांत कारागीर लांकडें कोणतीं बसवितो, आंस कमानी वगैरे कोणत्या घालतो वगैरे सहज कळून येतें. पण जी गाडी तयार करून विकावयासाठीं ठेवि-लेली असते त्या गाडीच्या सर्व भागांच्या नवेपणाबद्दल नव्या गाडी-चें लांकूड.

खात्री करावयाचें काम बरेंच बिकट आहे. असली गाडी आपल्या बेताची असून घेण्याचा मानस झाला असतां तपासण्याकरितां कोणी कारागिराची मदत घ्यावी हें उत्तम; नाहीं तर गाडी विकणारानें आपण सांगूं त्या ठिकाणच्या कांहीं भागावरचें अस्तर काढून दाखविलें पाहिजे. अशानें आंतील लांकडें जुनीं एकदां वापरलीं असलीं तर तीं सहज दिसतात.

गाडीचे आंस. गाडीचे आंस जुने आहेत कीं काय याची पक्की खात्री करून घ्यावी; चाकें काढवून आंत चामड्याच्या चाक्या किती घातल्या आहेत तें पहावें. चाक्या पुष्कळ असल्या तर आंसाची टोंकें चांगलीं पुसून स्वच्छ करून बारकाईनें तपासावीं. तीं किंचित्‌ही घांसलेलीं आहेत असें दिसल्यास आंस जुने आहेत ह्मणून समजावें.

गाडींतील गाद्या, अस्तर, कंदील वगैरे इतर सामान हें केवळ ज्याच्या त्याच्या आवडीवर आणि ऐपतीवर आहे तेव्हां त्याबद्दल ह्या ठिकाणीं कांहीं सांगतां येत नाहीं.

मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादि मोठालीं शहरें गाड्या विकत घेण्यास जितकीं चांगलीं तितकींच

वाईट. याचा अर्थ असा कीं ह्या शहरांत आपल्या हौशीसारखी गाडी सहज निवडून घेतां येते, पण फसण्याचाही संभव जास्ती असतो. ह्या शहरांत जे खरोखर अब्रूदार कारागीर आहेत ते वाईट गाडी विकीत नाहीं; कारण गाडी हा जिन्नस फार दिवस टिकणारा असून पुष्कळांच्या दृष्टीस पडणारा असल्यामुळें एकदां एखाद्या गाडीसंबंधीं नापत झाली ह्मणजे त्यापासून आपलें अनेक प्रकारचें नुकसान आहे हें ते चांगल्या रीतीनें समजतात. पण अशा योग्यतेच्या कारागिरांकडील माल महाग ह्मणून लोक स्वस्त्या गाड्या शोधीत फिरतात. आणि हजार हिश्शानीं वरून रंग रोगण केलेलें चक्क मोडकें तोडकें खोकें घेऊन येतात. अशी गाडी घेतल्यानें ती सदोदित दुरुस्त करण्याचा जो खर्च आणि जी दगदग होते त्याचा एकंदर अंदाज केला तर प्रथमच थोडी किंमत जास्त देऊन खात्रीची गाडी घेणेंच चांगलें असें अनुभवसिद्ध आहे. तसेंच गाडी घेऊन जर नीट संभाळून काळजीपूर्वक वापरली नाहीं तर ती फार लौकर खराब होते.

मोठालीं शहरें गाडी खरेदी करण्याला जितकीं चांगलीं तितकींच वाईट.

मालकाची गाडीवर थोडी नजर असली तरी पुरे.

साधारण प्रघात असा आहे कीं घोडेवाला गाडी जोडून दरवाजाशीं आणतो आणि दरवाजा उघडून उभा असतो. यजमान आल्याबरोबर गाडींत बसून जातात आणि काम झालें ह्मणजे परत घरीं आले की लागलेच गाडींतून उतरून घरांत जातात. अशा गृहस्थांचे घोडेवाले जर शहाणे, दक्ष, आणि मालकाच्या गाडीची आस्थेपूर्वक काळजी घेणारे असले तर ठीक; नाहीं पेक्षां गाडीच्या दुरुस्तीचा दर महिन्याला खर्च चालूच आहे असें समजावें. मालक गाडीकडे फारसा पहात नाहीं किंवा घरांतील माणसांपैकीं कोणाचीही गाडीकडे नजर नाहीं अशी गाडीवाल्याची एकदां खात्री झाली ह्मणजे तो तिकडे सहजच दुर्लक्ष करतो; गाडी नीट धुतली जात नाहीं, कोंपऱ्यांत व सांध्यांत धुरळा रेती तशींच राहतात, रेतीमुळें लोखंडी भाग लौकर झिजून जातात, एखादा स्क्रू सईल झालेला वेळेवर बसविला जात नाहीं ह्मणजे सहजच एक बाजूचा सांधा सईल होऊन त्याच्या हिसक्यानें दुसऱ्या बाजूनें सांधा निखळतो. अशा प्रकारें दिनप्रतीदिन गाडीची खराबी होते ह्मणून मालकानें गाडींत बसण्यापूर्वीं एकदां तरी गाडीच्या सभों-

मालकाची गाडीवर नजर असण्याची अवश्यकता.

वती फिरून ती चांगली धुऊन पुसून स्वच्छ केली आहे कीं नाहीं हें पहावें आणि कांहीं व्यंग नजरेस आल्यास तावडतोब चौकशी करावी, ह्मणजे गाडीवाला जागृत राहून आपलें काम लक्षपूर्वक करतो. अशा प्रकारें दररोज थोडीं मिनिटें गाडीच्या देखरेखीकडे घालविण्याचा मोबदला लागलाच मिळतो. गाडी दुरुस्त करण्यासाठीं वारंवार कारखान्यांत पाठवावी लागत नाहीं. दिसण्यांत गाडी स्वच्छ नीटनेटकी दिसते आणि जास्त दिवस टिकते.

ह्या देशांत ज्यांच्याजवळ एखाददुसरी गाडी असते त्यांच्या हातून गाडीची पाहिजे तशी तजवीज रहात नाहीं. गाडी कोठें तरी पडवींत किंवा एखाद्या छपराखालीं घोड्याच्या बरोबरच ठेवतात, हें वर सांगितलें आहेच. अशा रीतीनें गाडी ठेवण्यापासून तिचा रंग फार लौकर खराब होतो आणि अन्य प्रकारेंही गाडीची पुष्कळ खराबी होते. गाडी ठेवण्याची जागा कशी असावी याविषयीं नियम व सविस्तर वर्णन देणें कठीण नाहीं पण ज्याच्याजवळ पैसा विपुल आणि जागा विस्तृत असेल त्यास या नियमाप्रमाणें जागा बनविणें शक्य आहे. पण ह्या दोन्ही बाबती ज्याच्याजवळ बेता-

बाताच्याच त्यानें निदान मुख्य मुख्य बाबतींकडे तरी लक्ष देणें इष्ट आहे.

गाडी ठेवण्याची जागा.

गाडी ठेवण्याची जागा अगदीं कोरडी असावी, दमट असली तर गाडीचे लोखंडी भाग, अस्तर आणि गाद्या खराब होतात. गाडीखान्यांत उबारा असणें इष्ट आहे; तसेंच त्यांत वारा खेळता असावा. गाडी नेहेमीं वापरण्यांत असो अगर नसो ती दररोज बाहेर काढून धुवावी. गाद्या व बाजूचें अस्तर चांगलें पुसावें आणि विशेषतः कोंपरे लहान ब्रशनें साफ करावे, त्यांत थोडी थोडी धूळ जमून राहिल्यानें पुष्कळ खराबी होते. बरेच दिवस गाडी बाहेर वापरण्यास निघण्याचा संभव नसल्यास गाद्या, तकीये काढून गुंडाळून ठेवावे आणि त्यांत रशिया-लेदरचे तुकडे टाकून ठेवावे ह्मणजे कसर लागत नाहीं.

एक घोड्याचे पोल कसे ठेवावे.

एक घोड्याच्या गाडीचे पोल काढावयाचे नसतात ह्मणून त्यांच्याखालीं गाडीखान्यांत एक लांकडी घोडा ठेवावा ह्मणजे गाडी समूर रहाते. गाडी उलटून ठेवणें किंवा पोलांचीं टोंकें जमिनीवर ठेवणें चांगलें

नव्हे. जोडीचा पोल नेहमीं काढून ठेवावा लागतो. पुष्कळ गाडीखान्यांतून जोडीचा पोल भिंतीजवळ उभा करून ठेवण्याची चाल आहे पण ती चांगली नाहीं. अशा प्रकारें ठेविलेला पोल पुष्कळ वेळां घसरून पडतो आणि त्यापासून त्याला चरे पडून रंग खराब होतो. शिवाय पर्जन्यकाळीं पोल तिरकस उभा राहिल्यानें वांकतो. गाडीखान्यांत भिंतीला दोन फूट लांबीच्या खुंट्या सुमारें पांच फुटांच्या अंतरावर मारून त्यांच्यावर पोल ठेवावा. ह्या खुंट्यांला कपडा गुंडाळलेला असावा. ह्या जमिनीपासून सरासरी साडेतीन फूट उंचीवर असाव्या ह्मणजे गाडीखान्यांत कोणी गेला तरी त्या पोलावर वसत नाहीं.

जोडीचा पोल कसा ठेवावा.

गाडीला रंग रोगण करण्यांत जे श्रम घेण्यांत येतात आणि त्याबद्दल जी किंमत द्यावी लागते तिचा विचार केला ह्मणजे तें रंग रोगण पुष्कळ दिवस टिकून फिरून लौकर कारखान्यांत गाडी पाठवून तें करविण्याचा प्रसंग न यावा अशी तजवीज ठेवणें मालकाला किती फायदेशीर आहे हें सांगण्याची जरूर नाहीं. मात्र तें कशा प्रकारें शक्य आहे इतकें सांगितलें ह्मणजे पुरे.

गाडी धुणें.

गाडी चांगली स्वच्छ धुऊन कोरडी झाल्यानें ही गोष्ट पुष्कळ अंशीं शक्य आहे. गाडी धुणें यांत काय; एकदां खूब पाणी ओतलें ह्मणजे झालें असें वाटणें स्वाभाविक आहे पण त्यांत पुष्कळ बारीक बारीक बाबती लक्षांत बाळगणें जरूर आहेत. गैर माहितगार गाडीवाला गाडी बाहेरून आली ह्मणजे तशीच राहू देतो. तेणेंकरून तिच्या चाकांवरचा, पंख्यांवरचा वगैरे चिखल वाळून जातो आणि गाडीवाला जेव्हां आपल्या सवडीप्रमाणें गाडी धुण्यास प्रारंभ करतो तेव्हां पाणी घालून घांसून माती काढण्याच्या यत्न करूं लागतो; पण असें करण्यापासून वारनिश घांसलें जातें, त्याची चकाकी नाहींशी होते आणि चरे पडतात. गाडी धुणारा आपल्या हातून जितका निघेल तितका चिखल काढून गाडी जेमतेम पुसून गाडीखान्यांत परत लोटून ठेवतो.

गाडी पुसणें.

गाडी बाहेरून आल्याबरोबर चिखल ओला असतांना गाडी धुतल्यानें तो पाण्यानेंच निघून जातो, ह्मणजे गाडी घांसावी लागत नाहीं; धुतल्यानंतर कोनाकोंपऱ्यांतून अगदीं चांगली कोरडी पुसून काढावी नाहीं तर पाण्याचे थेंब जागच्या जागीं वाळून जाऊन तितक्या

ठिकाणीं डाग पडतात. गाडी धुण्याला प्रारंभ करण्यापूर्वी आंतल्या गाद्या, चाबूक, कंदील वगैरे काढून एका बाजूला सुरक्षित जाग्यावर ठेवावे. गाडी खादीच्या रुमालानें कधींही पुसूं नये. शामी-लेदर ह्मणून चामडें मिळतें त्याणें पुसावी. पुसण्यापूर्वी ज्या ठिकाणीं चामडें फिरविणें असेल तेथें रेतीचा रजःकण आहे कीं काय हें पहावें नाहीं तर तो कण चामड्याबरोबर सरकून चरा पडतो.

गाडी धुतेवेळीं मोतद्दार चाकांच्या आंतल्या बाजूला आंसाजवळ जो चिकटा जमतो तो बहुशः नीट काढीत नाहीं; त्या चिकट्यावर रेती उडून त्यांत रहाते आणि सदोदित आंसाच्या आणि त्याच्यावर फिरणाऱ्या लोखंडी चक्रयांच्यामध्यें घांसत राहिल्यानें तेथें आंस झिजून खिळखिळा होतो. ह्मणून तो चिकटा नेहमीं काढविण्याकडे मालकाची नजर असावी. आंसाजवळचा चिकटा काढणें.

गाडी धुपत असतांना मालकानें नजर ठेवावी हें चांगलें; त्यापासून गाडीवाला आपलें काम जास्त दक्षतेनें करतो आणि शिवाय त्यांत किती भानगड आहे हेंही मालकाच्या सहज लक्षांत येतें.

वारंवार गाडी धुणें चांगलें नाहीं.

घोडे, गाडी किंवा साज मलिन स्थितींत बाहेर नेणें वाईट दिसतें ह्मणून ती वारंवार दिवसांतून पांच सहा वेळ काढणें सुद्धां चांगलें नाहीं. कारण जी गाडी दिवसांतून पांच सहा वेळ धुण्याचा प्रसंग येतो त्या गाडीच्या वारनिशची चकाकी कधींही रहात नाहीं, इतकेंच नव्हे पण ती नीट धुण्यासच वेळ मिळत नाहीं. ज्याला अशा प्रकारें घडोघडी बाहेर जाण्याची जरूर असेल त्याणें एक साधी लहान गाडी ह्याच कामासाठीं ह्मणून ठेविली तर चांगलें. असली गाडी फक्त वारनिश केलेली असावी. ती रंगविलेल्या गाडीपेक्षां साफ करण्याला सोईची आणि फिरून वारनिश करण्यासही सोपी असून त्याला खर्च कमी पुरतो.

गाडी तपासणें.

ज्या नोकराच्या ताब्यांत गाडी दिलेली असते त्याणें वारंवार तिची तपासणी केली पाहिजे. मालक ती स्वतः करील तर फारच उत्तम. गाडी फिरत असतांना कोठें खळग्यांत हिसका लागून कमान बंदांतून सरकून जाऊन एखाद्या स्क्रूची चाकी सईल होते, पोल किंवा गंडेरी तडकून जाते, अथवा आंसाला तेल नसल्यामुळें तो गरम होतो, अगर त्यांतल्या चामड्याच्या चाक्या झि-

जून जातात. ह्या किंवा असल्या लहान लहान बाबतींची वेळेवर दुरुस्ती झाली तर थोडक्यांत काम होतें. गाडीचा आंस (अक्सल) सदोदित तपासावा. केव्हां केव्हां तो मोडून भयंकर परिणाम होतात.

उत्तम तऱ्हेनें बनविलेल्या आणि तितक्याच दक्षतेनें संभाळलेल्या गाड्या मोडत नाहींत असें नाहीं पण निष्काळजीपणानें वापरण्यांत असलेल्या गाडीपेक्षां अशा गाड्यांपासून धोका कमी असतो.

गाडींत तेल घालणें.

गाडीच्या आसांत तेल घालण्याकडे चांगली नजर पाहिजे. गाडीचीं चाकें आंसासभोंवतीं चांगलीं फिरावीं आणि आंस झिजूं नये ह्मणून डब्यांत तेल घालून तें सदोदित आंसासभोंवतीं ठेवणें फार अवश्य आहे. जर स्वतः देखरेख ठेवून तेल घालण्याचें होणें शक्य नसेल तर गाडी दरमहाचे दरमहा एखाद्या चांगल्या गाडीच्या कारखान्यांत पाठवून तेल घालवून आणावें हें चांगलें. स्वतःचे देखरेखीखालीं तेल घालणें फारसें खटपटीचें काम नाहीं. गाडीबरोबर डबे काढण्याची चावी मिळते, ती चावी डब्याला चांगली बसवून गाडी-

आंसाच्या तोंडावरचा डबा काढणें.

च्या मागल्या बाजूकडे तोंड करून उभें रहावें आणि चावीच्या दांड्यावर भार घालून गाडीच्या पाठी मागल्या बाजूकडे तो लोटावा ह्मणजे डबा अल्प आयासानें निघतो. डबा काढून आंतून अगदीं स्वच्छ पुसून तो अर्धा भरेल इतकें तेल घालावें आणि परत जाग्यावर हळू हळू हातानें मळसुत्राच्या दोऱ्यांत बसता करावा. अडाणी गाडीवाले डबा मळसुत्रांत लवकर न बसला तर जोरानें बसविण्याचा यत्न करितात, त्यापासून मळसूत्र मात्र खराब होतें. मळसुत्राशीं जोर करण्याचें यत्किंचित् सुद्धां प्रयोजन नाहीं; हा साधारण नियम सदोदित लक्षांत ठेवावा. हातानें बसेल तितका डबा बसला ह्मणजे चावीनें फिरवून चांगला घट्ट बसवावा. डबा चांगला घट्ट न बसला तर गाडी चालतांना पुष्कळ वेळां तो निघून पडतो. डबा बसविण्यापूर्वीं चाक हालवून पहावें; जर तें मागें पुढें असें हाललें तर त्यांतील

चामड्याच्या चाक्या घालणें.

चामड्याच्या चाक्या झिजून गेल्या आहेत असें समजावें. चाक्या झिजून गेल्या असतील तर चाकें काढून नवीन चाक्या घातल्या पाहिजेत. त्यासाठीं आंसाखालीं लांकडाची पेटी किंवा चाक उचलण्याचा चाप असतो

तो घालून चाक उचलावें; तीन खिळ्यांचा आंस असला तर आंतल्या बाजूला लोखंडाच्या चाक्या असतात त्या काढून चाक बाहेर काढावें आणि आंसाचीं टोकें स्वच्छ पुसून काढवावीं; नंतर झिजलेली चामड्याची चाकी काढून तिच्या ऐवजीं दुसरी घालावी आणि आंसावर थोडें गोडें तेल ओतून फिरून चाक चढवून खिळ्यांच्या चाक्या बेतानें घट्ट बसवाव्या फार घट्ट बसवूं नये आणि मग डबा पूर्वीं सांगितल्याप्रमाणें तेल भरून बसवावा.

तीन खिळ्यांचा आंस काढणें.

चामड्याच्या दहा बारा चाक्या एकदांच कारखान्यांतून कापवून आणून ठेवणें सोईवार होतें.

आंसाला तेल घालणें तें साधें नसून खालीं लिहिल्या कृतीनें बनविलेलें असावें.

डब्यांत घालण्याचें तेल.

बकऱ्याची स्वच्छ चरबी .... एकशेर.

एरंडेल तेल .... अर्धाशेर.

गोडें तेल .... पावशेर.

देशी साबू बारीक केलेला........ पावशेर.

× प्लंबेगो .... पावशेर.

× बारीक काळी पूड असते, ती हाताला अगदीं गुळगुळीत लागून चकचकते.

तेल करण्याची कृति.

चरबी कढवून ती पातळ झाली ह्मणजे त्यांत एरं-डेल तेल घालून मग साबण बारीक पूड करून घालावा; नंतर प्लंबेगोची पूड टाकावी आणि शेवटीं गोडें तेल टाकावें. चुलीवरून उतरून हें मिश्रण एका जस्ती ड-ब्यांत ओतावें, कांहीं वेळानें थिजून जातें. ज्यावेळीं गाडीच्या डब्यांत घालणें असेल तेव्हां थोडें काढून घालावें आणि वर थोडें गोडें तेल ओतून मग डबा चढवावा.

पिनचा आंस काढणें.

पिनचे आंस असून त्यांचीं चाकें काढणें असतील तर अजाण मनुष्याचे हातून काढवूं नये; कारखान्यांत गाडी पाठवावी किंवा स्वतःला हौस असेल तर त्या जातीच्या आंसांवर चाकें कशीं बसवितात तें नीट लक्षपूर्वक पाहून माहिती झाली ह्मणजे काढावीं.

अशा प्रकारें वेळच्यावेळीं जेथच्या तेथें गाडीची तजवीज राखली तर गाडी चांगल्या रीतीनें पुष्कळ दिवसपर्यंत वापरण्यास कोणतीही अडचण येण्याचा सं-भव नाहीं.

घोड्याचा साज सगळा चामड्याचा बनविलेला असतो तेव्हां त्याचा योग्य सांभाळ न केला तर दि-

सण्यांत वाईट दिसूं लागतो आणि लौकर तुटून जातो ह्मणून त्यासंबंधीं मालकानें काळजी घेणें अवश्य आहे. साज साफ करण्याबद्दल माहिती प्रकरण ११ मध्यें सविस्तर देण्यांत आली आहे.

घोडा घेणें, त्याची जतन करणें, गाडींत चालू करणें, एकघोडयाची व दोनघोडयांची गाडी वापरणें, साज संभाळणें वगैरे घोडागाडी संबंधाच्या मुख्य बाबतीं-विषयीं जरुरीपुरत्या सूचना पुस्तकाच्या प्रारंभीं ह्मट-ल्याप्रमाणें दिल्या आहेत. त्या बहुतेक स्वतःच्या अनुभवाच्या किंवा चांगल्या माहितगार गृहस्थांनीं लिहिलेल्या पुस्तकांच्या आधारानें असल्यामुळें ब-ऱ्याच उपयोगी होतील असा समज आहे. ह्या नुसत्या सूचना असल्यानें अमूक सूचना अशी कां याचें प्रति-पादन करून उगाच ग्रंथ वाढविणें रास्त वाटलें नाहीं.

प्रकरण १९.

चौकडी जोडणें व हांकणें.

ह्या देशांत चारघोड्यांच्या गाडीचा फारसा प्रघात नाहीं तत्रापि राजे रजवाडे आणि इतर श्रीमान् गृहस्थ यांजकडे चौकडीच्या गाड्या नजरेस पडतात. ज्याला दोन घोड्यांची गाडी चांगल्या रीतीनें हांकतां येते त्याला फार थोड्या प्रयासानें चौकडी हांकतां येणें शक्य आहे.


चौकडी जोडणें.

ज्याप्रमाणें जोडीचे घोडे जोडतात त्याचप्रमाणें चौकडीपैकीं मागले ह्मणजे चाकांजवळचे घोडे जोडतात. त्यांच्या साजांत फक्त एकच मुद्याचा फरक असतो. अंधारीच्या मोरड्याला कानाजवळ दोन्ही बाजूंला दोन कड्या असतात आणि कठडीलाही दोन कड्या जास्त असतात. त्यांतून पुढल्या घोड्यांच्या रासपट्ट्या घालून मागल्या घोड्यांच्या आणि पुढल्या घोड्यांच्या अशा चारही रासपट्ट्या हांकणारा हातांत धरतो.

मागले दोन्ही घोडे जोडल्यावर मग पुढले दोन्ही घोडे जाग्यावर आणून उभे करावे आणि पोलाला ज्या गंडेऱ्या लावलेल्या असतात त्यांला जोतपट्टे अडकवून नंतर वर सांगितलेल्या कड्यांतून त्यांच्या रासपट्ट्या घालून सुपडीवरील चापांत अडकवून ठेवाव्या.

घोडे बरोबर जुंपले आहेत कीं नाहीं हें गाडीवर चढण्यापूर्वीं नीट लक्षपूर्वक पहावें मुख्यतः रासपट्ट्या जेथच्या तेथें आहेत कीं नाहीं इतकें अवश्य पाहिलें पाहिजे. योग्य तऱ्हेनें जोडलेली चौकडी आकृति ४५ मध्यें दाखविली आहे.

गाडीवर बसण्यापूर्वीं घोडे कसे जुंपले आहेत तें पहावें.




आकृति ४५.

गाडीच्या बैठकीवर चढण्यापूर्वीं पुढल्या घोड्यांच्या रासपट्ट्या अशा बेतानें धराव्या कीं त्यांपासून त्यांच्या तोंडांला इशारा होऊं नये पण मागील घो-

चौकडीच्या रासपट्ट्या धरणें.

ड्यांच्या रासपट्या मात्र किंचित् ओढून हातांत घ्यावा आणि गाडीवर चढून एकदम बैठकीवर बसावें. नंतर रासपट्ट्या फिरून डाव्या हातांत घेऊन सारख्या जुळवून घ्याव्या; डाव्या बाजूच्या पुढल्या घोड्याची पट्टी पहिल्या बोटावर; उजव्या पुढल्या घोड्याची आणि डाव्या मागल्याची अशा दोन्ही रासपट्ट्या पहिल्या आणि दुसऱ्या बोटांच्या मध्यें, आणि उजव्या मागल्याची दुसऱ्या आणि तिसऱ्या बोटांच्या मध्यें अशा रीतीनें रासपट्ट्या घट्ट धराव्या. पहा आकृति ४६.



आकृति ४६.

याप्रमाणें रासपट्ट्या डाव्या हातांत नीट धरल्या गेल्या ह्मणजे उजव्या हातांत चाबूक घ्यावा, आणि गाडींत बसणारांला शब्दानें सूचना करून मग घोडे चालू

करावे. गाडी चालू करण्याचें काम बहुतेक मागल्या घोड्यांकडून करवावें. चौकडीची गाडी चालू करण्यांत बरेंच कसब आहे आणि तें अनुभवानेंच चांगलें येतें.

चौकडी हांकण्याचा अभ्यास करणें.

चौकडी हांकण्याची ज्याला पुरी वाकबगारी मिळवावयाची असेल त्याणें त्याचा एकसारखा पुष्कळ दिवस अभ्यास ठेवणें जरूर आहे. कितीही चौकड्या हांकल्या तरी हांकणाराच्या हातांत नवी चौकडी आली कीं त्याला कांहीं तरी नवीन माहिती होतेच. दुसऱ्या अनेक कौशल्यांप्रमाणें चौकडी हांकण्याची कुशलता साध्य होण्यास त्याचा नेहमीं अभ्यासच ठेविला पाहिजे. नाहीं तर हात व नजर ह्यांची चपलता कमी होते आणि अभ्यास मोडला तर रासपट्ट्या व चाबूक धरण्याच्या कामांत मनुष्य अडखळूं लागतो.

चौकडीच्या घोड्यांची सरासरी २० पासून ३० रतल वजना इतकी बोटांवर ओढ असते ह्मणून नवीन हांकणारानें आपल्या आंगठ्याच्या शिरेला कसरतीनें मजबूत करणें फार अगत्याचें आहे; नाहीं तर पुष्कळ वेळपर्यंत रासपट्ट्या धरवत नाहींत व मुख्यत्वेंकरून सोसाट्याचा वारा वाहत असतां त्या नीटपणें धरण्यास अत्यंत श्रम पडतात.

गाडी हांकतांना आपले शरीराला पोंक येऊं देऊं नये; समूर ताठ ठेवावें, किंबहुना शरिराचा झोंक किंचित् मागें ठेवावा, पुढें ओणवून कधींही बसूं नये.

बैठक आणि हात कसे ठेवावें.

बैठक उंच असली तर हांकणाराला गुडघे न वांकवितां बैठकीला नुसतें टेंकून रहावें लागतें यापासून बराच धोका आहे, कारण अशा स्थितींत जर एखादा पोलाजवळचा घोडा बुझाला किंवा कांहीं कारणानें सुटला तर हांकणाराला हिसका बसून तो गाडीखालीं पडतो. हांकण्याची बैठक नीच असावी, व पुढल्या आंगापेक्षां मागच्या आंगास सुमारें तीन चार इंच जास्त उंच असावी, ह्मणजे हांकणाराला खरोखर सुखासनानें बसतां येतें. मणगटें व गुडघे हे एकमेकांला लागतील इतक्या बेतानें असावे, व बाहू कुशींला लागलेले असावे. कोंपरांचीं टोकें खवाट्याच्या हाडांला लागावीं उजवा हात शरिराच्या मध्यभागाजवळ असावा; डावा हात शरिराच्या मध्य भागापासून तीन चार इंचांवर असावा. हाताची पाठ पुढच्या आंगास वळलेली ठेवावी आणि बहुतेक वरच्या बाजूला फिरलेली असून घोड्यांकडच्या बाजूस थोडीशी कलती असावी. मणगट हें शरिराकडे किंचित्

वांकलेलें असावें आणि कांहीं झालें तरी अन्य रीतीनें वाकूं देऊं नये. घोड्याच्या तोंडाला लगामीनें इशारा करण्यास हीच उत्तम स्थिति आहे कारण मणगट हें त्यावेळेस कमानीप्रमाणें कार्य करतें त्यामुळें रासपट्ट्यां-वर अगदीं सारखा दाब ठेवतां येतो.

चौकडी हांकण्याचा चाबूक मोठा वजनदार अस-ल्यामुळें तो चांगल्या रीतीनें धरण्याचा अभ्यास झाला पाहिजे; तसेंच पाहिजे त्याच जाग्यावर अवगी मारण्यास जसा सराव पाहिजे त्याचप्रमाणें ह्या चाब-कानें पुढल्या किंवा मागल्या घोड्यावर पाहिजे त्याच जाग्यावर मारतां येण्याची संवय झाल्याशिवाय चाबूक नीट मारतां येत नाहीं. गाडी हांकण्याशिवाय अन्य वेळीं याचा अभ्यास केल्यास चांगलें. अनभ्यासी हांक-णाराचा चाबूक शेजारीं बसणाराला पुष्कळ वेळां लागतो, किंवा मारतांना भलत्याच घोड्याला लागतो. चौकडीचा चा-बूक.

चौकडीपैकीं एखाद्या घोड्याला चाबूक मारण्याची जरूर पडल्यास ज्या अपराधासाठीं शिक्षा करणें असेल तो घडतांक्षणींच मार द्यावा आणि असा मार देते वेळीं लगाम काबूंत असावी.

आपल्या घोड्यांची आपणाला चांगली माहिती होईपर्यंत त्यांस कधींही उधळवूं नये. चांगल्या रीतीनें गाडी चालण्यासाठीं मुख्य गोष्ट ही कीं चारही घोडे सारखे ह्मणजे एका मागून एक चालले पाहिजेत.

चौकडी चालत असतांना सर्व रासपट्ट्यांवर सारखी ओढ राहील अशी खबरदारी ठेवावी; एखादा घोडा मागें पडत असेल त्याला चाबकानें इशारा करून हांसोळीवर ओढ देण्यास लावावें. नवीन शिकणाराचे हातून रासपट्ट्या घडीघडी सरून सहज पडतात याबद्दल चांगली खबरदारी ठेवावी.

घोडे उभे करणें आणि चालविणें.

घोड्यांला कधींही एकदम उभें करूं नये, त्यापासून त्यांला त्रास होऊन शिवाय गाडींत बसणारांला हिसका बसतो. तसेंच केव्हांही त्यांची गति एकदम वाढवूं नये. रस्त्यानें जात असतां समोर येणाऱ्या गाड्यांला जाण्यास मार्ग द्यावा आणि त्यासाठीं आपण स्वतः सदोदित आपली गाडी आपल्या डाव्या बाजूला ठेवावी. गाडी चढणीवर नेते वेळीं घोड्यांला जलद चालवावें; त्यांत विशेषतः मागल्या घोड्यांला अगोदर

गाडी ओढण्यास लावावें. चढणीच्या वरच्या टोंकावर गेल्यानंतर खालीं उतरतांना गति कमी करावी.

तसेंच पावसाळ्यांत किंवा सडकेवर पुष्कळ पाणी शिंपलें असेल अशा वेळीं गाडी हांकतांना घोड्यांला फारच संभाळून धरलें पाहिजे.

अपरिचित वस्तूंच्या बाजूनें गाडी नेणें.

रासपट्ट्या सदोदित डाव्या हातांत ठेवाव्या ह्मणून सांगितलें आहे परंतु केव्हां केव्हां उजव्या हाताचा उपयोग करावा लागतो; पण त्या वेळीं पट्ट्या डाव्या हातांतून अगदीं काढून उजव्या हातांत घेऊं नये.

रस्त्यांत जातांना समोरून कांहीं वाद्यें वाजत येत असलीं किंवा भरलेले खटारे किंवा उंट, हत्ती, ह्मणजे दररोज दृष्टीस न पडणाऱ्या वस्तूंच्या बाजूनें जाणें असेल अशा वेळीं रासपट्ट्यांवर उजवा हात जरूर ठेवावा.

गाडी वळविणें.

एकघोड्याची, दोनघोड्यांची, किंवा चौकडीची गाडी वळवितांना मोठ्या चकरानें गाडी वळवावी. थोड्या जाग्यांतच घोडे मुरडून गाडी कधींही वळवूं

नये, शिवाय गाडी फिरवितेवेळीं घोड्याची गति कमी करणें चांगलें.

चौकडी वळविणें.

चौकडीची गाडी वळविण्यास निदान ६०।६९ फूट जागा पाहिजे. चौकडी वळविण्यासाठीं पुढल्या घोड्यांला किंचित् आंवरून धरावें आणि त्यांचे जोतपट्टे अगदीं ढिले राखून ज्या बाजूला गाडी वळविणें असेल त्याच्या उलट बाजूच्या घोड्याला चटकन वळूं न देण्याची आणि वळणाकडील बाजूच्या घोड्यांला पोलावर आपटूं न देण्याची खबरदारी ठेविली पाहिजे.

ज्याला चौकडी हांकण्याचें कौशल्य उत्तम प्रकारें संपादन करण्याची इच्छा असेल त्यानें चांगल्या माहितगार गाडी हांकणाराच्या शेजारीं बसून तो गाडी हांकतो कशी, घोड्याला इशारे करतो कसे, आणीबाणीच्या प्रसंगीं आणि दाट रहदारीच्या रस्त्यांतून जातांना करतो काय हें लक्षपूर्वक अवलोकन करण्याची संधी जितकी सांपडेल तितकी साधून हांकणाराच्या हालचाली एकाग्र चित्तानें लक्षांत घ्याव्या.

प्रकरण २०.

टन्डम हांकणें.

टन्डम ह्मणजे कांहीं विशेष प्रकारची गाडी नव्हे. दुचाकी मोठ्या डाग-कार्टला एका पुढें एक असे दोन घोडे जोडणें यालाच टन्डम ह्मणतात. चौकडींतील एका बाजूच्या घोड्यांप्रमाणेंच बहुतेक ह्यांतही घोडे जोडतात. (आकृति ४७). चौकडी- टन्डम ह्मणजे काय.



आकृति ४७.

च्या पुढल्या घोड्यांचे जोतपट्टे एकेका लांकडी दांडक्याच्या टोंकाला अडकवतात आणि तीं दोन्ही दांडकीं आणखी एका तिसऱ्या दांडक्याला अडकवून तें दांडकें

मधल्या पोलाच्या आंकड्याला जोडतात तसें टन्डममध्यें करण्याला सवड नसून जरूरही नाहीं.

टन्डम जोडण्याचे प्रकार.

सांप्रत प्रचारांत टन्डमचा पुढला घोडा जोडण्याचे दोन प्रकार आहेत (१) पुढल्या घोड्याचे जोतपट्टे मागल्या घोड्याच्या छुग्यांजवळ आंकडे ठेवून त्यांला अडकवितात. ही रीत विशेष प्रशंसनीय नाहीं. (२) मागल्या घोड्याच्या हांसोळीला घोड्याच्या छातीजवळच्या भागाशीं खालीं चांगली मजबूत कडी ठेवून त्या कडींत सुमारें दोन फूट लांबीचें एक दांडकें अडकावें. सुमारें दोन फूट लांब असे जोतपट्ट्यांचे तुकडे घेऊन त्यांचीं एका बाजूचीं टोकें त्या दांडक्याच्या दोन्ही बाजूला अडकवावीं आणि दुसरीं टोकें मागल्या घोड्याच्या छुग्यांजवळ कड्या लाऊन त्यांला अडकवावीं. शिवाय ह्या दांडक्याला सुमारें दहा इंच सांखळीचा तुकडा मधोमध लावून त्याचें मोकळें टोंक मागल्या घोड्याच्या हांसोळीच्या छातीजवळ कडींत अडकवावें. ह्याच दांडक्याला समांतर असें दुसरें एक अडीच फूट लांबीचें दांडकें हूक लावून अडकवावें. या दोन्ही दांडक्यांत चार पांच इंच अंतर असावें; पुढल्या दांडक्याला पुढल्या घोड्या-

चे जोतपट्टे चौकडीच्या घोड्याप्रमाणेंच लावावे. पुढल्या घोड्याच्या रासपट्ट्या मागल्या घोड्याच्या अंधारीच्या बाजूला कानांजवळ दोंहों बाजूंला कड्या ठेवून त्यांतून काढून हांकणारा आपल्या हातांत घेतो (पहा आकृति ४७). एकंदरीनें दोन एकेरी साज असून त्यांतील एकाला फारच थोडा फेरफार केल्यानें टन्डम जोडण्यासारखा साज करतां येतो.

ज्याच्या घरीं घोड्यांची जोडी असून मोठी डागकार्ट असेल त्याला टन्डम जोडतां येण्यास कोणतीही हरकत नाहीं. टन्डम हांकण्यांत मनाला एक प्रकारचा विलक्षण आल्हाद वाटतो. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं टन्डम हांकणें फार धोक्याचें आहे, त्यांस माझें उत्तर इतकेंच कीं घोड्याची किंबहुना पाहिजे ती गाडी हांकणें किंवा तींत बसून जाणें धोक्याचें आहे, तेव्हां टन्डमलाच विशेष नांवें ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं. टन्डम गाडी मध्यें जे अपघात होतात ते मुख्यत्वेंकरून तीन कारणांपैकीं कोणत्यातरी एका कारणानें होतात. (१) अर्धवट शिकाविलेले घोडे (२) साज वेडा वांकडा घालणें (३) किंवा बहुतकरून पुष्कळ वेळां हांकणा-

टन्डममध्यें अपघात होण्याचीं मुख्य कारणें.

राचा अडाणीपणा. ह्या तीन्ही गोष्टींकडे चांगलें लक्ष दिल्यास टन्डममध्यें कोणत्याही प्रकारें इतर गाड्यांपेक्षां जास्त धोका नाहीं.

वर सांगितलेल्या तिन्ही बाबतींत धोक्यांचीं कारणें न घडून येण्यास काय केलें पाहिजे याचें थोडक्यांत विवेचन करूं.

टन्डमला घोडे आणि गाडी कशीं असावीं.

टन्डमला मोठे घोडे जोडण्यापेक्षां तट्टू जोडावे. हे दिसण्यांत सुरेख दिसतात, आणि आटोपसर असतात. मोठे घोडे लावण्याला कोणती हरकत आहे असें नाहीं पण घोडे मोठे असले तर गाडीही तशीच जड आणि मोठी असली पाहिजे. सुमारें बंगाली आठ दहा मण वजनाची डागकार्ट असली तर चांगली. गाडीचीं चाकें सुमारें पावणेपांच फूट उंच असावीं. इतर गाड्यांतील बैठकी प्रमाणें या गाडीची बैठकही हांकणाराला सोईची असावी, आणि तींत पायांच्या चवड्यांवर चांगला भार देऊन बसतां येईल अशी असावी.

टन्डम हांकण्यासाठीं जी गाडी वापरण्याची ती रुंद असून नीट तोललेली असावी, गाडीचा सगळा

भार पुढें असला तर घोड्याला इजा होते; भार मागें असला तर मागल्या बैठकीवर बसणारांला त्रास होतो.

घोडे चांगले शिकलेले असावे. मागील ह्मणजे पोलांतल्या घोड्याला फारसें शिकविण्याचें नसतें. पुढल्या घोड्याला पृष्ट १३६ वरच्या आकृतींत दाखविल्या प्रमाणें मोकळेपणीं चालण्याची चांगली संवई करणें फार जरूर आहे आणि तशी संवई त्याला चांगली झालेली असणें किती उपयोगी आहे हें अनुभवानें समजेल. टन्डमच्या दोन्ही घोड्यांपैकीं पोलांतील घोडा खात्रीचा आणि चांगला सहनशील असावा. पुढला घोडा लाथा मारणारा किंवा अडणारा नसला ह्मणजे पुरे. खरें ह्मटलें ह्मणजे दोन्ही घोडेही लाथा मारणारे नसावे. दोन्ही घोड्यांपैकीं जास्त भरंवशाचा घोडा मागें असावा. गाडी हवी तशी, घोडे उत्तम स्वभावाचे चांगले शिकलेले, आणि साजही उत्तम असला तरी जर हांकणारा अडाणी असला तर टन्डम कधींही नीट चालणार नाहीं. टन्डमचा पुढला घोडा.

टन्डमचे दोन्ही घोडे—विशेषतः पुढला—फारच लवकर व रासपट्ट्यांवर किंचित् जोर दिल्यानें वळतात;

टन्डम रस्त्यांतून वांकडी तिकडी चालण्याचा फार संभव असतो; टन्डमच्या घोड्याच्या बाजूला चौकडीच्या घोड्याप्रमाणें थोडाबहुत भार घालण्याला दुसरे घोडे नसतात, म्हणून त्यांला सदोदित रासपट्यांनींच तोलून धरावे लागतात. ह्या सर्व कारणांमुळें टन्डम हांकण्यांत फार चपळाई व हात हलका पाहिजे.

टन्डमचे घोडे कसे हांकावे.

चौकडीच्या रासपट्टचा डाव्या हातांत ज्याप्रमाणें धरण्याचें वर सांगितलें आहे त्याचप्रमाणें टन्डमच्या रासपट्टयाही धराव्या आणि गाडी चालू करते वेळीं प्रथम पोलांतल्या घोड्याला चालू करावा. दोन्ही घोडे नीट चालूं लागल्या शिवाय पुढल्या घोड्यावर गाडीची ओढ पडूं देऊं नये.

टन्डम हांकण्यांत दोन्ही घोडे समोर एकामागून एक चालविणें जितकें जरूर आहे तितकेंच कुशलतेचें हीं आहे, आणि नवीन शिकणारानें ह्या गोष्टीकडे फार लक्ष दिलें पाहिजे.

टन्डम वळविणें.

टन्डम वळवितानां ज्या वांकणावर वळविण्याची असेल त्या वांकणाच्या बाहेरच्या बाजूनेंच वळवावी

ह्मणजे वळण्यांत जेवढा मोठा घेर सांपडेल तेवढा धरावा. तसेंच टन्डम वळवितांना पुढल्या घोड्याला इतका आंवरून धरावा कीं त्याची हांसोळीं त्यावेळीं अगदीं सैल पडूं द्यावी आणि मग गाडी वळवावी. गाडी वळल्यानंतर फिरून पुढल्या घोड्याला गाडी ओढण्यास लावावा.

टेंकडीवरून खालीं उतरतेवेळीं देखील पुढल्या घोड्याला ओढून धरावा.

टन्डम हांकण्यांत चाबकाचा उपयोग फार असतो ह्मणून तो उत्तम तऱ्हेने वापरतां येण्याचा अभ्यास केला पाहिजे.

वरच्या वीस प्रकरणांत घोडागाडी संबंधी दिलेल्या सुचना चांगल्या लक्षांत घेऊन त्यांचा विचारपूर्वक उपयोग केला असतां घोडा विकत घेणें गाडी विकत घेणें ती संभाळणें आणि निरनिराळ्या तऱ्हेच्या गाड्या पद्धतशीर हांकणें ह्या बाबतींची व्यवहारिक माहिती होईल असा समज आहे.

घोडागाडी हा विषय असा आहे कीं त्याची माहिती कितीही पुस्तकें वाचलीं तरी त्यांत प्रावीण्य प्राप्त होणें शक्य नाहीं. ज्यांची प्रावीण्य मिळविण्याची इच्छा असेल त्याणीं पुस्तकाच्या धोरणानें कांहीं दिवस प्रत्यक्ष घोडे तपासले पाहिजेत, आणि गाड्या हांकण्याचा अभ्यास ठेवला पाहिजे.

समाप्त.

परिशिष्ट.

साधारण प्रचारांत असलेल्या गाड्या, त्यांच्या किंमती वगैरे.

गाडीचें नांव.	घोड्याची उंची वगैरे.	चाकें.	किती माणसें बसूं शकतात.	अजमासें किंमत + रुपये.	गाडीचें वजन मण बंगाली.
१ डाग कार्ट.	१ घोडा १३-१५ हात.	२	२ पुढें २ मागें.	२५०- ५००	६-१०
२ शिघ्राम.	,, ,,	२	४ आंत २ बाहेर.	,, ,,	९-१२
३ तांगा.	२ घोडे-१३-१४॥	२	२ पुढें २ मागें.	,, ,,	७॥-९
४ गिग.	१ घोडा-१३-१४॥	२	२	२००- ३५०	६- ८
५ व्हिक्टोरिया-फेटन.	१ घोडा-१४-१५	४	२ आंत २ बाहेर.	४००- ८००	८-१२
६ व्हिएना-फेटन.	,, ,, ,,	४	,, ,,	,, ,,	८-१२
७ डबल-व्हिक्टोरिआ.	२ घोडे-१४॥-१५॥	४	४ आंत २ बाहेर आणि १ मागें.	६००-१०००	१०-१२
८ बोट-फेटन.	,, ,,	४	,, ,,	,, ,,	१०-१२
९ सेल्बोरन लान्डो.	,, ,,	४	,, ,,	१०००-१५००	१६-२०

114

१० शेफ्टन लान्डो.	,, ,,	४	,, ,,	,, ,,	१६–२०
११ ब्रूहाम.	,, ,,	४	,, ,,	८००–१०००	१२–१५
१२ मिनीएचर ब्रूहाम.	१ घोडा–१४॥–१५	४	२ आंत २ बाहेर.	६००– ८००	१०–७२
१३ लान्डोलेट्.	,, ,,	४	,, ,,	,, ,,	,, ,,
१४ पार्क-फेटन.	२ तट्टू–१३–१४	४	२ आंत १ मागें.	४००– ६००	८–१२
१५ वागनेट.	२ घोडे–१४–१५	४	२ पुढें ४ मागें.	५००– ८००	१२–१६
१६ मेलफेटन.	,, ,,	४	२ पुढें २ मागें.	,, ,,	,, ,,
१७ बॅरुश.	,, ,,	४	२ पुढें ४ आंत.	१२००–२०००	१६–२२
१८ ड्राग.	४ घोडे–१५–१६	४	१२	२०००–४०००	२७–३६

+ गाड्यांच्या ज्या किंमती दिल्या आहेत त्या फक्त ह्या देशांत बनविलेल्या गाड्यांचा आहेत;

टीप—लान्डो, व्हिक्टोरिआ, ब्रूहाम, बॅरुश वगैरे गाड्यांला सी-स्प्रिंग नांवाच्या कमानी वगैरे योजना करून फार सुखावह करतां येतात. साधारण चारचाकी गाड्यांला पाहिजे तेव्हां एक किंवा जास्ती घोडे जोडण्याची तजवीज असते.